# दलित साहित्याच्या निमित्ताने

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९६२

## डॉ. सदा कऱ्हाडे

REFBK-0023717

संदर्भ निबंध
२३७१८
२९६२
११।१।८३

# दलित साहित्याच्या निमित्ताने

डॉ. सदा कऱ्हाडे

REFBK-0023717

अभिनव प्रकाशन, मुंबई ४०००१४

: प्रकाशक :
वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन
५३ गुरु नानक मार्केट
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

प्रथमावृत्ती
ऑक्टोबर १९८२

©
डॉ. सदा कऱ्हाडे

किंमत
दहा रुपये

मुखपृष्ठ: टी. आर. रेचवाड

: मुद्रक :
प. बा. कदम
नीलेश प्रिंटिंग प्रेस
ब्राह्मण आळी, अलिबाग
जि. रायगड

## प्रकाशकाचे
## दोन शब्द

'दलित साहित्याच्या निमित्ताने' – या नावाने प्रकाशित होणाऱ्या या पुस्तकात दलित साहित्याच्या वैचारिक पार्श्वभूमीची चर्चा करणारे पाच लेख ग्रथित करण्यात येत आहेत. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक डॉ. सदा कऱ्हाडे हे दलित साहित्याच्या चळवळीशी अगदी आरंभापासून निगडित आहेत. किंबहुना, 'प्रगत साहित्य सभे'च्या द्वारा दलित साहित्याला वैचारिक व्यासपीठ निर्माण करून देण्याच्या कामी ते सदैव आघाडीवर राहिले आहेत.

दलित साहित्याचा कालखंड पंचवीस वर्षांचा धरला तर या कालखंडात मराठी भाषेला ललामभूत होतील अशा अव्वल दर्जाच्या साहित्यकृती वेगवेगळ्या दलित साहित्यिकांनी निर्माण केल्या आहेत. त्यांच्या मागोमाग आजपर्यंत साहित्यविषयक जाणीवांपासून शेकडो कोस दूर असलेल्या भटक्या आणि विमुक्त जमाती, स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडणारे ग्रामीण शेतमजूर, आदिवासी इत्यादींच्या जीवनात नवे स्थित्यंतर घडत असून त्याला नवेनवे वाङ्मयीन धुमारे फुटत आहेत. दलित साहित्याच्या कक्षा आता दिवसेदिवस रुंदावत जाणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

या वाढणाऱ्या आवाक्याचे स्पष्ट चित्रण डॉ. कऱ्हाडे यानी या पुस्तकातील लेखांत केले असून नव्याने उदयाला येणाऱ्या तरुण लेखकांना ते मार्गदर्शनपर ठरेल अशी आम्हाला दृढ आशा आहे.

–वामन विष्णु भट

## अनुक्रम

१ दलित साहित्याच्या निमित्ताने :
पृष्ठे ५ ते २४

२ दलित साहित्य : बंडखोरी
अपरिहार्यच : पृष्ठे २५ ते ३२

३ दलित साहित्य : पुरागामी
साहित्याचा उद्‌गार : पृष्ठे ३३ ते ४२

४ दलित साहित्य : प्रस्तुतता
आणि संघात : पृष्ठे ४३ ते ६१

५ आठवणींचे पक्षी : पृष्ठे ६२ ते ७५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९६२
दा. क्र. 23596
दिनांक 11/11/83
ग्रंथ शाखा (ठाणे)

# दलित साहित्याच्या निमित्ताने–

दलित समाजातले काही नवे–जुने लेखक व उदयोन्मुख समीक्षक आपल्या परीने दलित साहित्याच्या वेगळेपणाचे समर्थन करीत आहेत. एक पृथगात्म आणि अर्थपूर्ण साहित्यप्रवाह आपल्या गुणवैशिष्टयांसह समृद्ध होत असेल तर मराठी साहित्यसंपन्नतेच्या दृष्टीने ते केव्हाही स्वागतार्हच ठरेल.

अद्याप या विषयावर व्हावी तितकी मोकळेपणाने चर्चा होत नाही. कारण वाङ्मयीन चर्चा करतानाही एकमेकांविषयीचे पूर्वग्रह टाळले जात नाहीत. उदाहरणार्थ, दलित साहित्य हे समाजनिष्ठ साहित्य असल्यामुळे कलात्मकदृष्टया ते गुणसंपन्न असूच शकणार नाही. अशा पूर्वसमजुतीने काही उच्चभ्रू समीक्षक दलित साहित्याचा परामर्श घेतात. याउलट समीक्षक हे उच्चवर्णीय आहेत, दलित साहित्य त्यांना समजलेच नाही, त्यांनी ते आत्मीयतेने वाचलेले नाही, दलितांच्या व्यथाच ते समजू शकत नाहीत असा पुष्कळदा दलित साहित्यिकांचा पूर्वग्रह असतो. अशा पूर्वग्रहांना कवटाळून झालेली चर्चा निकोप असणारच नाही.

विद्यमान दलित साहित्याचे भवितव्य त्याच समाजातील साहित्यिकांच्या हाती आहे. त्यांच्यापैकी एक पिढी तर संतप्त आहे. ती नुसतीच संतापलेली नाही तर काही अंशी एका टोकाला जाणारी आहे. त्यांच्या समजुती अगदी ठाम आहेत. त्यात काही तडजोड नाही. त्यांचे काही चुकत आहे असे सांगणे किंवा सांगण्याचा प्रयत्न करणे पुष्कळदा व्यर्थच ठरते. काही प्रवृत्तींची

त्यांना चीड आहे हे आपण समजू शकतो. पण त्यांना प्रवृत्तीवाचक शब्दांची चीड आहे. वर्णव्यवस्था, मध्यमवर्ग इत्यादी शब्द विवेचनाच्या संदर्भात आले तर संदर्भ लक्षात न घेताच काही दलित लेखक अस्वस्थ होतात. 'मराठवाडा'च्या दिवाळी अंकात (इ. स. १९६९) या विषयावर परिसंवाद होता. त्याविषयी लिहिताना 'मराठा'तील एका लेखात, जाणीवपूर्वक कोणताही पक्ष न घेता मी काही प्रश्न उपस्थित केले होते. दलित साहित्यिकांसमोर दलितांच्याच मनोवृत्तीविषयी मी काही प्रश्न टाकले होते. त्या प्रश्नांची रीतसर विचारांच्या पातळीवर उत्तरे देण्याऐवजी, हे प्रश्न जाहीरपणे विचारल्यामुळे काही दलित मित्र माझ्यावर कमालीचे रुष्ट झाले आणि विवक्षित संदर्भात मध्यम वर्गाचा उल्लेख केला म्हणून एक दलित साहित्यिक अस्वस्थपणे म्हणाले, 'तुम्हीसुद्धा मध्यमवर्गीय मनोवृत्तीनेच लिहिले आहे ...'

दलितांच्या मनोवृत्तीविषयी वास्तव दृष्टीतून खरेपणाने लिहिलेले त्यांना आवडत नाही आणि ज्या शब्दांचीसुद्धा त्यांना चीड आहे, ते शब्द जर वापरले तर काहीजण अस्वस्थ होतात. अशी जर वृत्ती असेल तर साहित्याविषयी निःपक्षपाती चर्चाच होणार नाही आणि दलित अस्वस्थ होऊ नयेत म्हणून त्यांचीच बाजू घेऊन लिहावे लागेल.

दलित साहित्याला 'विद्रोही साहित्य'च म्हणावे, असा तर संतप्त दलितांचा आग्रह आहे. परंतु 'विद्रोह' ही प्रवृत्ती फक्त त्यांचीच आहे का? ही प्रवृत्ती तर सर्वच संतप्तांमध्ये असणे शक्य असते. आणि तिचा आविष्कार इतर म्हणजे दलितेतर साहित्यातही होतो. त्याचे काय? या प्रश्नाचेही भान ठेवायला हवे. कदाचित् दलित साहित्यिक असेही म्हणतील की, तुमची विद्रोहाची संकल्पना वेगळी आणि आमची विद्रोहाची संकल्पना वेगळी. असे असेल तर मग विद्रोहाचे नेमके स्वरूपही स्पष्ट करून घ्यावे लागेल.

नेमके कोणत्या साहित्याला 'दलित साहित्य' म्हणावे हा प्रश्न विवाद्यच आहे. मराठीतील उच्चभ्रू साहित्यसमीक्षकांच्या दलित साहित्याविषयी ज्या कल्पना आहेत, त्यांहून भिन्न कल्पना दलित साहित्यिकांना अभिप्रेत आहेत. त्यांच्या दृष्टीने हे भिन्नत्व त्यांच्या साहित्य स्वरूपाच्या वेगळेपणात आहे.

कोणत्याही साहित्यप्रकाराचे वेगळेपण त्याच्या अनन्यसाधारण विशेषत्वावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य इत्यादी.

वाङ्मय अथवा साहित्य या सर्वसाधारण संकल्पनेत जे जे अपेक्षित असते ते तर गुणवत्तेच्या दृष्टीने ग्रामीण व प्रादेशिक साहित्यात असलेच पाहिजे. परंतु त्यांचे म्हणून जे अनन्यसाधारण विशेषत्व असते ते 'ग्रामीण' 'प्रादेशिक' अशा विशेषणवाचक संज्ञांनीच अन्वर्थक झालेले असते. साहित्यकृतीत दिग्दर्शित झालेले जीवन, शब्दरूप झालेले अनुभव, अभिव्यक्तीचे माध्यम असलेली भाषा, हे सर्व अवश्यमेव 'ग्रामीण' व 'प्रादेशिक'च असले पाहिजे. ग्रामीणता अथवा प्रादेशिकता हा अशा साहित्याचा अविभाज्य स्वरूपघटकच मानला जातो. इतका की, प्रादेशिकता हे कलामूल्य मानावे की नाही, असा वादग्रस्त प्रश्नही त्यातून संभवतो. कोणत्याही साहित्यप्रकाराच्या वा प्रवाहाच्या वेगळेपणाला असे विशेषत्व असावे लागते.

दलित साहित्याचे असे अनन्यसाधारण विशेषत्व कोणते? सर्वसामान्य समजूत अशी की, ज्या साहित्यात दलित समाजाचे, त्याच्या जीवनाचे, सुखदुःखांचे, व्यथावेदनांचे, दैन्यदारिद्र्याचे, आशाआकांक्षांचे चित्रण केलेले असते ते म्हणजे दलित साहित्य; साहित्य म्हणून इतर सर्व गुणवैशिष्ट्ये त्यात अपेक्षित आहेतच. परंतु दलित समाजाचे जीवन हाच त्याचा अनुभवविषय असतो. म्हणजे त्यात एका अर्थी दलित समाजसापेक्षता अभिप्रेत आहे. म्हणूनच दलित साहित्य म्हणजे दलितांविषयीचे साहित्य, असा सामान्यतः अभिप्रेत अर्थ आहे. म्हणून वास्तविक हे साहित्य कोणी लिहिले, म्हणजे लिहिणारा दलितच आहे की मध्यमवर्गीय आहे, हे गौणच मानायला हवे. लिहिणाऱ्याने दलित समाजाच्या व्यथावेदनांना उद्गार दिलेला आहे की नाही, हेच वास्तविक महत्त्वाचे मानायला हवे. मार्क्सवादी लेखक बहुजन समाजाचे साहित्य अथवा जनवादी साहित्य Literature of people or masses या अर्थानेच वेगळे मानतात. कामगारवर्गीय वाचकांना उद्देशून एका संदर्भात प्लेखानोव्ह म्हणतो, "ज्यात तुमच्या स्वतःच्या व्यथांना, स्वतःच्या आशा-आकांक्षांना उद्गार लाभलेला आहे, असे तुमचेच काव्य, तुमचीच गीते, तुमचेच पद्य तुमच्यासाठी असले पाहिजे." लेनिनच्या साहित्यविषयक भूमिकेत 'प्रतिबिंब सिद्धान्ता'ला (Theory of Reflection) महत्त्व आहे, ते या अर्थाने की, बहुजन समाजाच्या वास्तव जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब साहित्यात उमटले पाहिजे.

श्रमिक-कामगार आणि 'दलित' हे समदु:खी, समपीडित, समशोषित आहेत. कामगारांच्या व्यथावेदनांना साहित्यात उद्गार लाभला पाहिजे, तसाच दलित समाजाच्या व्यथावेदनांना, आशा आकांक्षानाही उद्गार लाभला पाहिजे, हे महत्त्वाचे.

मराठी साहित्यातील ग्रामीण व प्रादेशिक वाङ्मयात असा उद्गार लाभला आहे. मध्यमवर्गीय जीवनाकडून बहुजनसमाजजीवनाकडे साहित्य वळले. (ही प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्वकाळात 'गांधीयुगा'तच दिसते.) तेव्हा जाणीवपूर्वक या व्यथावेदनांना शब्दरूप मिळू लागले. याची साक्ष श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग'मध्ये मिळतेच. 'माटे महार' अशी त्यांची चेष्टा झाली असली तरी दलित साहित्यिकांना त्यांचा कदाचित् अभिमानच वाटेल. मराठी साहित्यात एकटेच 'माटे महार' का ? असाही सवाल ते विचारू शकतील. तरीही माट्यांचे कथावाङ्मय हे 'दलित साहित्य' असे मानले जाणार नाही.

दलित साहित्याविषयी जी सर्वसामान्य समजूत सांगितली तीच दलित साहित्यिकांना अमान्य आहे. कारण त्यांच्या दृष्टीने ही समजूत सर्वसमावेशक व म्हणूनच अतिव्याप्त आहे. त्यांच्यामते 'दलितांविषयीचे साहित्य ते दलित साहित्य' ही व्याख्या मध्यमवर्गियांनी मध्यमवर्गियांच्या सोयीसाठी केलेली आहे. ज्ञानेश्वरापासून आजपर्यंत मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने दलित समाजाच्या व्यथावेदनांना उद्गार लाभलाच नाही, अशी दलितांची ठाम तक्रार आहे. आणि या तक्रारीतच त्यांच्या दलित साहित्याविषयीच्या अपेक्षा आहेत.

त्यांचे थोडक्यात म्हणणे असे : बहुतांशी मराठी साहित्य हे वर्णव्यवस्थेच्या चौकटीतच आहे. याच चौकटीत दलित समाज हजारो वर्षे पिसून पिचून निघत आहे. त्यांचा हुंकारसुद्धा साहित्याने टिपून घेतला नाही. त्यांच्याविषयी लिहिणारेसुद्धा याच चौकटीत स्वत:ची वर्णप्रतिष्ठा जपणारे उच्चवर्गीय होते व आहेत. त्यांनी दलितांचा हुंकार ऐकला नाही. आणि ऐकला असला तरी त्यांच्या वेदनेला अर्थ दिला नाही. थोडाफार कोणी असा प्रयत्न केला असेल, पण त्यात तळमळ नाही. कळकळ नाही. असे जे लेखन झाले असेल ते भूतदयावृत्तीने आणि दलितांविषयीच्या कोरड्या शाब्दिक सहानुभूतीने. केशवसुत, आगरकर, हरिभाऊ इत्यादींनी दलितांविषयी काही

लिहिले असले तरीही ते पारंपरिक समाजप्रवाहाच्या विरुद्ध उभे राहू शकले नाहीत.

वस्तुस्थिती खरोखरच अशा प्रकारची आहे काय, हे तपासून पाहता येईल. अर्वाचीन काळातील वैचारिक वाङ्मयात वर्णव्यवस्थेवर, जातिव्यवस्थेवर परखडपणे लिहिले गेले आहे. अगदी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारख्या साहित्य पंडितानेसुद्धा लिहिले आहे. हे लिहिण्यामागे सामाजिक परिवर्तनाचाच उद्देश होता. वर्णव्यवस्थेमुळे अभेद्य झालेल्या समाजस्थितीचा भेद केल्याशिवाय समाजात इच्छास्वातंत्र्य, समता, न्याय, सत्य हे गुण समृद्ध होणार नाहीत. परंतु असे काही लिहिले गले हे मानायला दलित साहित्यिक तयार नाहीत.

हे झालेच नाही असे म्हणत असताना त्यांनी त्यांच्यापुरती एक कसोटी निश्चित केली आहे. ती अशी की, अशा कोणाच्या लिहिण्यामुळे दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड झालेच नाही. अशा बंडाची प्रेरणा साहित्याने दिली नाही. साहित्यानेच जर समाजव्यवस्थेविरुद्ध बंड उभारले असते तर समाजातही तशा बंडाची प्रक्रिया घडून आली असती. परंतु ज्ञानेश्वरांनी वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणाराच धर्म टिकवला आणि रामदासांनीही ब्राह्मण धर्मच जागवला. शिवाजी मोगलांविरुद्ध लढला. पेशवे इंग्रजांविरुद्ध लढले. परंतु वर्णव्यवस्थारूपी अंतस्थ शत्रूच्या विरुद्ध जाणीवपूर्वक कोणी लढले नाही. संतवाङ्मयाने समाजाला निवृत्तीचा मंत्र दिला. त्यामुळे तर दलितांची मने अधिक दुबळी झालीत. समाजान्तर्गत लढ्यासाठी तो उसळून उभा राहू शकला नाही. यावरून हे लक्षात येईल की, दलित समाजाला वर्णव्यवस्थेच्याविरुद्ध जाणीवपूर्वक बंडप्रवृत्त करणे, ही गोष्ट 'दलित साहित्या'ला महत्त्वाची वाटते. म्हणूनच दलित साहित्यिक मराठी साहित्य परंपरेला चक्क नाकारतात. ही परंपरा आमची नाहीच अशी जी त्यांची दृढ भावना आहे, ती कितपत वस्तुनिष्ठ व तर्कनिष्ठ आहे हा प्रश्न वेगळा. परंतु भावना सहेतुक जोपासली जात आहे, असे दिसून येते. 'नकार' हा त्यांचा पहिला उद्घोष आहे. हा 'नकार' 'Negation'च्या स्वरूपाचा आहे की 'Rejection'च्या स्वरूपाचा? मार्क्सवादातील नकारतत्त्व (Theory of Negation) हे विकासपूरक

आहे. परंतु दलितांचा नकार असा विकासपूरक आहे असे वाटत नाहीं.

'आम्हीं नकार देतो ' ही दलितांची घोषणा आहे पण म्हणजे नेमके काय ? या घोषणेत फक्त मराठी साहित्याची परंपरा नाकारण्याची वृत्ती आहे. साहित्याला भाषिक परंपरा असते. साहित्याच्या विकासाबरोबर भाषेचाही विकास होतो. आणि पुन्हा विकसित भाषा साहित्याच्या विकासाला उपकारक ठरते. साहित्य आणि भाषा यांचा असा अन्योन्य व अतूट संबंध आहे. दलित साहित्यिक या भाषिक परंपरेला नकार देत नाहीत. म्हणजे त्यांची तक्रार आहे ती साहित्यातील आशयाविरुद्ध. साहित्याच्या इतर प्रकृतिवैशिष्टयांना ते नकार देत नाहीत. चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थे-विरुद्ध बंडप्रवृत्त करणारा आशय मराठी साहित्यात नाही. एवढीच त्यांची मकृद्दर्शनी तक्रार दिसते. हा आशय दलित लेखकांनाच द्यावा लागेल, अपेक्षित बंड दलितांनाच करावे लागेल; मराठी साहित्याची परंपरा स्वीकारली तर या बंडखोर प्रवृत्तोचे पोषण होणार नाही, असे त्यांना वाटते आणि तेवढ्यासाठी त्यांना नकार अपरिहार्य वाटतो.

नकाराबरोबर ते विद्रोहाचा पुरस्कार करतात. विद्रोह म्हणजे शत्रुत्व. पण हे शत्रुत्व नेमके कोणाशी ? उच्चवर्गीय समाजव्यवस्थेशी, मध्यमवर्गीय साहित्याशी की मध्यमवर्गीय लेखकांशी ? तेही नीटपणे स्पष्ट व्हायला पाहिजे मात्र 'विद्रोह' या शब्दातच काही विलक्षण मंत्रसामर्थ्य आहे, याची जाणीव त्यांना झाली आहे. हा शब्द त्यांच्या मनात पुरताच रुजला आहे. 'विद्रोही साहित्य', 'विद्रोही कविता' असे शब्दप्रयोगही रूढ होऊ लागले आहेत. 'दलितांविषयी' चे साहित्य ही सर्वसामान्य समजूत त्यांना मान्यच नाही. कारण त्यात त्यांची पृथगात्मता स्पष्ट होत नाही. त्यांच्या व्यक्तिविशेषत्वाची मुद्रा ठसविलेले साहित्य त्यांना अभिप्रेत आहे. म्हणून 'बंड, नकार आणि विद्रोह' या गोष्टींना ते महत्त्व देतात. या त्रयींचे अधिष्ठान असलेले दलितांविषयीचे साहित्य त्यांना अभिप्रेत आहे. बाबूराव बागूल हे या साहित्याचे प्रवर्तक मानले जातात. त्यांच्या 'सूड' या दीर्घ-कथेला डॉ. (कै.) म. ना. वानखेडे–दलित साहित्याचे, विद्रोही साहित्याचे एक समर्थक– यांनी विवेचक प्रस्तावना लिहिली आहे, त्यात दलित साहित्याचे प्रकृतिवैशिष्टच सांगितले आहे. 'दलित साहित्य म्हणजे दलित

लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य ', अशी भूमिका स्पष्ट करून पुढे ते लिहितात, ' दलिताला समाजापासून विभक्त व्हावयाचे आहे असा याचा अर्थ नाही. समाजात राहूनच त्याला हे करावयाचे आहे. फरक एवढाच की दयेच्या याचनेऐवजी हा लेखक आग ओकू पाहतो आहे. तीक्ष्ण हत्यार बरेचदा प्राण वाचवते. सडलेल्या भागाला कापून काढन पुनः माणूस बनवते. ही फुटीर वृत्ती नाही. उलट असत्यावर, ढोंगावर, अन्यायावर चिडीने आसूड मारणारी, समाजाला जोडणारी वृत्ती आहे.'

यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. दलितांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल प्रक्षोभ व्यक्त करावयाचा आहे. परंतु एकंदर समाजापासून विभक्त व्हायचे नाही. ' परंपरा ही नेहमी जुनीही असते व नवीनही ' असे विधान डॉ. वानखेडे यांनीच केले आहे परंपरेत जे काही जुने असते ते विद्यमान परिस्थितीत त्याचा नवा अन्वयार्थ लावून टिकविले जाते. आणि परंपरेत जे त्याज्य आहे ते टाकून नवे स्वीकारले जाते. असे नव्याजुन्यात ऐक्य साधूनच परंपरा समद्ध होते. दलित साहित्याला परंपरा समृद्ध करावयाची आहे की सर्वस्वी नवी परंपरा निर्माण करावयाची आहे ?

द्वंद्वात्मक विकासवादातही ही प्रक्रिया होत असते. परंपरा जुनीही असते म्हणजे नेमके काय ? परंपरेतील काही मूल्ये शाश्वत असतात. ती नाकारता येत नाहीत. त्यांचा नवा अर्थ लावावा लागतो. तेव्हा त्याला नवेपण येते. मर्ढेकरांचा उल्लेख करून डॉ. वानखेडे म्हणतात की, मर्ढेकरांनी परंपरेवर नाना हल्ले केले. हे खरेच आहे. परंतु मर्ढेकरांनी काव्याची नवी परंपरा निर्माण करताना तत्कालापर्यंतची मराठी साहित्यपरंपरा संपूर्णतया नाकारली असे म्हणता येणार नाही. उलट साहित्य परंपरेच्या अनेक प्रकृतिवैशिष्ट्यात त्यांनी नवे सामर्थ्य निर्माण केले. ( हे नवे सामर्थ्य नव्या आशयामुळे निर्माण झाले. केशवसुतांनीही असे सामर्थ्य निर्माण केले होते.) वानखेडे यांचे समर्थन असे की, मर्ढेकरांनी जे कार्य केले तेच कार्य बाबुराव बागूलांसारखे लेखक करू पाहतात. आता त्यांचे हे मत स्वीकारायचे असेल तर दलित साहित्यातल्या ' नकारा 'च्या उद्घोषाला थोडाफार छेद द्यावा लागेल. परंतु दलित साहित्यिकांनी त्या दिशेने अद्याप विचारच केलेला दिसत नाही.

बंड, विद्रोह, नकार, प्रक्षोभ या प्रवृत्तींबरोबरच आणखी एक सूर काही

दलित लेखकांच्या विचारसरणीतून उमटतो. त्यांच्याकडून काहीशी बेताल, बेजबाबदार आणि फड जिंकणारी विधाने केली जातात. असे लेखन सार्वकालीन परिणामकारकतेच्या दृष्टीने–आणि विशेषतः वाङ्मयीन दृष्टीला उपकारक ठरत नसते. परंतु त्याचीही नोंद घ्यावीच लागते. अशा लेखनातील एकूण विचारांचा निष्कर्ष असा की, हिंदु धर्म नष्ट झाल्याशिवाय या देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल नाही. 'बघू या तरुणांना कोण अडवतो ?' असे आव्हान देण्याचा प्रयत्न असतो. हिंदुधर्म संपूर्णतया नष्ट करण्यास दलित समाजाला बंडप्रवृत्त करण्याची प्रेरणा दण्याचे सामर्थ्य दलित साहित्यात असावे, अशी काही संतप्त दलित तरुणांची अपेक्षा आहे.

आतापर्यंतच्या विवेचनातून दलित साहित्यातील तीन प्रवृत्ती ध्वनित होतात.

१) बंड, नकार, विद्रोह आणि प्रक्षोभ यांचा जाणीवपूर्वक उद्घोष करण्याची प्रवृत्ती.

२) असत्य, अन्याय व ढोंग यावर चिडीने आसूड मारूनही समाजाला जोडणारी प्रवृत्ती.

३) हिंदु धर्म नष्ट करूनच देशाला उज्ज्वल भविष्यकाळ देऊ पाहाणारी प्रवृत्ती.

यांपैकी ज्या वृत्तीचे आणि विचारधारेचे अधिकाधिक पोषण होत जाईल, त्यावरच दलित साहित्याचे वाङ्मयीन भवितव्य निश्चित होईल.

० ० ०

दलित साहित्याचा विचार इथेच संपत नाही. उलट पुढे आणखी प्रश्न निर्माण होतात. अशा दलित साहित्यात नेमका कोणता दलित समाज अभिप्रेत आहे ? कारण ज्या समाजाची सापेक्षता साहित्याला लाभेल, त्या समाजाच्या स्वरूपावरही त्या साहित्याचे स्वरूप अवलंबून असते. म्हणून वरील विवेचनाच्या अखेरीस ज्या वृत्तींचा उल्लेख केला, त्या नेमक्या कोणत्या समाजाच्या संदर्भात ?

दलित ही व्यापकार्थी संज्ञा काही दलित लेखकांना आणि समीक्षकांना मान्य नाही. दलितांमध्ये ते हेतुपूर्वक भेद करतात. आर्थिक दृष्टचा दलित आणि सामाजिकदृष्टचा दलित; आणि दलित साहित्याच्या संदर्भात ते मुख्यतः

'सामाजिकदृष्टया दलितां' चा विचार करतात. उदाहरणार्थ, गिरणी कामगार हा आर्थिकदृष्टया दलित असेल, परंतु तो अस्पृश्यांसारखा सामाजिकदृष्टया दलित नसतो. तो उपेक्षित जिणे जगत असेल तर ते केवळ गरीब असल्यामुळे. तो आर्थिकदृष्टया दुर्बल म्हणूनच भांडवलदारांकडून त्याचे अधिक शोषण होते. या उलट अस्पृश्य हा विशिष्ट जातीत जन्माला आला म्हणून सगळाच उच्च वर्ग किंवा त्रिवर्ण त्याला तुच्छ मानतात. एखादा अस्पृश्य आर्थिकदृष्टया सुस्थितीत असला तरीही समाज त्याला 'महारोग्याप्रमाणे' तुच्छ मानतो. (पण शहरात तरी हा तुच्छतावाद काही प्रमाणात कमी होत आहे की नाही ?) त्यांच्यामते गिरणीकामगार हा नुसता आर्थिक शोषणाचा बळी आहे. परंतु आर्थिक दारिद्र्यापेक्षा ही सामाजिक तुच्छताच अधिक वेदना देणारी असते. अस्पृश्य हा तुच्छतेचा बळी आहे. म्हणून श्रमजीवी कामगार आणि अस्पृश्य हे एकाच अर्थाने पददलित आहेत असे म्हणता येणार नाही. 'आर्थिकदष्टया दलित आणि सामाजिकदृष्टया दलित हा भेद अपरिहार्यच आहे, असे दलित साहित्यिकांचे ठाम मत आहे. त्यांची भावना अशी की, आर्थिक विषमतेचा बळी असलेला अस्पृश्य हाच वास्तविक अर्थाने ' दलित '. म्हणून दलित साहित्य अशाच दलित समाजाचा कैपक्ष घेणार आहे.

सामाजिक विषमतेच्या मुळाशी आर्थिक विषमताच असते ही वस्तुस्थिती दलित साहित्यिक मान्य करणार आहेत का ? ( वास्तविक वर्णव्यवस्थेच्या मुळांशीही आर्थिक व्यवस्थेचा हेतू होता. ) त्यांची श्रध्दा अशी तर नाही ना की, वर्णव्यवस्थेची चौकट नुसती खिळखिळीच नाही तर पार मोडून नेस्तनाबूत केल्यानंतर जी वर्णरहित समाजव्यवस्था असेल तीत आर्थिक विषमता उरणारच नाही ? वर्णरहित समाजव्यवस्थेत माणूस हा ' माणूस ' म्हणून जगू शकेल. कारण मग त्याच्या ' माणूसपणा ' वर सतत आघात करणारे जातिनिहाय भेदाभेद उरणारच नाहीत. वर्णरहित समाजात ' माणसातल्या महानते ' च्या विकासाला सर्व दिशाच मोकळ्या होतील. वर्णव्यवस्थेच्या कोंडीत गुदमरणारे ' माणूसपण ' मुक्त करण्यासाठी मराठी साहित्याने आजवर काही केलेच नाही. परंतु वर्णव्यवस्थेतून मुक्त झालेला अस्पृश्य आर्थिक विषमतेच्या कोंडीतूनही कसा मुक्त होणार ?

वास्तविक कोणत्याही कोंडीतून प्रत्येक माणसाला ' मुक्ती ' हवी असतेच. आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्टया मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजूर आदिवासी, भटक्या विमुक्त जमाती आणि उपजीविकेसाठी श्रमणारे सगळेच, आणि अर्थातच अस्पृश्यही येतील. परंतु ही व्यापकता दलित साहित्यिकांना मान्य नाही. अर्थसंकोच करून वर्णव्यवस्थेच्या संदर्भात विचार करताना दलित साहित्याला अस्पृश्यांचीच मुक्ति अभिप्रेत आहे.

अर्थात् ' अस्पृश्य समाज ' असा शब्दप्रयोग जाणीवपूर्वक टाळला जातो. 'वर्णव्यवस्थेवर आधारलेल्या समाजरचनेत हजारो वर्षे पीडला गेलेला समाज' असा अन्वर्थक उल्लेख केला जातो. तरीही दलित साहित्यिकांना अभिप्रेत आहे तो पूर्वाश्रमीचा अस्पृश्य समाज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीनंतर अस्तित्वार्थ पावलेला नवबौद्ध समाज. म्हणून तटस्थपणे विचार केला तर नवशिक्षित व नवजागृत संतप्त तरुणांची ही दलित साहित्याची चळवळ ही एकाअर्थी नवबौद्ध साहित्यिकांची चळवळ ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने पहिले दलित लेखक, असे जे काही वेळा आग्रहाने म्हटले जाते त्याचा अर्थ मग स्पष्ट होऊ लागतो. वास्तविक बाबासाहेब हे जोतिबा फुले यांना गुरुस्थानी मानत होते. जोतिबांनी सर्वच लेखन दलितांविषयी व दलितांसाठी केले आहे. मग दलित साहित्याची परंपरा जोतिबांपासून का नाही ? वास्तविक आजचे दलित लेखक प्राचीन मराठी साहित्यावर जो आक्षेप घेतात त्याचे मूळ जोतिबांच्या विचारातच आहे. ब्राह्मणांचे वर्चस्व राहण्यासाठी महाराष्ट्र संतकवींनी साह्य केले, असे जोतिबांचे ठाम प्रतिपादन होते. म्हणजे दलित साहित्यिकांच्या विचारप्रणालीची परंपरा जोतिबा फुले यांच्यापासूनच मानता येण्यासारखी आहे.

डॉ. आंबेडकरांनी ललित लेखन केलेले नसेल, पण त्यांचे एकंदर विचारमंथन, त्यातून त्यांनी काढलेले निर्णयात्मक निष्कर्ष, त्यांची बंडखोर प्रवृत्ती, त्यातून आकाराला येऊ पाहणारे सामाजिक लोकशाहीचे तत्त्वज्ञान, हिंदु समाजव्यवस्थेच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी स्वीकारलेले बौद्ध धर्मतत्त्वज्ञान आणि आपल्या समाजाला नवजीवनाची दाखविलेली दिशा—

या सगळ्या कर्तृत्वातून ' माणसा 'च्या मुक्तीसाठी धडपणाऱ्यांना लेखनाच्या साहित्यनिर्मितीच्या नव्या जाणिवा, नव्या प्रेरणा लाभणे शक्य व संभवनीय आहे. डॉ. आंबेडकरांचे विचारधन त्यादृष्टीने खपच संपन्न व समर्थ आहे. वास्तविक कोणताही मानवतावादी लेखक या प्रेरणांचा स्वीकार करू शकतो मानवतेच्या प्रस्थापनेसाठी क्रांतिसिद्ध होऊ पाहाणाऱ्या पुरोगामी लेखकांनाही ते विचारधन प्रेरक ठरणारेच आहे.

इतरांना नसली तरी दलित लेखकांना ही जाणीव झालेली आहे. म्हणून ' केवळ दलित लेखकांनी दलितांविषयी लिहिलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य ' एवढेच त्यांना अभिप्रेत नाही तर ' दलित साहित्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विज्ञाननिष्ठ बौद्ध धर्मतत्त्वज्ञानाचे व सामाजिक लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असावे ' असेही त्यांना अभिप्रेत आहे. आणि हे जर खरे असेल तर मराठी साहित्यातील पारंपरिक विचारांना त्यांचा नकार आहे, त्यांचा विद्रोह उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय मनोवृत्तीविरुद्ध आहे, त्यांचा प्रक्षोभ वर्णव्यवस्थेमुळे होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आहे, आणि बंड समाजरचनेविरुद्ध आहे, हे सर्व अधिक स्पष्ट होऊ शकते.

दलित समाज या व्यापक संज्ञेचा अर्थसंकोच करून दलित साहित्याला नवबौद्ध समाजच अभिप्रेत असेल तर, आणि लिहिणारे हे त्याच समाजातले म्हणजे नवबौद्धच असावेत असा आग्रह असेल तर मग दलित साहित्याला ' नवबौद्ध साहित्य ' का म्हणू नये ? त्यांना अभिप्रेत असलेले साहित्य त्यांच्याशिवाय कोणी लिहू शकणार नाहीत असेही त्यांचे मत आहे. दलितेतरांनी कितीही तळमळीने लिहिले तरी त्यांचे लिहिणे कृत्रिम, प्रत्यक्षानुभूतींचा अभाव असलेले, आणि केवळ दयाबुद्धीने लिहिलेले; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाज स्वाभिमानी आहे म्हणूनच दलितेतराची भूतदया त्यांना मंजूर नाही. (' बौद्ध साहित्य ' शब्दावर कदाचित धार्मिक साहित्याचा अर्थारोप होण्याची शक्यता आहे. म्हणून तो स्वीकारला जाणे संभवनीय नाही. महाराष्ट्र बौद्धसाहित्य सभा आणि बौद्ध साहित्य परिषद अशा संघटना अस्तित्वात आहेत. परंतु नव्या पिढीतील बहुतांशी लेखक या संस्थांविषयी उदासीन आहेत. नव्या लेखकांना वरील सर्व विवेचनात उल्लेखिलेल्या दलित साहित्यासाठी वेगळी संघटना हवी आहे. वेगळे व्यासपीठ

हवे आहे. जमलेच तर वेगळे नियतकालिक हवे आहे. त्यांच्या वेगळ्या अस्तित्वार्थाला ते आवश्यक आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे.)

दलित समाजातल्या सर्वच लेखकांचे साहित्यही या नव्या विद्रोहवाद्यांना मंजूर नाही. कारण वर जी प्रकृति वैशिष्ट्ये सांगितली आहेत, त्या निकषावर सर्वांचेच साहित्य उतरत नाही. उदा. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य दलित साहित्य मानावे की नाही' याविषयी मतैक्य नाही. कारण अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याला मार्क्सवादाचे व साम्यवादाचे अधिष्ठान आहे. त्यांनी जाणीवपूर्वक बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाला कोठेही उद्गार दिलेला नाही. (अर्थात हेही तितकेसे खरे नाही.) म्हणूनच राम रावण नीतीने वागणारी त्यांची पात्रे वर्णव्यवस्थेवर तुटून पडत नाहीत. (वस्तुतः 'रामादिवत् प्रवर्तितव्यं न रावणादिवत्, इत्यादी प्रवृत्तिनिवृत्त्युपदेश' हे साहित्याचे प्रयोजन कधीच इतिहासजमा झाले आहे.) समाजरचनेविरुद्ध कधीच बंड करीत नाहीत. शंकरराव खरात वगैरेंचे लेखन पांढरपेशी मध्यमवर्गीय मनोवृत्तीतूनच झालेले आणि ही मनोवृत्ती बाबासाहेबांच्या प्रेरणेतून आकाराला येऊ पाहाणाऱ्या बंडखोरीला मुळातच दुबळी करणारी आहे आणि प्रा. मेश्राम, बोराडे, ग्रेस इत्यादी उच्चभ्रू समीक्षकांनी यशस्वी मानलेल्या कवींनी कोठेही नवबौद्ध समाजाच्या समस्यांना जाणीवपूर्वक स्पर्श केलेला नाही. हिं. गो. बनसोडे यांच्या 'मुक्तिसंग्राम' कादंबरीत धर्मांतरानंतरचा अनुभव शब्दरूप झाला. पण कादंबरीचा नायक मध्यमवर्गीय मनोवृत्तीचा आहे, अशी टीका दलितांकडूनच होते. हरिभाऊ पगारे यांचे लेखनही आक्षेपार्हच मानले जाते. हे सगळेच आरोप बोलके आहेत. 'दलित साहित्या'ला वेगळे काय हवे आहे, ते अशा आरोपातूनही ध्वनित होते. अशा सगळ्या नकारांतून काही साहित्य वजा केले तर प्रश्न उरतो की, प्रत्यक्षात अभिप्रेत दलित साहित्य कितीसे लिहिले गेले? बाबुराव बागूल हे नवीन दलित साहित्याचे अध्वर्यू आणि त्यांचे हे कार्य मर्ढेकरासारखे आहे, हा डॉ. वानखेडे यांचा अभिप्राय आहे. म्हणजे बागूल हेच खऱ्या अर्थी दलित साहित्याचे प्रेरक व प्रवर्तक मानायला हवेत. अनेक तरुण लेखक त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेत आहेत. आणि हे होत असतानाच दुर्दैवाने दलित समाजातलेच काही हितसंबंधी त्यांच्यावर ते

कम्युनिस्ट विचारसरणीचे म्हणून टीका करतात. म्हणजे ज्या समाजासाठी व समाजाविषयी बागूल लिहितात त्याच समाजात त्यांना विरोधक आहेत. याची कारणे काहीही असतील. वस्तुस्थिती अशी आहे. निदान बागूलांच्या बाबतीत असे का व्हावे? वास्तविक त्यांची विचारसरणी ही इतरांहून अधिक व्यापक आहे. साम्यवादी विचारांकडे त्यांचा कल असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत ते मनःपूर्वक अतिशय निष्ठावंत आहेत. नकार, विद्रोह, प्रक्षोभ इत्यादींचा पुरस्कार ते करतात. दलितां- विषयी लिहितात पण अखेर व्यापक मानवता आणि माणसातली महानता यांसाठी कमालीचे अस्वस्थ होऊन लिहितात. त्यांची बेचैनी मानवतावादी लेखकाची आहे. त्यांच्या व्यक्तित्वाला, व्यक्तिमत्वाला आणि त्यांच्या लेखनाला 'दलित साहित्य' या शब्दाने सीमित करणे उचित होणार नाही. दलित या संज्ञेच्या व्यापककार्याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. मात्र त्यांना अभिप्रेत असलेला दलित साहित्य संप्रदाय ते निर्माण करू शकले नाहीत. कदाचित दलित साहित्याची संकलपना निश्चित झालेली नसावी.

० ० ०

दलित साहित्यात सर्वार्थाने वेगळेपण अपेक्षित आहे. दलित लेखक दलितेतर मध्यमवर्गीय लेखकापेक्षा वेगळा तसाच तो मार्क्सवादी लेखका- हूनही वेगळा आहे, असे आग्रहाने सांगितले जाते. पण दोघांच्याही भूमिका तपासून पाहण्याचा फारसा प्रयत्न झालेला नाही. मात्र मार्क्सवादी साहित्य आणि दलित साहित्य यात फरक आहे असे सांगितले जाते.

शोषणमुक्त आणि वर्गरहित समाजरचनेसाठी मार्क्सने काही तत्त्वज्ञान निश्चित केले. अशा समाजरचनेत आर्थिक विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित होईल, माणसाला माणूस म्हणून जगता येईल. लोकशाहीनिष्ट समाजवादासाठी, शोषणमुक्त समाज रचनेसाठी मार्क्सवादाचा पुरस्कार, आणि त्या दिशेने समाज घडविण्यासाठी मार्क्सवादी साहित्याचे समर्थन केले जाते.

डॉ. आंबेडकरांना वर्णरहित व तुच्छतामुक्त समाजरचना हवी होती. अशा समाजात सर्वांनाच न्याय्य हक्क मिळतील. सामाजिक विषमता नाहीशी झाली की शिक्षणाने, सुसंस्कृतपणामुळे, न्याय्य हक्काच्या उपभोगामुळे

दारिद्र्यही नष्ट होईल. आर्थिक विषमताही नष्ट करता येईल. केवळ अस्पृश्यांनी बौद्धधर्म स्वीकारला; पण भारतात वर्णरहित समाजरचना असावी आणि सामाजिक लोकशाही असावी ही त्यांची तळमळ होती.

मार्क्सने आपल्या तत्त्वज्ञानात अनेक प्रकारचे अंतर्विरोध स्पष्ट करून सांगितले आहेत. परंतु सोविएत कम्युनिस्ट पक्षाने शोषणमुक्त समाजरचनेसाठी 'आर्थिक विषमता' या एकाच अंतर्विरोधावर भर दिला. भारतीय कम्युनिस्टांनी ऐतिहासिक भौतिकवादाचा पुरस्कार केला परंतु भारतीय इतिहासाचा अन्वयार्थ लावताना केवळ आर्थिक विषमतेवर भर दिला. डॉ. आंबेडकरांचा भारतीय कम्युनिस्टांना एक प्रश्न होता, 'भारतीय प्रोलिटारिएट गरीब निःसंशय आहे, परंतु तो गरीब आणि श्रीमंत यांशिवाय दुसरे भेद मानतच नाही का? जर तो मानत असेल तर त्याच्याकडून भांडवलदाराविरुद्ध ऐक्याची अपेक्षा तुम्ही कितपत करू शकता?' वर्गविग्रह आणि आर्थिक क्रांती झाल्यावर इतर अंतर्विरोध आपोआप नष्ट होतील, हा कम्युनिस्टांचा भ्रम होता. म्हणून डॉ. आंबेडकर तिकडे झुकले नाहीत त्यांच्या विचारप्रणालीनुसार मार्क्सवादाच्या दृष्टिकोनातून समाजरचनेचे विश्लेषण करताना भारतीय समाजरचनेतील सगळेच अंतर्विरोध लक्षात घ्यायला हवे होते. म्हणजे वर्गलढ्याबरोबर वर्णलढाही संघटित करायला हवा होता. आणि त्यासाठी भारतीय समाजव्यवस्थेच्या संदर्भात मार्क्सवादाचा अन्वयार्थ लावायला हवा होता. मार्क्सवादाचा पुरस्कार करूनही लेनिनला 'सोवियत तत्त्वा'चा आग्रह धरून मार्क्सवादाचा अन्वयार्थ लावावा लागला. भारतीय कम्युनिस्टांनी भारतीय म्हणून कोणत्याच तत्त्वांचा अन्वयार्थ लावला नाही. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांची मीमांसा करताना आजही कॉ. डांगे 'ऐतिहासिक भौतिकवादाच्या नियमाना अनुसरून विषमता आणि दमन यापासून मानवाला आपली मुक्तता भांडवलशाही नष्ट केल्यानंतरच करून घेता येईल,' असे प्रतिपादन करतात. ज्या काळात आपल्या देशात मार्क्सवाद रुजत होता, त्याच काळात डॉ. आंबेडकर सामाजिक लोकशाहीच्या दृष्टीने भारतीय तत्त्वांचा अन्वयार्थ लावीत होते. आणि त्यातूनच समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता यांवर अधिष्ठित असे सामाजिक तत्त्वज्ञान त्यांनी सिद्ध केले.

मार्क्सने सिद्ध केलेल्या विचारप्रणालीला मार्क्सवाद म्हटले तर डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीला 'आंबेडकरवाद' म्हणावयास हरकत नसावी. (पण काही मार्क्सवादी म्हणविणाऱ्या लेखकांना तेही मानवत नाही.) जनवादी साहित्याला मार्क्सवादाचे अधिष्ठान मिळावे असे मार्क्सवादी लेखकांना वाटते. त्याचप्रमाणे दलित साहित्यिकांना आपल्या साहित्याला 'आंबेडकरवादा'चे अधिष्ठान हवे आहे. हे मान्य असेल तर मग दलित साहित्यातील नव्या जाणिवा, नव्या प्रेरणा म्हणून ज्या गोष्टींचा आग्रह धरला जातो, त्या यथार्थ व अन्वर्थक वाटतील. पण मग बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान पूर्णतयाच स्वीकारावे लागेल.

दलित समाजातील एक विद्वान एका परिसंवादात म्हणाले, 'मार्क्सवादी लेखकांना रक्तरंजित क्रांती हवी आहे. पण दलित लेखकाला रक्तविहीन क्रांती हवी आहे. म्हणून या दोघांची तुलनाच होऊ शकत नाही.' अशा प्रकारची विधाने भ्रामक असतात. या विधानांचा उगम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मार्क्सवाद आणि बुद्धवाद' यात केलेल्या तुलनेत आहे. पण वास्तविकत: कोणत्याही साहित्यिकाला रक्तरंजित क्रांती नको असते. ज्या मानवी गुणांमुळे समाजाचे परिवर्तन होईल, त्या गुणांचा तो उपासक असतो अपरिहार्यपणे एखादी क्रांती रक्तलांछित होते. परंतु ध्येयोद्दिष्ट म्हणून कोणी अशा क्रांतीचा जाणीवपूर्वक पुरस्कार करणार नाही. केवळ मार्क्सवादी लेखकांपेक्षा दलित लेखक हा अधिक मानवतावादी असतो, असे सिद्ध व्हावे म्हणून अभिनिवेशापोटी अशी दूषणे लावली जातात.

दलित लेखक बंड, नकार, विद्रोह आणि प्रक्षोभ प्रमाण मानतात आणि—

ज्यांनी केली चूक इथे जन्म घेण्याची
त्यांनीच ती सुधारली पाहिजे.
देश सोडून ! अथवा भीषण युद्धे करून.

असा भीषण युद्धांचाच अंतिम पर्याय त्यांच्याकडे असेल तर अपरिहार्य म्हणून दलित लेखकही रक्तरंजित क्रांती जाणीवपूर्वक टाळतील असे नाही. शिवाय अशा सर्वच उद्‌घोषणात रक्तरंजित क्रांतीची बीजे लाक्षणिक अर्थाने असतातच. 'रुधिराच्या लाल सड्यातच' असे एखाद्या साम्यवादी कवीने म्हटले असेल. परंतु वाच्यार्थाने त्याला रक्तपात हवा आहे, असे

म्हणणे योग्य नाही. अखेरीस दलित साहित्याचे वेगळेपण त्याच्या वाङ्मयीन गुणवत्तेवरच ठरणार आहे.

वास्तविक मार्क्सवादी लेखक आणि दलित लेखक यांच्या भूमिका खूपच समांतर आहेत. आर्थिक विषमता नष्ट होण्यासाठी मार्क्सवादी लेखक शोषणसंबंधावर आधारलेली भांडवलशाही नेस्तनाबूत होण्याची स्वप्ने पाहतो. सामाजिक विषमता नष्ट होण्यासाठी दलित लेखक हिंदुसमाजातील वर्णव्यवस्था नेस्तनाबूत होण्याची स्वप्न पाहतो. माणूस शोषणमुक्त व्हावा असे मार्क्सवादी लेखकाला वाटते. माणूस तुच्छतामुक्त व्हावा असे दलित लेखकाला वाटते. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. त्याच्यातल्या महानतेच्या विकासासाठी सर्व दिशा मोकळ्या झाल्या पाहिजेत. असे दोघांनाही वाटते. ' माणूस ' हाच साहित्याचा केंद्रबिंदू असे दोघेही मानतात. एक मार्क्सवाद प्रमाण मानतो, तर दुसरा आंबेडकराचे विचार तत्त्वज्ञान प्रमाण मानतो. एक सोविएतमध्ये आपल्या प्रेरणांचा शोध घेतो, तर दुसरा अमेरिकन नीग्रो चळवळीत. मार्क्सवादी लेखक सोविएत कामगाराशी आपले नाते जोडतो, तर दलित लेखक नीग्रो पददलितांशी आपले नाते जोडतो. दोघांनाही एतद्देशीय समाजव्यवस्थेत क्रांती हवी आहे, परिवर्तन हवे आहे. परतु परप्रेरित निष्ठा एतद्देशीय समाजक्रांतीला कितीशा उपकारक ठरतील याचे भान दोघांनाही नाही. दोघांतील हे साम्य दुर्लक्षणीय नाही. वाङ्मयीन वृत्तिप्रवृत्तीच्या प्रेरणा व जाणिवा कोणत्याही जागतिक वाङ्मयातून अवश्य घ्याव्यात. परंतु समाजक्रांती जर गतिमान करावयाची असेल तर त्या जाणिवांना व प्रेरणांना एतद्देशीय जीवनाच्या अनुषंगाने अर्थ दिला पाहिजे.

" मला या देशाचे वाटोळे करावयाचे असते तर पाच वर्षांत मी करू शकलो असतो. " हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्गार अर्थपूर्ण आहेत. हजारो वर्षांच्या अन्यायाची जखम उरीपोटी बाळगूनही एतद्देशियत्वाचा विसर त्यांना पडला नाही म्हणून नवसमाजरचनेसाठी, सामाजिक लोकशाहीसाठी त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नाही, इस्लामधर्म स्वीकारला नाही. भारतातच ज्याचा उद्गम आहे, त्या बुद्धधर्माचा स्वीकार त्यांनी केला. बुद्ध आणि मार्क्स यांची तुलना करून आपल्यापरीने त्यांनी बुद्धाला मार्क्सपेक्षा श्रेष्ठ ठरविले. नीग्रो पददलितांशी नाते जोडून

नव्या जाणिवा, नव्या प्रेरणा स्वीकारताना बाबासाहेबांच्या तात्त्विक विचारांना काही छेद तर द्यावा लागणार नाही ना ? याचेही भान दलित लेखकांनी ठेवायला हवे. ज्यांना हे भान आहे त्यांच्यावर कम्युनिस्ट म्हणून अकारणच शिक्का मारला जातो.

लेनिनलासुद्धा एतद्देशियत्वाच्या अनुषंगाने मार्क्सवादाचा अन्वयार्थ लावावा लागला. कोणत्याही तत्त्वज्ञानाला विद्यमान परिस्थितीत नवा अन्वयार्थ देणारे विचारवंत हवे असतात. मार्क्सवादी लेखकांनाही लेनिनवादाचा, स्टॅलिनवादाचा अन्वयार्थ लावावा लागेल; जर जाणीवपूर्वक मार्क्सवादी साहित्याचा पुरस्कार करावयाचा असेल तरच ! आणि विद्रोही साहित्याचा पुरस्कार करताना प्राप्त परिस्थितीत बाबासाहेबांच्याही तत्त्वज्ञानाचा अन्वयार्थ लावावा लागेल. हा सगळा तात्त्विक विचार गंभीरपणे दलित समाजातले तरुण लेखक करणार आहेत का ? हा प्रश्नच आहे. क्रांतीसाठी काही तत्त्वज्ञान असावेच लागते. साहित्य, वृत्तपत्रे, भाषणे इत्यादी माध्यमातून ते तत्त्वज्ञान जनमानसात भिनवावे लागते. नुसती बंडाची भाषा बोलून बंडाळी माजते, पण क्रांती होत नाही. त्यासाठी समाजाला क्रांतिप्रवण करावे लागते. त्यादृष्टीने पूर्वतयारीच्या काही खुणा दलित साहित्यात दिसतात का, याचाही शोध घ्यावा लागेल.

° ° •

मध्यमवर्गीय लेखक– दलित लेखक; मध्यमवर्गीय साहित्य, दलित साहित्य– असा पंक्तिप्रपंच साहित्यक्षेत्रात नसावा. हे तुमचे, हे आमचे, हा प्रकार नसावा, अशीही एक मतधारा आहे. अखेर साहित्य ही एक सामाजिक सांस्कृतिक घटना आहे. तशीच ती सार्वजनिक मालमत्ता आहे. मध्यमवर्गीय लेखकाने दलितांविषयी लिहिले तर ते दयाबुद्धीने लिहिले म्हणून नाकारणे वास्तविक अयथार्थच ठरेल. कोणताही लेखक केवळ दयाबुद्धीने लिहीत नाही. नाहीतर लेखन हे नुसते सांत्वनपर झाले असते. कलावंत लिहितो सहृदयतेने. कोणत्याही कलाकृतीचा अस्सलपणा त्याच्या सहृदयतेवर ठरत असतो. कोणत्याही वृत्तीशी, घटनेशी, गोष्टीशी व्यक्तीशी समरसून जाण्याची, जिवांची इंद्रिये करून तादात्म्य होण्याची वृत्ती सहृदयतेला नितांत आवश्यक असते. किंबहुना ही वृत्ती म्हणजेच एकाअर्थी सहृदयता असे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीही म्हटले. एखाद्या प्राध्यापक लेखकाने

कारकुनाचे चित्र रेखाटले आणि त्याच्या जीवनातली अगतिकता शब्दरूप केली तर कारकूनही म्हणू शकेल की, माझ्या जीवनाचा, माझ्या व्यथा वेदनांचा प्राध्यापकाला काय अनुभव ? त्याने हे केवळ दयाबुध्दीने भूतदयेने लिहिले आहे. तर आपण कारकुनाचे म्हणणे निःसंशय हास्यास्पद मानू. साहित्यात अनुभूतीची अभिव्यक्ती असते. वेगळ्या वेगळ्या पातळीवर कलावंत वेगवेगळे अनुभव घेत असतो. अनुभव घेण्याच्या विविध परी आहेत. कलावंत प्रतिभेद्वारे आणि कल्पकतेद्वारे परकायाप्रवेश करतो तसाच परचित्त प्रवेशही करतो.

विद्यमान परिस्थितीत सर्वत्रच सामाजिक दुरवस्था आहे. ' दुरवस्थेने अम्हा घेरियले ! ' ही जाणीव केशवसुतांनीही सहृदयतेने व्यक्त केली होती. समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने साहित्य काही करू शकेल असा विश्वास केवल कलावादी साहित्य देऊ शकत नाही. तरीही नव्या पिढीत साहित्य समाजाभिमुख असावे, जीवनमूल्ये आणि कलामूल्ये यांचा समन्वय साधला जावा ही जाणीव रुजत आहे. ही जाणीव मार्क्सवादी लेखकात आहे तशीच दलित लेखकातही आहे. समाजपरिवर्तनासाठी ' बदल हवा ' ही जाणीव अमरशेखला होती. ही जाणीव नारायण सुर्वे यांना आहे. बाबुराव बागूल यानाही आहे. फक्त एवढेच की प्रत्येकजण एकमेकांना नाकारून वेगवेगळ्या वाटेने जाऊ पहात आहे. दलित आणि दलितेतर एकमेकांना असेच नाकारणार आहेत काय ? त्यामुळे कदाचित पृथगात्म साहित्यनिर्मिती होईल. परंतु ज्या समाजपरिवर्तनाची अपेक्षा आहे ती अपेक्षा साहित्याकडून पूर्ण होणार नाही.

समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने साहित्याने काही करावे ही काळाची गरज आहे. साम्यवाद आणि आंबेडकरवाद यांच्या समन्वयाने भारतीय समाज जीवनाला हितकारक असे नवे तत्त्वज्ञान वास्तविक नव्या पिढीने स्वीकारायला हवे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारायला हवा. महान मानवतेचा पुरस्कार करायला हवा. अशा समन्वयवादी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान साहित्याला देऊन साहित्य हे जाणीवपूर्वक समाजपरिवर्तनाचे समर्थ साधन बनवायला हवे. कादंबऱ्यांचे नायक अशा तत्त्वज्ञानाचे आकांक्षी असावेत. कवितेतल्या शब्दानी समाजातली मरगळ नाहीशी व्हायला हवी. अतिभेदक भीषण वास्तवापेक्षा भवितव्य घडविणारा आशावाद हवा. कला या दृष्टीने

साहित्य म्हणजे केवळ करणात्मक वास्तवाचा अभ्यास नसतो तर एकाअर्थी आदर्श सत्याचा तो शोध असतो. वास्तवाच्या अन्वयार्थातून जेव्हा कलावंत असे आदर्शसत्य शोधतो तेव्हाच तो समाजाला जीवनाची नवी दृष्टी देऊ शकतो. उद्याच्या समाजाला हे असले साहित्य हवे आहे. गतकालीन वास्तवाचा मागोवा घेऊन कलावंताने वर्तमानकालीन वास्तवाचा अन्वयार्थ लावला पाहिजे. आणि तो लावताना भविष्यकालीन वास्तवाचा आशयशोध घेतला पाहिजे. ही जबाबदारी दलित आणि दलितेतर अशा सर्वच लेखकांची आहे.

विद्यमान साहित्य संप्रदायातील साहित्यिक–समीक्षक या बाबतीत काही करतीलच ही अपेक्षा नाही. सौंदर्यवाद, केवलवाद, आकृतिवाद हा घोळ त्यांनी खुशाल घालावा. तो त्यांचा 'प्रकृतिधर्म' आहे. 'गूढवाद, आकृतिवाद, प्रकृतिवाद आणि 'कलेसाठी कला' 'वास्तवापासून पलायन' इत्यादीत कलेची अवकळाच आपला उद्‌गार शोधत असते. या सर्व वादांचे समर्थन करणाऱ्यांची एक समान वृत्ती अशी असते की, 'ते समकालीन सामाजिक वास्तवतेकडे, कल्पनांकडे आणि चळवळीकडे पाठ फिरवून असतात. हे Plekhanov चे मत अन्वर्थकच आहे.

विश्ववास्तवातील अनुभूतीच्या उदंड गप्पा मारूनही हे सगळे 'वादी प्राप्त परिस्थितीतील सामाजिक वास्तवाला, सामाजिक संघर्षाला आणि समस्यांना स्पर्श करतीलच असे नाही. म्हणून काळाची गरज ओळखून पुरोगामी साहित्यिकांनाच ही जबाबदारी पत्करावी लागेल.

'एखाद्या लेखकाची कलाकृती जेव्हा अशा एका वर्गाच्या हितसंबंधावर आधारलेली असते,–की जो वर्ग प्राप्तकाळात संपूर्ण समाजाला प्रगतीची दिशा दाखवू शकतो,–आणि जेव्हा ती समाजवादाच्या विचार प्रणालीचे व्यापक साधन बनते तेव्हाच ती कलाकृती पुरोगामी मानली जाते.' हा Plekhanov चा अभिप्रायही यथार्थच आहे.

मार्क्सवादी विचारप्रणालीशी प्रामाणिक राहून नारायण सुर्वे कामगार वर्गाच्या हितसंबंधांवर आपली कविता लिहितील तर ते पुरोगामी ठरतील आणि त्याच भूमिकेवरून बाबुराव बागुलही दलितांविषयी लिहितील तर ते पुरोगामी ठरतील. कारण शेवटी पुरोगामी लेखकाला माणसातली

महानता शोधावयाची असते.

आजचा सगळाच तरुण या ना त्या प्रकारे विफल आहे आणि तितकाच तो संतप्तही आहे. अस्वस्थ आहे. सगळे बदलले पाहिजे या चिडीने प्रस्थापितांविरुद्ध बंड करण्यास तो प्रवृत्त आहे. भिंतीवर डोके आपटून भिंत तरी पाडू किंवा डोके फुटून आत्मनाश तरी करून घेऊ, अशा अगतिकावस्थेपर्यन्त तो जाऊन पोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अशावेळी साहित्याने काय करावे? प्रत्येकाने आपली भूमिका वारंवार तपासून पहाणे आणि त्या अनुषंगाने वाटचाल करणे हा तूर्त एक मार्ग साम्यवादी आणि दलित लेखकांसाठीं आहे. परंतु उद्या तेवढ्याने कदाचित भागणारही नाही. नवे विचार–तत्त्वज्ञान देऊन नवी उमेद निर्माण करावी लागेल. वरील विवेचनातील एका संदर्भात मी मार्क्सवाद व आंबेडकरवाद यांच्या समन्वयाचा उल्लेख केला. हा विचार अनेकांना भ्रामक वाटेल. माझ्या मते दोन्ही विचारप्रणाली आपआपल्या परीने परिपूर्णच आहेत. परंतु विद्यमान परिस्थितीच्या संदर्भात दोहोंच्या समन्वयाची आवश्यकता आहे. त्यातून सिध्द होणारे नवे दर्शनच कदाचित समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला नेमकी दिशा देऊ शकेल. आणि एतद्देशीय समाजजीवन व्यवस्थेचा अन्वयार्थ लावण्यासाठी मार्क्सवादाचे यथातथ्य उपयोजन केले गेले तर हे शक्य व संभवनीय आहे.

(‘सत्यकथा,’ जुलै १९७०)

✻ ✻

# दलित साहित्य : बंडखोरी अपरिहार्यच

दलित साहित्य हे मराठी साहित्याचेच एक रूप आहे. निर्विवादपणे हे मान्य व्हायलाच हवे आणि एका अर्थी बंडखोर प्रवृत्तीचे साहित्य म्हणून त्याचा स्वीकारही व्हायला हवा. दलित साहित्यिकांनी घेतलेली भूमिका विद्रोहाची व नकाराची आहे. त्यांचा विद्रोह चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेशी आहे, तसाच परंपरेने चालत आलेल्या आणि प्रस्थापित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठी साहित्याशीही आहे. समाज व्यवस्थेतील ज्या वृत्तिप्रवृत्ती दलित समाजाच्या हितसंबंधाला विघातक आहेत त्या वृत्तिप्रवृत्तींना दलित साहित्यिक ठाम नकार देतात. त्याचप्रमाणे मराठी साहित्याच्या व्यवहारातील व उपक्रमातील ज्या वृत्तिप्रवृत्ती दलित साहित्यिकांना अहितकारक वाटतात त्यांनाही त्यांचा ठाम नकार आहे. समाजव्यवस्थेविरुद्ध आणि प्रस्थापित मराठी साहित्याविरुद्ध त्यांची ही अपरिहार्य म्हणावी अशी बंडखोरीच आहे.

मराठी साहित्याविषयी त्यांच्या काही तक्रारी आहेत. त्या तक्रारींचा यथायोग्य विचार करण्यापूर्वी, त्या तक्रारींना विरोध करण्यापूर्वी अथवा त्या तक्रारी समजून घेण्यापूर्वी प्रथम दलित साहित्यिकांची ही भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने दलितांची अस्मिता जागृत झाली. तेव्हापासून सर्वस्वी वंचनेची जाणीवही त्यांना प्रकर्षाने होत

गेली. तत्पूर्वी वंचनेची जाणीव नव्हती असे नाही परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या जाणिवेला नेमका आशय व अर्थ प्राप्त करून दिला आणि समाजव्यवस्थेविरुद्ध, त्याचप्रमाणे समाजव्यवस्थेचे नियामक, शास्ते आणि शोषक असलेल्या ब्राह्मण वर्णाविरुद्ध त्यांनी संघर्ष उभा केला. वास्तविक हा संघर्ष त्रिवर्णाविरुद्ध होता. कारण चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज व्यवस्थेत या त्रिवर्णांना काही हक्क लाभले होते. उलट दलितांच्या बाबतीत मात्र माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी जे मूलभूत हक्क असतात तेच नाकारण्यात आले होते आणि ते मिळविण्यासाठी दलितांचा प्रखर संघर्ष होता हे हक्क सहजासहजी मिळत नसतील, कायदे करूनही मिळत नसतील तर समाज व्यवस्थाच मोडण्यासाठी म्हणून दलितांचा लढा आहे हक्क मागून मिळत नाहीत ते लढवूनच मिळवावे लागतात असा अनुभव आहे. म्हणून ही समाजव्यवस्था आमची नाही, ज्या धर्माचे अधिष्ठान या समाजव्यवस्थेला आहे तो धर्म आमचा नाही, या धर्माने व समाजाने प्रमाण मानलेली मूल्येही आमची नाहीत अशी नकाराची भूमिका घेऊन समाजव्यवस्थेच्या विरुध्द दलित उभे आहेत. न्याय्य हक्कासाठी हा विरोध आहे हे समजून घेतले, तर मराठी साहित्याविषयीची त्यांची विद्रोहाची व नकाराची भूमिकाही समजू शकते.

एकंदरीत साहित्य म्हणून जे आपण म्हणतो ते एकाअर्थी अव्याख्येय आहे. म्हणून मूलतः साहित्याची नेमकी निर्णायक आणि प्रमाण अशी व्याख्या देता येणे अशक्य आहे आणि तरीदेखील एक गोष्ट सर्वसंमत झालेली आहे की, माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. अगदी समाजवादी वास्तववादाचा पुरस्कार करताना मॅक्झिम गॉर्कीनेदेखील 'Man is the material of literature' असे म्हटले. म्हणून माणसाच्या व तो ज्या समाजात रहातो त्या समाजाच्या जीवनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते. मानवी जीवनातल्या सुखदुःखात्मक अनुभवांचे दर्शन साहित्यात घडत असते आणि हे जर खरे असेल तर मग स्वाभाविकच प्रश्न असा निर्माण होतो – सात आठशे वर्षांची परंपरा असलेल्या मराठी साहित्यात दलितांच्या जीवनाचे, त्यांच्या सुखदुःखात्मक अनुभवांचे

त्यांच्या इच्छा आकांक्षा अपेक्षांचे कितीसे प्रतिबिंब उमटले ? कितीसे दर्शन घडले ? या प्रश्नाचे विधायक उत्तर मिळणे फारसे शक्य नाही. अप-वादात्मक स्वरूपात जे काय थोडेफार दर्शन घडले असेल ते एक तर सहानुभूतिपोटी किंवा भूतदयेपोटी घडलेले असेल. परंतु सात आठशे वर्षांच्या कालखंडातील मराठी साहित्याने दलित समाजाचे जीवन, त्यांचे अनुभव, त्यांची सुखदुःखे हा जाणीवपूर्वक साहित्याचा विषय मानलाच नाही.

लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य गवसलेल्या दलित साहित्यकांना पहिली तीव्रतेची जाणीव हीच झाली की परंपरेने चालत आलेल्या मराठी साहित्यात दलित समाजाला स्थान नाही. साहित्यातही हा समाज 'गावकुसा-बाहेर' चाच मानला गेला. चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेत दलितांची जी अवस्था तीच मराठी साहित्यातही; मराठी साहित्यात आम्ही दिसतच नाही ही दलितांची प्रतिक्रिया अन्वर्थकच होती आमचे जीवन, आमचे अनुभव, आमची सुखदुःखे, आमच्या आशा-आकांक्षा, आमची स्पंदने, आमचे हुंकार मराठी साहित्याने शब्दरूप केलेच नाहीत; मराठी साहित्य हे मध्यम वर्गाने, मध्यमवर्गाविषयी व मध्यमवर्गासाठीच निर्माण केलेले आहे म्हणून त्या साहित्यातून जे जीवनदर्शन घडते त्या जीवनाशी आमचा सांधाच जुळू शकत नाही. या साहित्याला ठाम नकार देऊन दलितांनी, दलितांविषयी व दलितांसाठी निर्माण केलेले साहित्य आवश्यक आहे. आम्ही जे भोगले, जे अनुभवले, जे सोसले ते आम्हीच शब्दरूप केले पाहिजे. दुसऱ्यांनी आमच्या विषयी लिहावे, दुसऱ्यांनी आमच्या दुःखांना, आमच्या व्यथावेदनांना वाचा फोडावी ही अपेक्षाच आम्ही यापुढे करणार नाही. आम्हीच आमच्याविषयी लिहू शकतो, बोलू शकतो असा आत्मविश्वास दलित समाजातील स्वातंत्र्योत्तर काळातील नवशिक्षित पिढीत निर्माण झाला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मध्यमवर्गीय समाजाच्या प्रबोधन चळवळीचे नेतृत्व नवशिक्षित पिढीनेच केले. त्याप्रमाणे दलित समाजाच्या प्रबोधनाचे नेतृत्व दलित समाजातील नवशिक्षित पिढीने स्वेच्छेने पण जाणीवपूर्वक स्वीकारले.

दलित समाजाचे सामाजिक प्रश्न अजून सुटलेले नाहीत. त्यांना

अजूनही अपेक्षित सामाजिक न्याय मिळालेला नाही. माणसाला माणसासारखे जगता येईल अशी परिस्थिती त्यांच्यासाठी अद्याप निर्माण झालेलीच नाही स्वातंत्र्योत्तर काळातही उच्चवर्णियांनी त्यांची वंचना केली आणि शासनानेही त्यांची वंचना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित समाजाला खंबीर नेतृत्व असे लाभलेच नाही. सत्तास्पर्धेच्या राजकारणात त्यांच्या पुढाऱ्यांनी त्यांची वंचना केली अशा परिस्थितीत दलित साहित्याच्या चळवळीचा जाणीवपूर्वक उद्‌भव झाला. एक प्रकारच्या निर्नायकी अवस्थेत दलित साहित्यिकांनी सामाजिक प्रबोधनाचे नेतृत्व स्वेच्छेने पत्करले, हे लक्षात घेतले पाहिजे.

मराठी साहित्य हे मध्यमवर्गीय आहे, बामणी आहे, एवढीच दलित साहित्यिकांची तक्रार नाही. मराठी साहित्य कधीच क्रांतिकारक नव्हते अशीही त्यांची तक्रार आहे. कारण तसे ते असते तर या देशात यापूर्वीच क्रांती झाली असती. सामाजिक क्रांती घडून येण्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात. क्रांतीला योग्य अशी परिस्थिती निर्माण व्हावी लागते, क्रांतीसाठी एक वर्ग संघटितपणे सिध्द व्हावा लागतो ! आणि क्रांतीसाठी समर्थ नेतृत्व लागते. हे त्रिविध स्वरूपाचें कार्य समाजातल्या विचार करणाऱ्या वर्गानेच करावयाचे असते आणि विचार करणाऱ्यांच्या वर्गात साहित्यिकांचे स्थान अग्रक्रमाने व अग्रहक्काने असले पाहिजे. साहित्याला असे स्थान असले पाहिजे. मराठी साहित्याला ही दृष्टी लाभलीच नाही. साहित्य हे समाजाला घडविणारे, समाजाला कृतिप्रवण करणारे, क्रांतिप्रवण करणारे असावे ही दलित साहित्याची दृष्टी आहे.

आमच्या जीवनाला आम्हीच उद्‌गार प्राप्त करून देणार. दुसऱ्यांनी तो दिला नाही आणि दुसरे तसा देऊ शकणार नाहीत; ही दलित साहित्यिकांची भूमिका लक्षात घेतली म्हणजे एका अर्थी ते आत्माविष्कारासाठी साहित्यनिर्मिती करतात ! साहित्यातून स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला समग्रपणे वास्तवरूपात व्यक्त करू पाहतात, हेही स्पष्ट होते. त्यांच्या आत्माविष्कारामुळे आजपर्यंत मानवी जीवनातले जे सुखदुःखात्मक अनुभव मराठी साहित्यात व्यक्त झाले नव्हते, ते आता व्यक्त होऊ लागले आहेत. म्हणून अनुभवाच्या बाबतीत मराठी साहित्य हे समृध्द होत आहे, हे

नाकारता येणार नाही क्रांतिकारकतेचे परिमाण मराठी साहित्याला लाभले नव्हते. दलित साहित्यिकांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना जर क्रांतिकारक (म्हणजे समाजाला क्रांतिप्रवण करू शकणारे) साहित्य निर्माण करता आले तर कदाचित मराठी साहित्याला हे परिणाम लाभण्याची शक्यता व संभवनी-यता आहे.

दलित साहित्याच्या मूल्यमापनाचा प्रश्न निःसंशय महत्त्वाचा आहे. मूल्यमापन करताना मानदंड कोणते वापरायचे ? कला आणि साहित्य हे जसे जीवनोद्भूत असते, म्हणजे जीवनातून अथवा जीवनानुभवातूनच त्यांचा उद्भव होतो, त्याचप्रमाणे मापनाची मूल्येही कलानिर्मिती व साहित्यनिर्मिती यातूनच निर्माण होतात असे मला वाटते. मापनमूल्येही दोन प्रकारची मानावी लागतात आंतरिक मूल्ये आणि बाह्य मूल्ये. मूल्यमापनाच्या समीक्षापध्दतीही भिन्नभिन्न आहेत. आणि कोणतीही एक पद्धती परिपूर्ण, काटेकोर अथवा संपूर्णतया शास्त्रीय स्वरूपाची आहे असे निर्धारपूर्वक म्हणता येणार नाही. भिन्नभिन्न पध्दतीनी एकाच कलाकृतीचे मूल्यमापन केले तर कलाकृतीच्या गुणवत्तेत, श्रेष्ठ कनिष्ठतेत एकवाक्यता आढळणार नाही. असे असूनही विद्यमान काळात रूपनिष्ठ समीक्षेला आणि सौंदर्यशास्त्राधिष्ठित समीक्षेलाच विशेष प्राधान्य असल्यामुळे स्वाभाविकच साहित्यकृतीच्या कलात्मक अभिव्यक्तीचा, कलात्मक आकृतिबंधाचा आणि सौंदर्यास्वादाचाच अधिक विचार केला जातो.

साहित्यनिर्मिती ही देखील एक सामाजिक घटना आहे, हे आज फारसे मानले जात नाही. तसे मानले गेले तर सामाजिक घटना म्हणून दलित साहित्याच्या निर्मितीकडे बघता येईल. परंतु तसे न पाहता कला-त्मक अभिव्यक्तीच्याच संदर्भात दलित साहित्याचा विचार करण्याची अथवा विचार करावा असा आग्रह धरण्याची प्रवृत्ती दिसून येते आणि मग दलित साहित्यात अनुभवांचे वेगळेपण दिसत असले तरी त्या अनुभवांच्या अभि-व्यक्तीत फारशी कलात्मकता जाणवत नाही असा निष्कर्ष काढणे सोयीचे होते. उच्चभ्रू साहित्यिक ज्या रचनाबंधात आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करतात. त्या रचनाबंधाचेच अनुकरण व अनुसरण दलित साहित्यिक करतात. अनुभवच आकृतिबंध धारण करतो आणि अनुभव मूलतः नवा

असेल तर आकृतिबंधही नवा असू शकणे संभवनीय आहे. दलित साहित्यिकांचे अनुभव मध्यमवर्गीय साहित्यिकांच्या अनुभवांपेक्षा संपूर्णतया वेगळे आहेत तर मग स्वाभाविकच त्या अनुभवांची अभिव्यक्ती वेगळेपणाने व्हायला हवी. पण तसे दिसत नाही उलट साहित्याला नकार देताना दलित साहित्यिक आपल्या अभिव्यक्तीसाठी प्रस्थापित साहित्याच्या पध्दतींचाच अवलंब करतात, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मध्यमवर्गीय आणि तत्सम दलितेतर लेखकांनी दलितांची दुःखे त्यांच्या व्यथावेदना वास्तवरूपात व्यक्त केल्या नाहीत म्हणून दलित साहित्यिकांना त्या व्यक्त करावयाच्या आहेत एवढेच. त्या व्यतिरिक्त कलानिर्मिती म्हणून त्यात लक्षणीय असे काय आहे ? असाही एक कुत्सित प्रश्न पुष्कळदा विचारला जातो आणि साहित्य हे मूलतः साहित्यच असते; दलित साहित्य, दलितेतर साहित्य, मध्यमवर्गीय साहित्य अशी त्याची वर्गीय प्रतवारी करणे योग्य नव्हे, असेही प्रतिपादन केले जाते. साहित्य हे चांगले किंवा वाईट, श्रेष्ठ किंवा कनिष्ठ, कलात्मक किंवा अकलात्मक असेच असू शकते. म्हणून दलित साहित्यात सौंदर्याच्या आस्वादाच्या दृष्टीने चांगले, श्रेष्ठ अथवा कलात्मक काय आहे? या प्रश्नाच्या अनुषंगाने दलित साहित्याचे मूल्यमापन केले जाते. दलित ही विशेषणवाचक संज्ञा त्या विवक्षित साहित्यातील अनुभवाच्या आणि आशयाच्या संदर्भात अन्वर्थक असल्यामुळे वरील प्रश्नांच्या अनुषंगाने त्याचे मूल्यमापन होणे न्याय्य ठरणार नाही.

ज्या अंतःप्रेरणांतून आणि अंतःप्रवृत्तीतून दलित साहित्य निर्माण होते त्या प्रेरणांचा व प्रवृत्तींचा शोध घेणे, त्या तपासून पहाणे, त्यांची अर्थपूर्णता किंवा अर्थशून्यता निश्चित करणे हेच उचित ठरेल.

दुसरे असे की, दलित साहित्याच्या जाणीवपूर्वक चळवळीला नाही म्हटले तरी एक तपाहून अधिक काळ लोटला आहे. प्रारंभी दलित साहित्यिकांची आपल्या साहित्याविषयी काहीशी समान भूमिकाच होती. परंतु आता त्यांच्यातच अंतर्विरोध निर्माण होऊ लागले आहेत. त्यांचे शत्रूसंबंध समान आहेत. म्हणजे त्यांचा विरोध चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेला आहे, तसा प्रस्थापित मराठी साहित्याला आहे. परंतु त्यांच्यात विरोध व्यक्त करण्याच्या मार्गाविषयी मतैक्य राहिलेले नाही. म्हणजे असे की, केवळ

आंबेडकरवादाच्या द्वारे की मार्क्सवादाच्या द्वारे, याविषयी निश्चिती नाही. त्यामुळे दलित साहित्याच्या नेमक्या संकल्पनेविषयीही संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

'दलित' या शब्दाची व्याप्ती प्रारंभी दलितांना अमान्य होती. म्हणजे अस्पृश्य म्हणून ओळखले जाणारेच तेवढे दलित असे त्यांना मान्य नव्हते. वास्तविक सगळेच शोषित हे एकाअर्थी दलित असतात. कारण शोषण व्यवस्थेत समाजाच्या अनेक घटकांवर अन्याय होतो. त्यांची पिळवणूक होते. परंतु सर्वांनाच दलित म्हटले तर आमचा 'दलितपणा' बोथट होतो. म्हणून पूर्वाश्रमीचे अस्पृश्य तेवढेच दलित अशी त्यांची भूमिका होती. परंतु कालांतराने अलीकडे काही दलित साहित्यिकाना 'दलित' या संज्ञेची व्याप्ती मान्य होऊ लागली. दलित म्हणजे सगळेच पीडित शोषित. पण मग त्यातून एक प्रश्न उद्‌भवतो की अस्पृश्येतरांविषयीच्या म्हणजे अन्य पीडितांविषयीच्या व्यथावेदना शब्दरूप केल्यावर त्यालाही दलित साहित्य म्हटले जाईल की नाही? आणि दलित साहित्य म्हटले गेले तर मग दलित अनुभवाचे वेगळेपण नेमके कशात आहे? या प्रश्नांची नेमकी उत्तरे दलित साहित्यिकांकडूनच मिळाली हवीत. ती उत्तरे अद्याप निर्धारपूर्वक मिळालेली नाहीत. कारण एकीकडे दलितांची व्याप्ती मान्य करूनही प्रत्यक्ष दलित साहित्य निर्मिती पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांच्या अथवा नव-बौध्दांच्या जीवनानुभवापुरतीच सीमित झालेली दिसते.

दलित साहित्य ही संज्ञा आज दलितांनी निर्माण केलेल्या साहित्याच्या संदर्भात वापरली जाते. अशा प्रकारचे साहित्य पूर्वी निर्माण होत नसले तरी Proliteriate Literature चा मराठी पर्यायी शब्द म्हणून ही संज्ञारूढ बूर्ज्वा साहित्य आणि दलित साहित्य–म्हणजे श्रमजीवींचे साहित्य. साम्यवादी देशात जी सांस्कृतिक क्रांती झाली त्यातून श्रमजीवीचे स्वतंत्र साहित्य अस्तित्वात आले. आणि साम्यवादी विचारांबरोबरच अशा साहित्याची Proliteriate Literature ची संकल्पनाही सर्वत्र पसरली. मराठी साहित्यात ही संकल्पना आली. परंतु 'दलित' या संज्ञेवर जर केवळ अस्पृश्यांचीच मुद्रा असेल तर त्याचा अर्थ असा की या विवक्षित संज्ञेचा अर्थसंकोच झाला. आणि त्यातूनही मग मूलभूत प्रश्न निर्माण होतो.

तो असा–' दलित साहित्य ' या संकल्पनेचा सीमित अर्थ घ्यावयाचा की व्यापक अर्थ घ्यावयाचा.

म्हणूनच अशा मूलभूत प्रश्नांची निश्चित उत्तरे मिळत नाहीत तोपर्यंत मूल्यमापनाचे मानदंडही निश्चित करणे योग्य होणार नाही. कदाचित अशा मानदंडाचे स्वरूप ह्या साहित्याच्या बंडखोरीत व क्रांतिकारकतेतही असू शकेल.

(' केसरी ' १८ नोव्हेंबर, १९७७
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुरवणी)

# दलित साहित्य : पुरोगामी साहित्याचा उद्‌गार

दलित साहित्य हा विद्यमान काळातील मराठी साहित्यातला एक नवा वाङ्‌मयीन प्रवाह आहे. साहित्यरूप Form of Literature या दृष्टीने त्याला काही वेगळेपण आहे, असे आज तरी म्हणता येणार नाही. परंतु त्यातील अनुभवाच्या आणि अनुभवांतर्गत आशयाच्या दृष्टीने मात्र त्यात लक्षणीय असे वेगळेपण आहे. हे वेगळेपण मराठी साहित्याशी दुरावा निर्माण करणारे नाही. उलट मराठी साहित्याची कक्षा विस्तृत करणारे, मराठी साहित्यातील अनुभव विश्व अधिक समृद्ध करणारे, आणि तत्पूर्वीच्या व तत्समकालीन मराठी साहित्यातील काही उणिवा भरून काढणारे आहे.

दलित साहित्य हे एकाअर्थी वास्तववादी साहित्य आहे. " Realist art gives a sympathetic and moving portrayal of the hard life of the masses and of their daliy cares and anxieties in the countries which are supposed to have experienced an economic miracle." जनसामान्यांच्या वास्तव जीवनातील दुरवस्थेचे पुरेसे चित्रण मराठी साहित्यात होत नाही. कारण कलावादी व सौंदर्यवादी भूमिका एकदा पत्करल्यानंतर वास्तवातले बरेचसे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनानुभव हे 'अवाङ्‌मयीन' अथवा 'अकलात्मक' मानून वाङ्‌मयीन कलेच्या कक्षेबाहेर उपेक्षित ठेवले जातात. एकूण समाजव्यवस्थेत दलित समाज हाच उपेक्षित मानला गेल्यामुळे दलितांच्या जीवनानुभवांना

मराठी साहित्यात फारसा उद्गार लाभला नाही. आजचे दलित साहित्यिक आपल्या अनुभवांना असा अर्थपूर्ण उद्गार देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

(दलित साहित्य हे वर्गनिष्ठ साहित्य आहे आणि व्यापक व लाक्षणिक अर्थाने ते समाजनिष्ठ, बहुजन समाजनिष्ठ साहित्य आहे. त्यातील समाजनिष्ठेच्या, बहुजन समाजनिष्ठेच्या मुळाशी निश्चित स्वरूपाची वर्गीय जाणीव आहे. ही जाणीव ज्वलंत आहे, धगधगती आहे, शिवाय क्रमपरिवर्तनवादी आहे. या अर्थाने की, ही वर्गीय जाणीव नुसतीच आपल्या व्यथावेदनांचा आक्रोश करीत नाही तर व्यथावेदनांची मूळ कारणंच उखडून जीवनात काही परिवर्तन घडवू पाहणारी आहे कमालीची अस्वस्थ आणि बेचैन अशी ही जाणीव आहे. प्रस्थापित मराठी साहित्यातील रूढ वर्गीय जाणिवेविरुद्धची विद्रोही प्रतिक्रिया म्हणूनच ती निर्माण झालेली आहे. ही विद्रोही प्रतिक्रिया बंडखोर आहे. म्हणूनच एकाअर्थी दलित साहित्य हे मराठी साहित्यातले मराठी साहित्याविरुद्ध बंड आहे, असेही म्हणता येईल वाच्यार्थाने आणि लाक्षणिक अर्थाने अशी बंडखोरी मराठी साहित्यात यापूर्वीही झालेली आहे. एकाअर्थी ज्ञानेश्वरांचेही संस्कृतविरुद्ध वाङ्मयीन बंडच होते. केशवसुतांचेही पारंपारिक मराठी कवितेविरुद्ध बंडच होते. ही बंडखोरी मर्ढेकरी काव्यातही होती. व्यक्तिस्थितिकालपरत्वे या बंडखोरीचे स्वरूप वेगवेगळे असेल, त्यामागची प्रवृत्ती, त्यातील प्रेरणा आणि प्रयोजने भिन्न भिन्न असतील परंतु कोणत्याही काळात प्रस्थापिताविरुद्ध बंडखोरी ही क्रमपरिवर्तनवादातील आवश्यक अशी अपरिहार्य अवस्था असते. माझ्या मते दलित साहित्य ही अवस्था निर्माण करू पाहात आहे. अर्थात हे कार्य कितपत यशस्वीपणे ते पार पाडते हे त्याच्या भवितव्यावर अवलंबून आहे.) केवल कलावादी वाङ्मयातील आशय, प्रवृत्ती आणि प्रेरणा ह्या एकाअर्थी क्रमवादी असतात. त्या विरुद्धच्या प्रतिक्रियेतून दलित साहित्य उद्भवले आहे, ते क्रमपरिवर्तनवादी भूमिका घेऊन. क्रमपरिवर्तनवाद भौतिक जीवनाच्या विकासाला जसा उपकारक ठरतो, तसाच तो साहित्याच्या विकासालाही उपकारक ठरतो याची जाणीवपूर्वक दखल घेतली पाहिजे.

दलितांनी दलितांविषयी व दलितांसाठी लिहिलेले साहित्य तेच दलित

साहित्य अशी प्रारंभीच्या काळात एक व्याख्या दलित साहित्यिक करीत. ही व्याख्या कितपत परिपूर्ण आहे, ती व्याप्त आहे की अव्याप्त आहे हा वादाचा प्रश्न आहे. कारण दलित साहित्याचा वाचक कोण ? हाही प्रश्न त्यातून उद्भवतो. परंतु तूर्त वादाचा मुद्दा बाजूला ठेवला, तरीही या व्याख्येत वर्गजाणीव अंतर्भूत आहे आणि ही वर्गजाणीव प्रस्थापित साहित्यातील वर्गजाणिवेच्या विरुद्ध प्रतिक्रिया आहे.

बहुतांशी मराठी वाङ्मय हे मध्यमवर्गीय आहे बहुतांशी अशासाठी की, अपवादात्मक स्वरूपात मध्यमवर्गियेतरानीही साहित्यनिर्मिती केली आहे. संतकवींच्या मेळाव्यात समाजाच्या अधस्तरावरचेही कवी आहेत. तसेच ते शाहीर कवींच्या मेळाव्यातही आहेत. पंडित कवींच्या मेळाव्यात मात्र ते दिसत नाहीत. हे असे का ? याचे उत्तर मराठी साहित्याच्या समशास्त्रीय विवेचनात मिळू शकते परंतु तो स्वतंत्र विषय आहे. मात्र एकंदरीत पाहता स्वरूप असे दिसते की, मध्यमवर्गीय व तत्सम प्रस्थापित जीवन हाच मराठी साहित्याचा अनुभव विषय झालेला आहे. हे साहित्य मध्यमवर्गियांनी, मध्यमवर्गाविषयी, मध्यमवर्गासाठी लिहिले. पंडित कवी तर नेहमी 'अधिकारी श्रोत्यां' ची अपेक्षा करीत. अर्वाचीन साहित्यिक आणि समीक्षकही 'सुजाण' 'सहृदय' रसिक वाचकांची अपेक्षा करतात. म्हणजे लिहिणे, वाचणे, आस्वाद घेणे इत्यादी बाबतीत वंचित असलेला समाज इथेही उपेक्षितच ठरतो. म्हणून सर्व दृष्टींनी विचार करता, आतापर्यंतचे मराठी साहित्य हे बहुतांशी मध्यमवर्गीय जाणिवांवरच पोसलेले आहे शिक्षण, विद्वत्ता, कवित्व, रसिकता अभिरुचा या सगळयांचा पारंपारिक वारसा मध्यमवर्गाकडे असल्यामुळे हे असे होणेही अपरिहार्य होते. मध्यम वर्गियांनी इतरेजनांविषयी लिहिले असेल; परंतु ते लिहिणे केवळ सहानुभूतीतून झालेले असेल, दया बुद्धीच्या कळवळयातून झाले असेल. परंतु त्या लिहिण्यात उत्कट अनुभूतीचा स्पर्श झालेला फारसा दिसत नाही. समाज सुशिक्षित, सुसंस्कृत असो अथवा नसो, 'लोकसाहित्य' या ना त्या मार्गाने समाजाच्या सर्व स्तरांवर झिरपत जातेच. संत कवीचा एखादा भावोत्कट अभंग सर्वार्थाने पीडित दलित अशा माणसाच्या ओठावर रुळलेला दिसेल; एकनाथांचे एखादे भारूडही मनात घर करून राहिले असेल; एखादा

'पोवाडा,' 'फटका' किंवा 'लावणी' ही सर्व स्तरांवर झिरपत राहिली असेल. परंतु केशवसुतांचा 'नवा शिपाई' किंवा हरिभाऊंची 'मी' ही कादंबरी; अथवा श्री. व्यं. केतकरांचो 'ब्राह्मणकन्या' अथवा विंदा करंदीकरांची 'ही जनता अमर आहे.' समाजाच्या सर्व स्तरांवर कधीही पोचू शकली नाही. याचा अनेक कारणे असू शकतील. पण एक महत्त्वाचे कारण असे की, अशा वाङ्मयाला कधीच 'लोकसाहित्या' ची प्रतिष्ठा लाभली नाही. वर्गीय जाणिवेच्या पलीकडे आणि त्या कक्षेपलीकडे हे साहित्य जाऊ शकले नाही.

साहित्याचे नेमके प्रयोजन काय? 'जीवनासाठी कला की कलेसाठी कला' या प्रश्नांची निर्णायक उत्तरे अद्याप दिली गेली नाहीत. परंतु एवढे मात्र निश्चित की, जीवन आणि साहित्य यांच्यातले अतूट नाते नाकारता येण्यासारखे नाही. म्हणूनच जीवनदर्शन, उद्बोधन व आनंदनिर्मिती अशा त्रिविध स्वरूपाची प्रयोजने साहित्याच्या मुळाशी असतात. ही प्रयोजने परस्परसापेक्ष तशीच परस्परांतर्भूत असतात. साहित्यनिर्मिती करणारा लेखक ज्या वर्गातून येतो त्या वर्गाची सापेक्षताही साहित्यनिर्मितीत अपरिहार्य असते. अशावेळी ही त्रिविध प्रयोजनेही वर्गसापेक्ष होतात.

चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यस्थेत दलित समाज सर्वस्वी व संपूर्णतया वंचित झालेला आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक स्वातंत्र्यापासून तो वंचित आहे मूलभूत मानवी हक्कापासून वंचित आहे. या वंचित समाजाला उत्थान व अभ्युदय यांची जाणीवही बधिर व्हावी अशा पद्धतीनेच वर्णव्यवस्थेत वागवले गेले. कान असून ऐकायचे नाही, डोळे असून बघायचे नाही, तोंड असून बोलायचे नाही, नुसते आमरण सहन करायचे एवढाच त्यांच्या जीवनाचा अस्तित्वार्थ होता. खरे तर त्यांच्या जीवनाला अस्तित्व होते, पण अर्थ नव्हता. जीवनास्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्याचे स्वातंत्र्य त्यांना नव्हते, सामर्थ्यही त्यांना नव्हते. हे सामर्थ्य आणि स्वातंत्र्य सवर्णांना होते. उच्चवर्गियांना होते, मध्यमवर्गियांना होते. त्यांना लेखणी–वाणीचे सामर्थ्य होते. म्हणून आपल्या जाणिवांना ते उद्गार देऊ शकले.

सर्वस्वी वंचित असलेला हा दलित समाज एका अर्थी साहित्याच्या

बाबतीतही वंचित राहिला. साहित्यात होणाऱ्या जीवनदर्शनाच्या, उद्बोधनाच्या, आनंदस्वादाच्या बाबतीतही वंचित राहिला. परंतु विद्यमान काळात दलित समाज जुनी कात टाकून नवे रूप धारण करीत आहे. या समाजाला अद्याप राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य पुरेसे लाभले नसले तरी लेखणीचे व वाणीचे सामर्थ्य गवसले आहे. या सामर्थ्यामुळेच स्वतःच्या अस्तित्वाची व अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्याच्या गरजेची नवी जाणीव त्याला झालेली आहे. त्याची अस्मिता जागी झाली आहे. डोळ्यांनी तो अन्याय पहातो. कानांनी व्यथावेदनांच्या आर्त किंकाळ्या ऐकतो आणि आपल्या वाणीने, लेखणीने त्यांना वाचा फोडू शकतो आणि, म्हणूनच तो आपले स्वतःचे साहित्य निर्माण करू शकतो. दलित साहित्याच्या निर्मितीची प्रेरणा दलितांच्या जागृत अस्मितेत आहे.

महाभारत, रामायण ही जागतिक कीर्तीची महाकाव्ये असतील; पण त्यात घडणारे जीवनदर्शन प्रामुख्याने ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांचे आहे. उद्बोधन असेल तर या त्रिवर्णांचे आहे.

संतकवींनी अध्यात्मिक उन्नतीसाठी देवाच्या दारी समता प्रस्थापित केलेली असली तरीही मानवाच्या भौतिक जीवनात त्यांना रस नव्हता. दलित समाज विषमतेचा व अन्यायाचा बळीच ठरला. त्याच्या मरणान्त वेदनांचा हुंकारही संतकाव्यात उमटला नाही. पंडित कवींच्या काव्यातील प्रवृत्ती व प्रेरणा महाभारत, रामायण, भागवत या पुराणग्रंथांत होत्या. संतकवी निदान अध्यात्मिक दृष्टचा तरी पुरोगामी होते. पण पंडितकवी हे एकाअर्थी प्रतिगामीच होते कारण त्यांनी जाणीवपूर्वक जीवनात क्रमवाद स्वीकारला होता. शाहिरी काव्यातील वीर रसाच्या व शृंगार रसाच्या परिपोषात दलित समाजाच्या व्यथावेदना अनुल्लेखित राहिल्या चिपळूणकरांच्या 'निबंधमाले' नंतर महाराष्ट्रात वैचारिक उत्क्रांती झाली. साहित्यिकांना जीवनाची व वाङ्मयाची नवी दृष्टी लाभली. त्या दृष्टींच्या समन्वयातून अर्वाचीन मराठी वाङ्मयाचे नवे युग निर्माण झाले. साहित्याची अनेक दालने समृद्ध झाली. मराठी साहित्याचे स्वरूप अंतर्बाह्य बदलले. मात्र त्यातील एकाही दालनातील अनुभवविश्वात दलित समाजाच्या जीवनानुभूतींना खऱ्या अर्थाने शब्दरूप

मिळाले नाही. मानवी जीवनातील सुखदुःखान्वित अनुभव हाच जर साहित्याचा विषय व आशय असेल तर मग एका विशिष्ट समाजाच्या जीवनानुभवाची इतकी उपेक्षा का? इतकी वंचना का? 'सत्यं, शिवं, सुंदरं' असा उद्‌घोष करणाऱ्या साहित्याचे अंतर्बाह्य स्वरूप दलित समाजाच्या जीवनानुभवांनी शबलित झाले असते की कलंकित झाले असते? ह्या प्रश्नांना कोणतेही साहित्यशास्त्र किंवा कलास्वरूपशास्त्र उत्तर देऊ शकणार नाही. दलित समाजाची सामाजिक, आर्थिक वगैरे कोंडी करणे हे चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेमुळे झाले असेल. परंतु जीवनानुभवांच्या अभिव्यक्तीच्या बाबतीत त्यांची अशी कोंडी करणे कोणत्या साहित्य व्यवस्थेवर अवलंबून आहे? या प्रश्नाचे एकच उत्तर मिळू शकते. ते म्हणजे मध्यमवर्गीय साहित्यिकांच्या वर्गीय जाणिवेवर; या जाणिवेमुळे मध्यम वर्गेतर जीवनानुभवांना त्यांनी आपल्या अनुभवविश्वात सामावून घेतले नाही. अथवा आपल्या अनुभवविश्वाची कक्षा सोडून ते बाहेर पडले नाहीत. असा जो काय थोडाफार प्रयत्न झाला असेल, तो वरवरच्या सहानुभूतीतून अथवा वरपांगी कळवळ्याने. म्हणूनच आता दलित साहित्यिकांची वर्गीय जाणीव प्रकर्षाने जागृत झालेली आहे. इतकी की, ते मध्यमवर्गीय मनोवृत्तीतून लिहिलेल्या एकंदरीत सगळ्याच मराठी साहित्यावर तुटून पडतात. आजपर्यंतचे मराठी साहित्य हे आमचे नाहीच अशी त्यांची आता दृढ भावना झाली आहे. म्हणून 'दलित साहित्य' मराठी साहित्याच्या परंपरेलाच नाकारते.

दलित साहित्य हे मुख्यतः जीवनवादी साहित्य आहे. धर्म या संस्थेवर आता दलितांचा विश्वास नाही. धर्म हा माणसाचे मन घडवतो, धर्म समाज घडवतो, धर्म माणसाला त्यांचे श्रेयस व प्रेयस प्राप्त करून देतो. परंतु धर्मानेच या समाजाला वंचित केल्यामुळे धर्माच्या बाबतीत हा समाज अश्रद्ध बनला आहे. मात्र लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य गवसल्यामुळे साहित्यावर त्याची प्रगाढ श्रद्धा बसत चालली आहे. माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू आहे ही त्याची भावनाही दृढ झाली आहे. प्राचीन मराठी साहित्याने मानवबाह्यमूल्ये श्रेष्ठ मानली. आत्मा, परमात्मा, मोक्ष, ब्रह्मानंद वगैरे; आणि आधुनिक साहित्यानेही सत्य, शिव, सुंदर, केवलानंद इत्यादी

मानवनिरपेक्ष मूल्ये श्रेष्ठ मानली. परंतु जीवनवादी साहित्य माणसाच्या भौतिक सुखदुःख सापेक्ष मूल्यांनाच प्रमाण मानते. माणसाला घडविण्याचे, जीवनातील जटिल समस्यांना सामोरे जाण्यासाठी त्याची पूर्वसिद्धी (Pre conditioning) करण्यासाठी, आत्मस्थितीच्या वास्तवाचे ज्ञान देण्यासाठी, आपले भवितव्य घडविण्यासाठी, समाजपरिवर्तन करण्यासाठी, सुखसमृद्धीसाठी समाजक्रांती घडवून आणण्यासाठी आवश्यक ते प्रबोधन कार्य साहित्य करू शकते हा विश्वासही त्यांच्यात निर्माण झालेला आहे. साहित्यातील क्रांतिप्रवणतेचा साक्षात्कारही त्यांना झालेला आहे. त्यांच्या मनात चीड आहे, प्रक्षोभ आहे तो आतापर्यंतच्या मराठी साहित्यपरंपरेविषयी. त्यांच्या दृष्टीने मराठी साहित्य कधीच क्रांतिप्रवण नव्हते. तसे ते असते तर वर्णव्यवस्थेच्या विरुद्ध यापूर्वीच समाज बंड करून उठला असता. 'समतेचा ध्वज उंच धरा रे!' अशी हाक केशवसुतांनी दिली आणि बंडाचा उद्घोष केला. पण त्या उद्घोषाचे प्रतिध्वनी मराठी साहित्यात फारसे उमटले नाहीत आगरकरांचा समाजसुधारणावाद हा शेवटी मध्यमवर्गापुरता 'कौटुंबिक सुधारणां' पुरताच ठरला. मराठी साहित्यात साम्यवाद कधी पुरतेपणी रुजलाच नाही. पुढे तर मराठी साहित्याने वैचारिकतेचे, विचार तत्त्वांचे अधिष्ठानच सोडले. वैचारिक साहित्य म्हणजे शेवटी प्रचारकी साहित्य असे समीकरण मांडून टाकले. आणि स्वच्छंदवाद, सौंदर्यवाद, केवलानंदवाद, असा कलासापेक्ष पण जीवननिरपेक्ष 'प्रयोजना'चा ध्यास घेतला. आणि तदनुषंगाने निर्मिती होत राहिली. परिणामांती जीवन आणि साहित्य यांच्यात साक्षात् अतूट नाते दूरान्वयानेच मानले गेले. शिवाय हे सगळे वाद (Isms) पाश्चात्य वाङ्मयातून आयात झालेले. मराठी साहित्यात एतद्देशियत्वही (Nativity) प्रत्ययाला येईनासे झाले. खरे पाहता या सगळ्या वृत्तीप्रवृत्तींमुळे साहित्यक्षेत्रात एक प्रकारचे अराजक माजले. भौतिक जीवनातला आणि विद्यमान काळातला 'युगधर्म' ओळखून त्याविरुद्ध प्रत्याघाती प्रतिक्रिया होणे आवश्यक होते. प्रत्येक कालखंडाचीही काहीएक गरज असते. त्या गरजेतून त्या काळातले साहित्य निर्माण व्हावे लागते. भौतिक जीवन गतिमान आणि म्हणूनच सतत बदलत जाणारे आहे. जीवनाच्या गरजाही बदलतात. परंतु काळाची गरज ओळखण्याऐवजी केवल कलावादी साहित्याने साहित्याची कालसापेक्षताच नाकारली.

कलानंद (मूलत काव्यानंद) हा ब्रह्मानंद सहोदर असतो असे साहित्य-शास्त्राने मानले. कारण दोन्ही आनंद हे अनिर्वचनीय, अवर्णनीय व शब्दातीत आहेत. ब्रह्मानंद शाश्वत तसाच कलानंदही शाश्वतच. कारण हा आनंद व्यक्तिस्थितिकालनिरपेक्ष असतो. अध्यात्मदृष्टचा ब्रह्मानंदाचा विचार चूक नसेल तर कलात्मदृष्टचा कलानंदाचा विचारही चूक नाही. आणि तरीही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागते. ब्रह्मानंदावरच लक्ष केंद्रित झाले की मग इतर संवेदनांचे महत्त्वच उरत नाही. म्हणून 'विगलितवेद्यान्तरसंवेद्य' असे त्याचे स्वरूप सांगितले जाते. आणि साहित्या-पासून होणाऱ्या 'कलानंदा'चे, 'केवलानंदा चे स्वरूपही असेच मानले जाते. म्हणजे इतर संवेदना आणि त्याची जनककारणे असणारे भौतिक अनुभव हे मूलतःच गौण अथवा निमित्तमात्र मानले जातात. परंतु हे सादृश्य परिपूर्ण नाही. कारण ब्रह्मानंद हा भौतिक जीवनानुभवांवर अधिष्ठित नाही. साहित्य आणि तत्सम कला या जीवनानुभवावर अधिष्ठित असतात. म्हणून कलानंदाच्या व्यापारातील भौतिकतेला डावलून चालणार नाही. भौतिक जीवनाशी विन्मुखता आणि ब्रह्मानंदाशी सन्मुखता यात एकाअर्थी पलायनवाद आहे, तसाच पलायनवाद 'केवलकलावादा'त आहे. असा केवलकलावाद जीवनास्तित्वार्थाच्या दृष्टीने पुरोगामी कधीच नसतो. या अर्थाने मराठी साहित्य फारसे पुरोगामी नव्हतेच. म्हणून समाज-परिवर्तनासाठी, सामाजिक क्रांतीसाठी, सांस्कृतिक क्रांतीसाठी, माणसाला माणूस म्हणून जगविण्यासाठी, माणसातल्या महानतेला निर्लेप ठेवण्यासाठी, भौतिक जीवनातले श्रेयस-प्रेयस त्याला विमुक्तपणे प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक अशी जीवनदृष्टी मराठी साहित्याने फारशी कधी दिलीच नाही. "Art not only informs us but forms us, our attitudes and goals, it helps us to test our goals and organize our means to their attainment. Another use in quicken and intensify our awareness of character and emotion, thus making us richer individuals, more fully competent to pass on a heritage worthy of the best of mankind." ही दृष्टीही कलावादी साहित्याने दिली नाही. अशी दृष्टी फक्त जीवननिष्ठ पुरोगामी साहित्यच देऊ शकते. असे साहित्य ही विद्यमान काळाची गरज आहे.

दलित साहित्य हे अशा पुरोगामी साहित्याची अगदी प्राथमिक अवस्था आहे, असे मला वाटते. प्राथमिक या अर्थाने की जागृत वर्गजाणिवेतून हे वाङ्मय निर्माण होत आहे Plekhanov ने म्हटल्याप्रमाणे "The work of a writer is Progressive when it is based upon the interest of a class..." दलित साहित्याचीही एक वर्गनिष्ठा आहे. त्या विवक्षित वर्गाचेच हितसंबंध दलित साहित्यिकांना अभिप्रेत आहेत. परंतु या प्राथमिक अवस्थेतून बाहेर पडणेही आवश्यक असते; कारण शेवटी ही वर्गजाणीव व वर्गनिष्ठा व्यापक व्हावी लागते. तिचे रूपांतर एकूण समग्र आणि व्यापक सामाजिक जाणिवेत व समाजनिष्ठेत व्हावे लागते. तरच त्या वर्गनिष्ठ साहित्याला खऱ्या अर्थाने पुरोगामी साहित्याचे अथवा प्रगत साहित्याचे सामर्थ्य प्राप्त होते. कारण Plekhanov ने पुढे असे म्हटले आहे आणि तसे त्याला अभिप्रेतही आहे की, 'It should be able at a given period to lead the whole of society forward and thus constitutes the broadest means of Ideological communication between the people..."

आजचे दलित साहित्य या प्रगल्भ अवस्थेपर्यंत कितपत जाऊ शकेल हे आजच सांगता येणे कठीण आहे. कारण त्यांची वर्ग जाणीव ही त्यांच्या वर्ण जाणिवेतून उद्‌भवलेली आहे. तसेच 'दलित' या विशेषणवाचक संज्ञेचा अर्थसंकोचही त्यांनी स्वीकारला आहे. 'दलित' म्हणून त्यांना फक्त पूर्वाश्रमींचे अस्पृश्यच तूर्त अभिप्रेत असले तरी भविष्यकाळात त्यांना या संज्ञेचा अर्थविस्तार आणि अर्थव्याप्ती स्वीकारावी लागेल. 'दलित' हा शब्द मूलत: Proleteriate चा मराठी पर्यायी शब्द आहे. म्हणून दलित साहित्य म्हणजे व्यापकार्थाने Proleteriate literature च. असे साहित्य मराठीत फारसे निर्माण झाले नाही. मात्र पूर्वाश्रमीचे अस्पृश्य आणि आताचे नवबौद्ध—ज्यांना आता लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य गवसले आहे, त्यांचे साहित्य अशा Proleteriate literature चा एक प्रभावी उद्रेक आहे. प्रभावी उद्‌गार आहे. हा उद्‌गार जेव्हा सर्वस्पर्शी व सर्वव्यापक होईल तेव्हा खऱ्या अर्थाने मराठीत प्रगत साहित्य निर्माण होईल. उच्चभ्रूंचे केवल कलावादी साहित्य हे एका अर्थी अशा प्रगत अवस्थेपर्यंत जाऊ शकत नाही. 'कलेसाठी कला,'

‘ गूढ गुंजनवाद,’ ‘ प्रकृतिवाद ’ ‘ आकृतिवाद ’ हे सर्व कठोर जीवनवास्तवापासून पलायन करणारे आहेत आणि प्रस्थापित मराठी साहित्याने जाणीवपूर्वक त्यांचा अवलंब केला आहे. त्याविरुद्ध प्रारंभी बंडखोरीची प्रतिक्रिया होणे स्वाभाविक आहे. ‘ दलित साहित्य ’ ही अशीच प्रस्थापित मराठी साहित्याविरुद्ध प्रतिक्रिया आहे. म्हणून या प्रतिक्रियेचे प्रारंभी स्वागत होणे इष्टच आहे. पण त्याचबरोबर आपले पुढचे पाऊल वर्णविस्मृत होऊन व्यापक सामाजिक जाणिवेने व जबाबदारीने पडणे जरुरीचे आहे, याविषयीची दक्षताही दलित साहित्यिकांनी बाळगली पाहिजे. नाहीतर मध्यमवर्गीय साहित्य जसे आपल्याच सुखदु:खान्वित अनुभवात घुटमळले, तसेच दलितवर्गीय साहित्याचे होईल. म्हणून दलित साहित्यिकांनी ‘ दलितांनी, दलितांविषयी, दलितांसाठी’ असा सीमित अर्थसंकोच सोडून ‘ दलित साहित्या’च्या संकल्पनेतील व्यापकार्थ लक्षात घेतला पाहिजे. नव्या पिढीतल्या दलितांनी तर आर्थिक सामाजिक लढ्यासाठी हा व्यापकार्थ लक्षात घेतला आहे. साहित्यनिर्मितीसाठी त्यांनी ही व्यापक दृष्टी स्वीकारली पाहिजे. मध्यम वर्गीय लेखकानी जी चूक केली ती दलित साहित्यिकांनी करू नये. कारण साहित्याच्या ऱ्हासकाळात नवे घडविण्याची शक्यता व संभवनीयता आता फक्त पुरोगामी साहित्यातच आहे. दलित साहित्यात अशा पुरोगामी साहित्याचे बीजसत्त्व नि:संशय आहे.

( ‘ युगांतर ’ ९ एप्रिल, १९७८, दलित साहित्य विशेषांक )

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# दलित साहित्य : प्रस्तुतता आणि संघात

आधुनिक मराठी साहित्यात 'दलित साहित्य' म्हणून जो एक नवा प्रवृत्तिप्रवाह निर्माण झालेला आहे, त्यालाही आता एकाअर्थी पंचवीस वर्षे होत आली आहेत. हा नवा प्रवृत्तिप्रवाह एक वाङ्मयीय चळवळ म्हणून उदयाला आलेला असला तरीही त्याचा खऱ्या अर्थी उद्‌गम सामाजिक चळवळीत आहे, हे लक्षात घ्यायला हवे. अशासाठी की, सामाजिक चळवळीशी जर त्याचा अंगभूत संबंध असेल तर सामाजिक चळवळीच्या संदर्भाशिवाय दलित साहित्या'चा विचार करता येणार नाही आणि सामाजिक चळवळीच्या भवितव्यावरच 'दलित साहित्या'चे भवितव्य अवलंबून राहील.

प्राचीन मराठी काव्यात दलितांविषयी, दलितांच्या जीवनाविषयी चातुर्वर्ण्याच्या संबंधात किंवा संदर्भात लिहिले गेले. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म्हणजे इ. स. १८७४ ते १९४७ या कालखंडात सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रबोधनाच्या अनुषंगाने दलितांच्यां जीवनाविषयी जे जे काय घडले असेल त्याची स्पंदने मराठी साहित्यात अजिबात उमटली नाहीत, असेही म्हणता येणार नाही. परंतु समकालीन राजकीय घटनांची पार्श्वभूमी आहे अथवा कथानकातील घटनांप्रमाणेच राजकीय घटनांचेही वर्णन एखाद्या कादंबरीत आहे, एवढ्याचसाठी त्या कादंबरीला राजकीय कादंबरी म्हटले जात नाही.

(उदा. कॅ. ना. सी. फडके यांची 'प्रवासी') त्याचप्रमाणे केवळ चातुर्वर्ण्याच्या संदर्भात, सामाजिक विषमतेच्या संदर्भात किंवा अस्पृश्योद्धाराच्या चळवळीच्या संदर्भात दलितांच्या जीवनाचे पडसाद साहित्यात उमटले अथवा दलितांच्या व्यथावेदनांची स्पंदने टिपली गेलीत, एवढ्याच कारणास्तव त्याला दलित साहित्य म्हटले गेले नाही. हा मुद्दा अशासाठी लक्षात घेणे आवश्यक आहे की, 'दलित साहित्य' ही संज्ञाच गेल्या पंचवीस वर्षापूर्वी अस्तित्वात आली आहे. कारण मराठी साहित्यातील हा नवा प्रवृत्तिप्रवाह साधारणतः इ. स. १९५६ च्या सुमारास उद्रेकाच्या स्वरूपातच उदयाला आला.

इ. स. १९५६ च्या सुमारास नागपूर येथे एक अतिशय अन्वर्थक आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाची घटना घडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान नेतृत्वाखाली चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर उभारलेल्या हिंदु समाजातील अस्पृश्यांनी हिंदु धर्माचा त्याग केला. आणि बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हजारो वर्षांपासून धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेने जी बंधने लादली होती, जे दास्य लादले होते, ती बंधने अस्पृश्य समाजाने तोडली, ते दास्य झुगारून दिले. त्यावेळी तरी धर्मांतराची ही घटना दास्यमुक्तीचा महान क्षण म्हणून महत्त्वाची वाटली. सुखद वाटली. (त्यावेळी असे सहेतुक म्हटले. कारण धर्मांतरानेही अस्पृश्यतेचे निर्मूलन झाले नाही, अस्पृश्यांचे सामाजिक प्रश्न सुटलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.) आपल्यावर हजारो वर्षांपासून असलेला अस्पृश्यतेचा कलंक धुतला गेला आणि आता आपण इतर सवर्ण हिंदूप्रमाणेच चांगले जीवन, मानाचे जीवन, प्रतिष्ठेचे जीवन जगू शकू ही जाणीव धर्मांतराने अस्पृश्य समाजाला करून दिली. 'मी हिंदु म्हणन जन्माला आलो असलो तरी मी हिंदु म्हणून मरणार नाही,' अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिज्ञाच होती. सामाजिक व राजकीय आंदोलनांनी अथवा चळवळीनी अस्पृश्यांचे प्रश्न सुटण्याची शक्यता व संभवनीयता दुरावत चालली तेव्हाच डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. नागपूर येथे त्यांच्याच महान नेतृत्वाखाली सामुदायिक धर्मांतराची घटना घडली. धर्मांतराच्या या घटनेमुळे हजारो अस्पृश्यांच्या मनात भवितव्याविषयीच्या आशा बहरल्या. परंतु या घटनेनंतर अल्पकाळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले आणि अनपेक्षितपणे

निराशेच्या अंधःकाराने ग्रासलेली पोकळी या समाजाने अनुभवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जागा घेईल आणि त्यांचे महान कार्य पूर्ण करील असा दुसरा त्यांच्याइतका प्रभावी नेता अस्पृश्य समाजात नव्हता. त्या समाजात पुढारीच नव्हते असे नाही. पण त्या पुढाऱ्यांच्याही स्वतःच्या आकांक्षा, महत्त्वाकांक्षा आणि हितसंबंध होतेच; म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दर्शवून दिलेल्या मार्गापासून ढळण्याचीच शक्यता व संभवनीयता होती आणि म्हणूनच ही पोकळी अधिक तीव्रतेने जाणवली. नेमक्या याच सुमारास दलित समाजातील तरुण, सुशिक्षित विचारवंत, लेखक, कवी या सर्वांना एखाद्या उद्रेकासारखीच आपल्या जबाबदारीची जाणीव झाली. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्यासमोर ठेवलेल्या कार्याशी एक प्रकारची प्रतिबध्दता त्यांनी स्वीकारली. मूळ जातिव्यवस्था नष्ट करून अस्पृश्यतेतून मुक्त व्हायचे एवढेच डॉ. बाबासाहेबांचे उद्दिष्ट नव्हते. सर्वांनाच हितावह होईल अशा सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना त्यांना करावयाची होती. अशी प्रस्थापना करावयाची म्हणजे संपूर्ण सामाजिक परिवर्तन होणेच आवश्यक होते. समग्र समाजपरिवर्तन कार्य हे एकाअर्थी महान क्रांतिकारक कार्य होते. त्यासाठी नव्याने प्रबोधन होण्याची आवश्यकता होती. दलित समाजातील तरुण लेखक, कवी, विचारवंत यांच्यात असा आत्मविश्वास निर्माण झाला की, साहित्याद्वारे आपण अशा नव्या प्रबोधनाला निःसंशय चालना देऊ शकू. या जाणिवेतूनच लेखनाचा आणि साहित्यनिर्मितीचा नवा प्रवृत्तिप्रवाह एखाद्या उद्रेकासारखाच उद्भवला. दलित लेखकांना आपल्या लेखणीचे आणि वाणीचे सामर्थ्य गवसले. 'दलित साहित्या'ची ही पार्श्वभूमी नजरेआड करता येणार नाही.

मराठी साहित्याला स्वतःची अशी सातशे वर्षांची परंपरा आहे. प्राचीन आणि अर्वाचीन काळातील विकासाच्या भिन्न विभिन्न टप्प्यांतून मराठी साहित्य घडले आहे. परंतु नव्या जाणिवेने झपाटलेल्या दलित लेखकांना हे जाणवले, आणि एका मर्यादेपर्यंत ते खरेही आहे, की, हिंदु समाजाने अथवा हिंदूंच्या समाजव्यवस्थेने जसे आपल्याला 'अस्पृश्य' मानले आणि गावकुसाबाहेर ठेवले तसेच सातशे वर्षांची परंपरा असलेल्या मराठी साहित्यानेही आपल्याला एकाअर्थी 'अस्पृश्य'च मानले. कारण भूतदयेपोटी

अस्पृश्यांविषयी कितीही कळवळा व्यक्त झालेला असला तरी मराठी साहित्यात दलितांच्या जीवनाचे, त्यांच्या व्यथावेदनांचे, त्यांच्या आशा आकांक्षांचे यथार्थ चित्रण झालेच नाही. एक तर दलितांच्या जीवनाविषयी अनुकंपा व्यक्त केली गेली अथवा त्यांच्याविषयी तिरस्कार व्यक्त केला गेला. परंतु ही अमानुष व निर्घृण जातिव्यवस्था नष्ट करण्याच्या दृष्टीने सवर्ण हिंदूंची मने घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न प्राचीन अथवा अर्वाचीन मराठी साहित्यातील कोणत्याही परंपरेने केला नाही, अशी दलितांच्या मनाची ठाम निश्चिती झाली. संतकवींचे हितसंबंध अध्यात्मज्ञानाशी, परमार्थ प्राप्तीशी आणि अंतिम मोक्षानंदाशी निगडित होते. म्हणून चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे भान असूनही सामाजिक अन्यायाविरुद्ध प्राचीन मराठी संतकवींनी बंड केले नाही. पंडित कवींना आपल्या पांडित्याचा व व्युत्पन्नतेचा अभिमान होता, त्यांनी प्रामुख्याने ' रामायण ', ' महाभारत ' आणि ' भागवत ' या पुराण ग्रंथांतील आख्यानोपाख्यानांत विशेष रस घेतला. हे कवी मुख्यत: सवर्ण हिंदू होते. पददलितांच्या यातनांचा विचारही त्यांनी केला नाही. आर्यांच्या धर्माचा संकोच ' हिंदु धर्मा 'त झाला, आणि काळाच्या ओघात ' हिंदु धर्मा'चा संकोच ' ब्राह्मण धर्मा'त झाला. ब्राह्मणवर्गात अस्पृश्याविषयी प्राकृतिक द्वेष होता. म्हणून नव्या जाणिवेने झपाटलेल्या दलित लेखकांना हेही जाणवले की, प्राचीन मराठी साहित्यातील आशयावर , ब्राह्मणां ' चे वर्चस्व आहे. प्राचीन मराठी साहित्य हे प्रामुख्याने '(सवर्ण) हिंदु साहित्य ' आहे किंवा ' ब्राह्मणी साहित्य ' आहे.

पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिश राजवटीत नवी शिक्षण व्यवस्था आली. नवी अर्थव्यवस्था आली. अनेक उद्योगधंदे, व्यवसाय निर्माण झाले. भारतीय जीवनातील नव्या स्थित्यंतराची ती प्रक्रिया होती. सूर्योदयाच्या वेळी प्रकाशाचा पहिला लाभ पर्वत शिखरांना होतो आणि मग तो प्रकाश पायथ्याकडे सरकत जातो. ब्रिटिश राजवटीत जी नवी परिस्थिती निर्माण झाली तिचा बहुतांशी लाभ सवर्ण हिंदूंना झाला. आणि ब्रिटिश राजवटीने ज्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या त्यांचा अधिकाधिक ' सदुपयोग ' करून घेण्याचा प्रयत्न सवर्ण हिंदूंनी केला. पेशवाईत अतिरेकाला पोचलेले ' ब्राह्मणी वर्चस्व ' ब्रिटीश राजवटीत काहीसे अस्तित्वहीन होऊ लागले

होते. हे खरे असले तरी, युरोपातील औद्योगिक क्रांतीने कामगार वर्ग निर्माण केला तसाच बुद्धिजीवी मध्यम वर्ग निर्माण केला. ब्रिटिश राजकर्त्याबरोबर युरोपीय संस्कृती भारतात आली. जेत्या राष्ट्राच्या संस्कृतीचा परिणाम जित राष्ट्राच्या संस्कृतीवर होतो, तसा भारतावरही होऊ लागला आणि त्यातूनच बुद्धिजीवी मध्यमवर्गाच्या उदय झाला. ब्राह्मणी वर्चस्व संपुष्टात आल्यासारखे वाटत होते. पण त्याचबरोबर जीवनाच्या सर्व क्षेत्रात मध्यमवर्गाचे वर्चस्व प्रस्थापित होत होते. (आणि मध्यमवर्गात प्रमुख भरणा सवर्ण हिंदूंचा होता.) वाङ्‌मयीय उपक्रमांचे क्षेत्रही त्याला अपवाद नव्हते लेखक आणि विचारवंत मध्यमवर्गीय होते. मध्यमवर्गीय स्तरावर सामाजिक, धार्मिक, राजकीय प्रबोधनाची प्रक्रिया सुरू होती. म्हणून ह्या लेखकांनी मध्यमवर्गाविषयी लिहिले, मध्यमवर्गा रिता लिहिले. काही कवितातून, कथाकादंबऱ्यातून अस्पृश्यांविषयीच्या पददलितांविषयीच्या सहानुभूतीने किंवा अनुकंपेने केलेली तुरळक चित्रणे आढळतात. पण एकंदरीत भारतीय स्वातंत्र्यपूर्वकाळातील मराठी साहित्याचे स्वरूप, 'मध्यमवर्गाने, मध्यमवर्गाविषयी आणि मध्यमवर्गासाठी लिहिलेले,' असेच होते. म्हणून स्वाभाविकच नवजागृत दलित लेखक, कवी, व दलितांतील बुद्धिजीवी यांचा असा दृढ विश्वास निर्माण झाला की, जातिव्यवस्थेवर आधारलेल्या हिंदुसमाजात जसे त्यांना स्थान नाही तसेच मध्यमवर्गीयांच्या 'हिंदु साहित्या'तही त्यांना स्थान नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना नवे विचार दिले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला, स्वावलंबनाची वृत्ती निर्माण केली. शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबविले. इतःपर सवर्ण हिंदूंच्या कृपेवर, सहानुभूतीवर किंवा अनुकंपेवर जगण्याची जरुरी नाही हे त्यांच्या मनावर ठसविले. माणसासारखं जगण्याचा आपला हक्कच आहे आणि संघर्ष केल्याशिवाय, लढा दिल्याशिवाय कोणीही हा मूलभूत हक्क आपल्याला बहाल करणार नाही ही जाणीव करून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या शिकवणुकीमुळे त्यांच्या समाजात प्रबोधन झाले होते. हिंदु समाजव्यवस्थेत आणि 'हिंदु साहित्या'त आपल्याला अस्तित्व नाही, आपण नगण्यच आहोत ही जाणीव या प्रबोधनातूनच झाली. डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर पोकळी निर्माण झाली. परंतु नवजागृत दलित लेखक, कवी आणि

दलित बुद्धिजीवी यांनी अपरिहार्यपणे व ठामपणे असा निष्कर्ष काढला की, ही निराशा आपण झुगारून दिली पाहिजे. आपले मूलभूत हक्क मिळविण्यासाठी तीव्र लढा दिला पाहिजे. साहित्य आणि कला याद्वारा जनजागरण केले पाहिजे. आपण आपले साहित्य निर्माण करू शकतो, आपली कला निर्माण करू शकतो, असा आत्मविश्वास त्यांच्यात बळावत गेला. आणि त्यातूनच एक चळवळ म्हणून 'दलित साहित्य' अस्तित्वात आले. प्रारंभीच्या अवस्थेत 'दलित साहित्या'ला दोन उद्दिष्टे होती. समाजातील अस्पृश्यांच्या व पददलितांच्या व्यथावेदनांना, यातनांना आणि जीवनानुभवांना उद्गार देणे; आणि सामाजिक न्याय मिळविण्यासाठी समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करणे; तरुण, सुशिक्षित दलितांनी हे आपले जीवितकार्यच मानले आणि अशा प्रकारच्या लेखनाशी प्रतिबद्धता स्वीकारली. म्हणून मूलतः 'दलित साहित्य' हे 'दलितांनी, दलितांविषयी, दलितांसाठी लिहिलेले साहित्य' अशा स्वरूपात एक चळवळ म्हणून अस्तित्वात आले. प्रारंभीच्या अवस्थेत तरी त्यात एकाच वेळी आवाहन आणि आव्हानही होते. आवाहन होते दलित समाजानेच सामाजिक अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचे आणि आव्हान होते परंपरेने चालत आलेल्या चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेला आणि सवर्णांच्या हिंदु मनोवृत्तीला. जातिजातींच्या उतरंडी असलेल्या या समाजव्यवस्थेत हा समाज सर्वस्वालाच वंचित झालेला होता. म्हणून त्याच्याजवळ गमावण्यासारखे खरे तर काहीच नव्हते. याउलट जगण्याच्या मूलभूत हक्कासकट त्यांना सगळेच नव्याने संघर्ष करून मिळवायचे होते भारताला स्वातंत्र्य मिळाले, भारताची स्वतंत्र राज्यघटना सिद्ध झाली (आणि प्रारब्धोपरोध असा की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे शिल्पकार मानले जातात.), प्रजासत्ताक राज्य अस्तित्वात आले तरीही पददलितांच्या परिस्थितीत काही फरक नाही. म्हणून जातिनिष्ठ समाज व्यवस्थाच मोडायला हवी आणि त्याऐवजी न्यायावर व समतेवर आधारलेली लोकशाहीनिष्ठ नवी समाजव्यवस्था प्रस्थापित करायला हवी अशी ईर्षाही प्रारंभी दलित साहित्याच्या निर्मितीमागे होती. या सर्व संदर्भासह 'दलित साहित्या' चा विचार व्हायला हवा.

' दलित साहित्य ' हे वेदनेचे आणि यातनेचे साहित्य आहे. जातिनिष्ठ

समाजव्यवस्थेत अस्पृश्यांना आणि पद दलितांना जे भोगावे लागले त्यातील व्यथा, वेदना, यातना आणि तज्जन्य अनुभव यांच्या यथार्थदर्शनापुरताच दलित साहित्यातील अनुभवविषय व आशय सीमित आहे. हे अनुभव दलित लेखकाचे स्वतःचे, स्वतःच्या समदुःखी, समपीडित जातीबांधवांचे अनुभव आहेत. म्हणून स्वाभाविकच त्या अभिव्यक्तीत एक प्रकारची आत्मपरता आहे. दलित साहित्यिक आपल्या साहित्यकृतीतून स्वतःच्या अनुभवासह स्वतःलाच प्रकट करण्याचा प्रयत्न करतो. सवर्ण हिंदु लेखक किंवा मध्यमवर्गीय लेखक हे करू शकणार नाही. कारण दलितांविषयी त्याचे लिहिणे हे ' सहानुभूती 'चे असणार. उलट दलितांचे लिहिणे हे ' अनुभूती 'चे आहे

' दलित साहित्य ' हे नकाराचे साहित्य आहे. या अर्थाने की, हिंदु समाजव्यवस्था आणि हिंदुधर्माने रूढ केलेली तत्त्वे दलित समाज मानीत नाही. म्हणून त्यावर आधारित अशा कोणत्याही अनुभवाला दलित साहित्यात स्थान नाही. हिंदुधर्माने कर्मसिद्धान्त प्रमाण मानला आहे. पूर्वजन्मीच्या पापपुण्यावर माणसाला वर्तमान जन्म लाभतो. अस्पृश्यांनी गतजन्मी घोर पापे केलीत म्हणून त्यांना अशा दुरावस्थेत हीनतेने जगावे लागते. अशा भाकडकथांवर आता दलितांचा विश्वासच नाही. कर्मविपाक, पुनर्जन्म हे आणि यासारखे तत्वसिद्धान्त दलित ठामपणे नाकारतात. अशा तत्वसिद्धान्ताचे अधिष्ठान असलेल्या अनुभवांचेच आविष्कार मराठी साहित्यात आहेत, म्हणून दलित साहित्य हे संपूर्ण मराठी साहित्याच्या परंपरेलाच नकार देते. जातिव्यवस्थेत सर्व प्रकारची वंचना दलित समाजाला भोगावी लागली. सामाजिक जीवनातही भोगावी लागली अन् वाङ्मयातही भोगावी लागली. म्हणून पारंपारिक व प्रस्थापित मराठी वाङ्मयाविषयी कोणत्याही प्रकारची आत्मीयता बाळगायलाच ' दलित साहित्य ' नकार देते. ज्यात ' आम्ही ' नाही ते आम्ही मानायचेच कशाला ? असा त्यांचा प्रश्न आहे. आतापर्यंत मराठी साहित्याने उच्चवर्णीय हिंदूंच्या जीवनाचे चित्रण केले अन् हिंदु मनोवृत्तीचेच दर्शन घडविले. अस्पृश्यांना हीनतेची वागणूक देणाऱ्या हिंदुमनोवृत्तीला दलितांचा ठाम नकार आहे.

' दलित साहित्य ' हे बंडखोरीचे साहित्य आहे. म्हणजे ते विद्रोही

साहित्य आहे. विद्रोह म्हणजे द्वेष; विद्रोह म्हणज शत्रुत्व; विद्रोह म्हणजे बंड 'दलित साहित्य' एकीकडे वंचनेपोटी होणाऱ्या हृदयविदारक यातनांना उद्गार देते, आणि त्याचबरोबर ज्या सामाजिक व्यवस्थेने दलितांवर हे वचनेचे जिणे लादले त्या व्यवस्थेविषयीचा द्वेष आणि शत्रुत्वही व्यक्त करते. 'दलित साहित्य' हिंदु समाजव्यवस्थेवर प्रखर हल्ला करते. हिंदु श्रद्धांवर घाव घालते आणि स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचा उद्घोष करते. दलित साहित्यिकाना जातिव्यवस्था नष्ट करावयाची आहे; सामाजिक विषमतेचे निर्मूलन करावयाचे आहे. त्यांना सामाजिक परिवर्तन हवे आहे. 'दलित साहित्या'च्या प्रारंभीच्या अवस्थेत तरी दलित लेखकांना असे निःसंशय वाटत होते की, साहित्य हे केवळ मानवी अनुभवांचे निवेदन किंवा आविष्करण करीत नाही तर समाजाला क्रांतिप्रवण करण्याचे ते एक समर्थ माध्यमही आहे. म्हणून 'दलित साहित्य' आपली ही विद्रोहाची भूमिका अपरिहार्य व अन्वर्थक मानते.

परमेश्वराच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही आणि परमेश्वराच्या ठायी समभाव दृष्टीच आहे, असा प्रचार करून प्राचीन संतकवींनी बहुजन समाजात आध्यात्मिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. ही समजूत आजतागायत चालू आहे. परंतु अशा प्रकारच्या आध्यात्मिक समतेवर दलितांचा मुळीच विश्वास नाही. प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या उद्गारांकडे ते अंगुलिनिर्देश करतात. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टचं गुणकर्मविभागशः' म्हणजे गुणकर्मानुसार समाजाची चार वर्णात प्रत्यक्ष परमेश्वरानेच विभागणी केली आहे. तेव्हा अशी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था निर्माण करणाऱ्या देवालाही दलितांचा नकार आहे. उलट त्यांची विवेकनिष्ठ श्रद्धा अशी आहे की, जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था ही मानवनिर्मित आहे. म्हणून सामाजिक विषमतेचे निर्मूलन करून जातिव्यवस्था नष्ट करण्याचे व सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याचे कार्य माणूसच करू शकतो. सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना करण्याच्या बाबतीत मराठी साहित्याच्या संपूर्ण परंपरेलाच अपयश आले आहे. म्हणून आपले साहित्य निर्माण करताना दलित साहित्यिक मराठी साहित्य परंपरेला नकार देतात. मराठी साहित्य हे कधीही क्रांतिकारक नव्हते उलट ते

सदैव प्रतिक्रियावादी होते असेही दलित साहित्यिकांचे प्रतिपादन आहे.

अशा रीतीने वेदना, नकार आणि विद्रोह ही तीन ठळक वशिष्ट्ये धारण करून दलित साहित्य उद्‌भवले; विवक्षित समाजव्यवस्थेने केलेल्या वंचनेच्या वेदना; धार्मिक, सामाजिक आणि मराठी वाङ्‌मयीय परंपरांना नकार; आणि वर्णव्यवस्थेवर उभारलेल्या समाजाविरुद्ध आणि प्रस्थापित मराठी साहित्याविरुद्ध विद्रोह.

प्रारंभीच्या काळात हे सगळं एखाद्या उद्रेकासारखं, स्फोटक स्वरूपात व्यक्त होऊ लागलं. त्यामुळे सवर्ण साहित्यिकांना, साहित्यसमीक्षकांना आणि साहित्य रसिकांनाही ते निःसंशय लक्षवेधी वाटलं.

ज्या काळात हे घडत होतं त्याच काळात म्हणजे सुमारे वीस पंचवीस वर्षापूर्वी सवर्ण साहित्यिकांची अथवा मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांची पिढी मात्र, काम्यू, काफ्का इत्यादी युरोपीय साहित्यिकांच्या साहित्यकृतींनी आणि त्यातील विचार तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन एका अर्थी झपाटल्या-सारखी झाली होती. त्यांची भूमिका ही प्रस्थापिताविरोधी होती. आपल्या कृतिउक्तींनी ही मंडळी प्रस्थापित मराठी साहित्याला, साहित्यविचाराला आणि प्रसंगी प्रस्थापित साहित्यिकालाही अनपेक्षित धक्के देत होती. आणि आपले वेगळेपण व्यक्त करू पहात होती. ' लिट्‌ल मॅगझिन्स ' या नावाची एक चळवळही आकाराला आली होती. दुसऱ्या महायुद्धोत्तर कालीन युरोपीय वाङ्‌मयीन प्रवृत्तीनी प्रभावित झालेले आणि प्रचलित वास्तवतेमुळे भ्रम-निरास झालेले व प्रस्थापिताविरुद्ध उठलेले अनेक तरुण या ' लिट्‌ल मॅगझिन्स ' च्या अथवा ' अनियतकालिकां'च्या चळवळीत उतरले होते. ही चळवळ हा एक स्वतंत्र विषय आहे. परंतु या ठिकाणी सहेतुक हा उल्लेख केला. अशासाठी की प्रारंभीच्या कालात दलित तरुण लेखक–कवीही ' अनियतकालिकां ' च्या चळवळीत किंवा चळवळीच्या आसपास चाचपडत होते. परंतु या चळवळीशी त्यांची नाड फार काळ जुळू शकली नाही. कारण हे मध्यमवर्गीय तरुण म्हणजे पुनः सवर्ण हिंदूच होते. त्यांच्या प्रस्थापित विरोधी चळवळीत आपल्या साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा दलित लेखकांना कशा लाभणार ? (अर्थात त्याच धर्तीवर काही दलित साहित्यिकांनीही अनियतकालिकांचा उपक्रम केलेला आहे. )

दलित साहित्यिकांना साहित्य निर्मितीच्या प्रेरणा लाभल्या त्या प्रामुख्याने निग्रो साहित्यात. नीग्रोंनाही अशाच प्रकारच्या सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागले. भारतीय अस्पृश्यांप्रमाणेच त्यांनाही वंचनेच्या व्यथावेदना सोसाव्या लागल्या. अवमान, अवहेलना, अप्रतिष्ठा सहन करावी लागली. हा समसदृश अनुभव दलितांना प्रकर्षाने जाणवला. अस्पृश्य हे वर्णवादाचे बळी आहेत, तर नीग्रो हे वंशवादाचे बळी आहेत. अस्पृश्यांना गावकुसाबाहेर हद्दपारीचे किंवा बहिष्कृतांचे जीवन जगावे लागले, तर नीग्रोंनाही तशाच प्रकारचे नरकतुल्य जीवन 'घेट्टो'त जगावे लागले. पण मानवी हक्कांसाठी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी, व्यक्तित्वासाठी नीग्रोंनी सातत्याने संघर्ष केला, लढा दिला. इतकेच नव्हे तर नीग्रोंनी स्वतःचे साहित्य व स्वतःच्या कला निर्माण केल्या. तर मग आपणही तसे केले पाहिजे ही प्रेरणा दलितांना लाभली. दलित समाजातलेच एक प्रगाढ व्यासंगी विद्वान कै. डॉ. म. ना. वानखेडे यांनी नीग्रो वाङ्मयावर संशोधन केले. त्यांचा उल्लेख आवर्जून करायलाच हवा. कारण 'दलित साहित्या'च्या चळवळीच्या प्रवर्तकांपैकी ते एक प्रमुख होते आणि या चळवळीमागे त्यांची तितकीच प्रमुख व महत्त्वाची प्रेरणा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळे दलितांमध्ये नवजागृती झालीच होती. नीग्रो साहित्यातून जी प्रेरणा लाभली त्यामुळे या नवजागृतीला एक प्रकारचा भक्कमपणा आला, एक प्रकारची अर्थपूर्णता लाभली.

'दलित साहित्या'ने संपूर्ण मराठी साहित्य परंपरेला ठाम नकार दिला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच आपली एकमेव प्रेरणा असा उद्घोष केला. तोच आपला उद्गाता आणि तोच आपला त्राता. त्यानेच आपली अस्मिता जागृत केली. त्यानेच आपल्याला बळ दिले अन् तोच आपल्याला पाठबळ देईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे व तत्त्वप्रणालीचे अधिष्ठान 'दलित साहित्या'ला लाभले. आणि त्यांच्या विचारप्रणालीचा कल मुख्यत्वे सामाजिक लोकशाहीकडे होता.

गेल्या पचवीस वर्षात दलितांनी अनेक नियतकालिके आणि अनियतकालिके प्रसिद्ध केली. त्यातून दलित साहित्यात निश्चितच मोलाची भर पडली. औरंगाबादहून प्रसिद्ध होणारे 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक स्वरूपाचे

नियतकालिक दलित साहित्य चळवळीलाच वाहिलेले आहे. अनेक दलित कवी, कथालेखक, समीक्षक, प्रथम या नियतकालिकांतून प्रकट झाले. वेगळ्या शब्दात सांगावयाचे तर या नियतकालिकाने ' दलित साहित्या '-साठी एक भक्कम व्यासपीठ निर्माण केले. दलित कविता, दलित कथा, दलित रंगभूमी अशी विविध साहित्यरूपे अन्वर्थक आकार घेत आहेत. दलित साहित्याला भक्कमपणा आणण्यासाठी चर्चासत्रे, परिसंवाद, मेळावे नियमितपणे आयोजित केले जातात. इतकेच नव्हे, तर मोठ्या प्रमाणावर वार्षिक साहित्य संमेलनेही भरविली जातात. या सर्व उपक्रमांनी दलित साहित्याची चळवळ अधिक बळकट करण्याचे प्रयत्न होतात हेही स्तुत्यच आहे. अनेक दलित कवींच्या काव्यसंग्रहांना आणि कथालेखकांच्या कथासंग्रहांना राज्यपुरस्कार मिळाले आहेत. श्री. बाबुराव बागुल हे दलित साहित्याच्या प्रवर्तकांपैकी एक अग्रगण्य कथालेखक. त्यांना काही वर्षांपूर्वी फाय फौंडेशनचे दहा हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. श्री. दया पवार यांनी ' बलुतं ' हे आपले आत्मचरित्र लिहिले. समाजातील बहुतेक सर्व स्तरांतील वाचकांनी त्याचे स्वागत केले. या पुस्तकाचे हिंदीत रूपांतर प्रसिद्ध झाले. त्यातील काही भागाचे इंग्रजी रुपांतरही ' इम्प्रिन्ट ' मधून प्रसिद्ध झाले. अलीकडेच श्री. दया पवार यांना प्रदीर्घ दलित कादंबरी लिहिण्यासाठी ' फोर्ड फौंडेशन'ची दीड लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. आणि त्यांच्या ' बलुतं'वर चित्रपटही तयार होत आहे. हे सर्व धावते संदर्भ दिलेत अशासाठी की, दलितांची विवक्षित समाजव्यवस्थेत हजारो वर्षे वंचना झाली ही वस्तुस्थिती निर्विवाद असली तरीही त्यांच्याच ' वंचनेच्या वेदनेच्या साहित्या'ची विविध स्वरूपात जाणीवपूर्वक दखल घेतली जात आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या पाठ्यपुस्तकांत दलित कवितेला, दलित कथेला स्थान मिळत आहेच. विद्यापीठीय अभ्यासक्रमात दलित साहित्यिकांच्या साहित्यकृतींना सवर्ण हिंदूंच्या साहित्यकृतीइतकेच स्थान मिळत आहे. काही विद्यापीठांतून ' दलित साहित्य ' असा स्वतंत्र विषयच अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे आणि अलीकडच्या काही वर्षांत तर वेगवेगळ्या विद्यापीठात तरुण संशोधक दलित साहित्यावर आणि दलित साहित्यिकांवर प्रबंध लेखनही करीत आहेत. अवघ्या

पंचवीस वर्षात 'दलित साहित्य' हा प्रबंध लेखनाचा, संशोधनाचा विषय व्हावा यातच 'दलित साहित्या'ला मान्यता मिळाल्याची साक्ष आहे असे मला वाटते. प्रस्थापितांच्या प्रतिष्ठित साहित्यपरंपरेला विरोध करणाऱ्या, त्यांच्याशी विद्रोह करणाऱ्या विस्थापितांच्या साहित्यालाही वाङमयीन प्रतिष्ठा लाभली, असेही एकाअर्थी म्हटले तर त्यात वावगे काही नाही. आणि ही मान्यता व प्रतिठा देणाऱ्या राज्य शासनासारख्या, विद्यापीठा-सारख्या किंवा विद्यापीठातील विद्वत् सभेसारख्या यंत्रणाही अशा आहेत की, ज्यात प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे 'सवर्ण हिंदूंचे'च आधिक्य आहे, वर्चस्वहा आहे. म्हणजे सवर्णांनी साहित्य म्हणन 'दलित साहित्या'ला मान्यता दिलेली आहे, असे मानावयास काहीच हरकत नाही. अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, प्रा. मेश्राम, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. यशवंत मनोहर प्रा. प्र. ई. सोनकांबळे असे अनेक दलित साहित्यिक नि.संशय वाचकप्रिय, रसिक-प्रिय झाले आहेत. त्यांच्या साहित्यकृतींवर स्वतंत्रपणेच लिहावे लागल.

प्रारंभीच्या अवस्थेत वाचकांनी, रसिकांनी, समीक्षकांनी 'दलित साहित्या'चे स्वागत एका कुतूहलापोटीच केले असणे शक्य आहे. हे कुतूहल दोन बाबतात होते. एक तर या साहित्याच्या निमित्ताने नवा प्रवृत्तिप्रवाह साहित्याच्या क्षेत्रात प्रकटत होता आणि दुसरे असे की, जे अनुभवविश्व सवर्णांना अपरिचित होते किंवा परिचित असलेच तर केवळ ऐकीव स्वरूपात किंवा कल्पिताच्या रूपात असणेच शक्य व संभवनीय होते, ते अनुभवविश्व प्रत्यक्ष अनुभवणाऱ्या व्यक्तीच्या लेखणीतून साक्षात प्रत्ययकारी होणार होते. साहित्याचा वाचक हा सदैव नव्या नव्या अनुभव विश्वासाठी, भाव-विश्वासाठी उत्सुक असतो. जे साक्षात अनुभव मराठी साहित्यात आतापर्यंत व्यक्त झालेच नव्हते, ते अनुभव व्यक्त होऊ पहात होते. कुतूहल या गोष्टींचे होते आणि ज्यांना हजारो वर्षांच्या समाजव्यवस्थेने लेखणीचे व वाणीचे सामर्थ्य व स्वातंत्र्यच दिले नव्हते, त्यांच्याच लेखणीच्या–वाणीच्या सामर्थ्याचा प्रत्यय वाचकांना येत होता, याही गोष्टीचे कुतूहल होते. अशाप्रकारचे कुतूहलच नसेल तर वाचक सवर्ण साहित्यिकाच्या साहित्यकृतीचाही आस्वाद घेऊ शकणार नाही.

दलित साहित्य हे दलितांनी, दलितांविषयी लिहिलेले हे म्हणणे तूर्त खरे

मानले, (कारण दलितेतरांनी दलितांविषयी लिहिलेल्या साहित्याचे काय ? या प्रश्नाचे नेमके व निर्णायक उत्तर मिळत नाही म्हणून तूर्त असे म्हटले.) तरी दलित साहित्य हे कोणासाठी ? दलितांसाठी असले तरी दलितेतरांसाठीही ते आहे यात शंकाच नाही. कारण त्यातले 'आवाहन' दलितांना असले तरी त्यातले 'आव्हान' दलितेतरांना आहे, सवर्णांना आहे. म्हणून दलित साहित्याला सवर्ण वाचक बहुसंख्येने लाभला ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. वाचकांनी आपली पसंती दर्शविली असेल किंवा नापसंती दर्शविली असेल. दलित साहित्यिकांच्या भूमिकेशी तो सहमत असेल किंवा त्याने मतभेद व्यक्त केला असेल. मात्र दलित साहित्य हे सवर्णातही वाचले जाते यात शंका नाही. परंतु प्रश्न आहे तो असा की, प्रत्यक्ष दलित समाजातून दलित साहित्याला किती वाचकवर्ग उपलब्ध आहे ? खेड्यापाड्यातून असंख्य अस्पृश्य समाज पसरला आहे. अजूनही तो शेतमजुरीच्या, मोलमजुरीच्या अवस्थेत आहे. त्याने बौद्धधर्मही स्वीकारलेला नाही. सवर्णांकडून त्याच्यावर होणारे अत्याचार थांबलेले नाहीत. आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध तोही बंड करून उठत नाही. सामाजिक परिवर्तनासाठी प्रतिबद्ध असलेली दलित साहित्याची चळवळ ह्या समाजगटाला जमेस धरणार आहे की नाही ? त्यांच्यासाठी व त्यांच्यात जनजागरण करण्यासाठी हे वंचनेच्या वेदनेचे, नकाराचे आणि विद्रोहाचे साहित्य कितीसे अन्वर्थक ठरणार आहे ?' त्यांच्यासाठी त्यांनाच ज्ञात असलेल्या व अवगत असलेल्या लोककलांच्या माध्यमांचे उपयोजन करावे लागेल. संत एकनाथांनी समन्वयवादी समाजोद्धारकाची भूमिका घेऊन बहुजन समाजाच्या सर्व स्तरावरील जनसामान्यांना भक्तिप्रवण करण्यासाठी 'भारुडे' रचिली. त्यांच्या 'भारुडां'त 'महार'ही आहे. आणि एकनाथांचा 'महार' जागल्याची भूमिका वठविताना सवर्णांच्या डोळ्यात झणझणीत अंजनही घालतो हे विसरता येत नाही आणि मग सगळ्याच साहित्याला नकार द्यायचा म्हटल्यानंतर एकनाथांचा 'महार'ही नाकारायचा का ? दलित समाजाला सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने क्रांतिप्रवण करण्यासाठी सवर्णांसाठी नव्हे, तर खेडोपाडी पसरलेल्या असंख्य अस्पृश्य बांधवांत जनजागरण करावयाचे असेल तर दलित साहित्यिकांनाही 'दलित भारुडां'सारखे काहीतरी निर्माण करावे लागेल. 'दलित साहित्या'चा

उद्‌गम एक चळवळ म्हणून झाला असेल तर आणि सामाजिक परिवर्तन हे या चळवळीचे अंतिम उद्दिष्ट असेल तर उद्दिष्टपूर्ती होईपर्यंत ही चळवळ संपायला नको. उलट ती अधिकाधिक सामर्थ्यशाली व्हायला पाहिजे.

प्रारंभी ' दलित साहित्या'चे एक कुतूहल म्हणून स्वागत झाले असले तरी नंतरच्या कालावधीत दलित साहित्याला जी मान्यता मिळत गेली व प्रतिष्ठा प्राप्त होत गेली ती त्यांतील वाङमयीन गुणवत्तेमुळे. त्यातील सामाजिक उद्दिष्टांमुळे नव्हे, हेही लक्षात घ्यायला हवे.

' हजारो वर्षेपर्यंत ज्यांना मुळी बोलायचंही स्वातंत्र्य नव्हतं ते आता बोलू लागले आहेत तर त्यांना मोकळेपणानं बोलू द्या. आपणच त्यांच्यावर हजारो वर्षे अन्याय केला आहे. तर आता आपणही त्यांचं निमूटपणे ऐकून घेतलं पाहिजे. ' असे मानभावी औदार्य दाखविणारेही काही सवर्ण साहित्य-समीक्षक आहेत. तर ' ग्रामीण साहित्य अथवा प्रादेशिक साहित्य जर विश्वस्पर्शी वा वैश्विक होऊ शकते तर भविष्यकाळात मराठीतील दलित साहित्यही वैश्विक स्वरूप धारण करू शकणार नाही का ?' असा अप्रस्तुत आशावाद व्यक्त करणारेही सवर्ण साहित्यिक व समीक्षक आहेत.

मराठी साहित्य हे आजपर्यंत कधी क्रांतिकारक नव्हते. ते तसे असते तर मराठी साहित्याने चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरुद्ध बंड केले असते. तसे केले नाही कारण मराठी साहित्य हे हिंदु साहित्य आहे, हिंदू मनोवृत्तीचे साहित्य आहे; हा अपराध दलित साहित्यिकांनी सवर्ण साहित्यिकांच्या माथी मारलेलाच आहे. तेव्हा ' दलित साहित्यात ' तरी नेमके क्रांतिकारकत्व काय आहे, असा प्रतिप्रश्न करणारेही सवर्ण साहित्यिक असू शकतील, नाही असे नाही.

परंतु ' दलित साहित्या'च्या सवर्ण साहित्यावर अथवा सवर्ण साहित्यिकांवर काय प्रतिक्रिया झाल्या, हे पाहण्यापेक्षाही दलित समाजावर काय प्रतिक्रिया झाल्या हे पाहणे अधिक उद्‌बोधक आहे. ज्या दलित साहित्यकृतींचे (उदा. बाबुराव बागुलांच्या कथा-कादंबऱ्या, दया पवारांचं ' बलुतं ' इ.) सवर्णांनीही मनःपूर्वक स्वागत केले, त्या कलाकृतींबद्दल दलित समाजातलेच काही लोक तक्रार करतात. आमच्या समाजाचं दैन्य, दारिद्र्य आणि किळसवाणे भोग यांचीच चित्रणे करून हे साहित्यिक आम्हाला आमच्या

तिरस्करणीय पूर्वायुष्याची पुनःपुनः आठवण का करून देतात ? याचा अर्थ असा की, जे आयुष्य ते पूर्वी जगले त्याच्या आठवणीही त्यांना विसरून जायला हव्या आहेत. धर्मांतराने त्यांना जे नवे जीवन दिले त्या जीवनाचे अनुभव, त्या जीवनाची चित्रणे त्यांना हवी आहेत. भूतकालीन वास्तव त्यांना नको आहे त्यांना हवे आहे वर्तमानकालीन व भविष्यकालीन वास्तव, ज्याचे सम्यक् दर्शन कदाचित केवळ वेदनेचे, नकाराचे व विद्रोहाचे साहित्य घडवू शकणार नाही. 'आमचे दलित साहित्यिक आमच्या पूर्वजांचं लाजिरवाणं जिणं साहित्यकृतीतून उघड्यावर मांडतात, आणि ज्यांनी आमच्यावर हजारो वर्षे हे जिणं लादलं ते सवर्ण मिटक्या मारीत त्याचा आस्वाद घेतात. हे आम्ही सहन करायचं का ?' अशी टीका दलित समाजातलेच काही लोक,– ज्यांनी स्वतंत्रपणे चळवळी बांधल्या आहेत तेही– करतात, तेव्हा त्या टीकेला समर्पक उत्तर देणे कठीण होते.

एवढेच नाही. गेल्या पंचवीस वर्षांनंतर आज असे दिसते का, 'दलित साहित्या'तील अनुभवांच्या आणि आशयाच्या स्वरूपात एक प्रकारची स्थितिशीलता येऊ लागली असावी. अनेक दलित साहित्यकृतीतील अनुभवाचा तोंडवळा पुष्कळदा सारखाच वाटतो. एकूण समाजाच्या आणि त्या समाजातील एखाद्या व्यक्तीच्या व्यथावेदनांचे स्वरूपही सारखेच भासते. व्यक्तिपरत्वे त्यात अभिव्यक्तीच्या दृष्टीने थोडाफार फरक असू शकेल. परंतु एकंदरीत 'दलित साहित्या'तील अनुभवांच्या यथार्थ दर्शनात काहीसा तोचतोचपणा, अभिव्यक्तीत काहीसा सांकेतिकपणाही जाणवू लागला आणि अगदी अलीकडच्या काही काळात तर या साहित्याच्या मर्यादाही स्पष्ट होऊ लागल्या असे वाटते. सुशिक्षित दलित समाजातील असंख्य लोक नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने शहरात स्थायिक झालेले आहेत. त्यांच्या नोकऱ्याही मंत्रालय, बँका, विमा कंपन्या, महाविद्यालये अशा संस्थांमध्ये असतात; जिथे अजूनही सवर्णांचीच बहुसंख्या आहे आणि ती अटळ आहे. परंतु हा जो सुशिक्षित दलित समाज आहे, त्यातून दलित समाजांतर्गत असा मध्यम वर्ग उदयाला आलेला आहे. बदलत्या कालमानानुसार आणि परिस्थितीनुसार कोणत्याही समाजात असे स्तरीकरण होणे अपरिहार्यच असते. दलित समाजांतर्गत मध्यम वर्गाच्या आशा आकांक्षा, महत्वाकांक्षा खेड्या-

पाड्यातील अस्पृश्य समाजापेक्षा भिन्न आहेत. उच्च शिक्षण घेतलेल्या सुसंस्कृत दलिताचे मुंबईसारख्या शहरातील वास्तव्याचे अनुभव आणि खेड्यापाड्यात अजूनही वंचित जीवन जगणाऱ्या दलिताचे अनुभव सारखेच कसे असू शकतील ? शहरातील सुशिक्षित, सुसंस्कृत व सुस्थित दलिताच्या जीवनातील समस्या आणि खेड्यातील अडाणी अशिक्षित दलिताच्या समस्या स्वाभाविकच भिन्न असणार. कळत-नकळत सुशिक्षित व सुसंस्कृत दलित समाजात वर्गीय जाणीवही निर्माण होत आहे आणि अपरिहार्यपणे वर्गलढ्याच्या अन्वर्थकतेचे भानही त्याला होत आहे. अनेक प्रकारच्या व्यथा, वेदना, यातना, वंचना यांचे मूळ आर्थिक विषमतेत आहे, म्हणून वर्णव्यवस्थेविरुद्ध आपल्याला लढावयाचे आहे आणि वर्गव्यवस्थे-विरुद्धही आपल्याला लढावे लागेल आणि आर्थिक विषमतेचे निर्मूलन करण्याकरिता जर वर्गलढा उभारावयाचा तर मग आपल्याला डॉ. बाबा-साहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीबरोबरच अन्य विचारप्रणालींचाही स्वीकार करावा लागेल आणि अर्थातच ही अन्य विचारप्रणाली म्हणजे मार्क्सवादी विचारप्रणाली. ही जाणीव वर्गजागृत दलितांमध्ये निर्माण होत आहे आणि म्हणूनच काही दलित लेखकांना डॉ. आंबेडकरांविषयी व त्यांच्या विचारप्रणालीविषयी संपूर्ण आदर असूनही त्यांचा कल मार्क्सवाद -कडे झुकत आहे. मार्क्सवादी विचारप्रणालीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीला भक्कमपणा आणून 'दलित साहित्या'ला नवे परिमाण प्राप्त करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. परंतु काही दलित लेखक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रणालीच्या बाबतीत काहीसे आग्रही, अपरिवर्तनीय आणि म्हणून एकाअर्थी अशा सुधारणेचे द्वेष्टे आहेत; म्हणून मार्क्सवादविरोधी आहेत. आणखीही काही दलित लेखक आहेत. तेही डॉ. आंबेडकरांचे अनुयायी आहेत आणि ते बौद्धधर्माला महत्व देतात. डॉ. बाबासाहेबांनीच हा धर्म आपल्याला दिला, म्हणून बौद्धधर्माचा प्रचार आणि प्रसार करणे हे 'दलित साहित्या'चे महत्त्वाचे कार्य असले पाहिजे असे त्यांचे मत आहे. संपूर्ण भारतीय समाजाचे धर्मांतर करवून त्याचे बौद्ध-समाजात रूपांतर करणे हेच या साहित्य चळवळीचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे प्राप्त परिस्थितीत असंभवनीय वाटणारे उद्दिष्ट या लेखकांनी मनाशी

वाळगले आहे. अशा रीतीने विद्यमान काळात असे दिसते की, दलित लेखक तीन प्रमुख गटांत विभागले गेले आहेत. आंबेडकरवादी दलित लेखक, मार्क्सवादी दलित लेखक आणि बौद्धवादी दलित लेखक. प्रारंभीच्या अवस्थेत अधिकाधिक बलवत्तर होत जाण्याची क्षमता 'दलित साहित्य' चळवळीत होती. त्वेषाच्या आणि अभिनिवेशाच्या भरात दलितांनी मराठी साहित्य परंपरेला ठाम नकार दिलेला असला तरी समग्र मराठी साहित्याने 'दलित साहित्य' नाकारले नाही. नव्या अनुभवांची भर मराठी साहित्यात पडत होती. आणि एकाअर्थी साहित्याच्या भाषेचीही समृद्धी होत होती. दलितांनी मराठी साहित्य नाकारले म्हणजे नेमके काय केले ? 'आमचे अनुभव त्यात नाहीत, आमचं जीवनदर्शन त्यात नाही; माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदु आहे. माणूस स्वतःलाच साहित्यातून व्यक्त करीत असतो, अन् स्वतःलाच साहित्यातून शोधत असतो. हे जर खरे असेल तर सवर्णांच्या साहित्यात आम्ही कोठे दिसतच नाही. म्हणून सवर्णांचे साहित्य आम्हाला आमचे वाटत नाही;' असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. म्हणून त्यांचा नकार लाक्षणिक अर्थानेच घ्यायचा. एरवी 'दलित साहित्य' म्हणजे समग्र मराठी साहित्यात पडलेली भरच आहे. कारण साहित्य हे जसे आशय आणि अभिव्यक्ती यांवरून ओळखले जाते तसेच भाषेवरूनही ओळखले जाते. कारण शेवटी भाषेच्याद्वारे अनुभवाचे संवाहन होते. म्हणून हेही लक्षात घ्यायला हवे की, दलितांनी मराठी भाषेला नकार दिलेला आहे कै. श्री म. माटे यांचा 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' हा लेख प्रसिद्धच आहे. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, समाजाच्या भिन्न भिन्न स्तरावर जेव्हा लेखक, कवी निर्माण होतात तेव्हा ते आपली भाषा वापरतात. आपल्या जीवन व्यवहाराची, आपल्या जीवन व्यवसायाची भाषा वापरतात. त्यामुळे मूळ भाषा समृद्ध होत जाते. प्राचीन काळात सेना न्हावी, सावता माळी, गोरा कुंभार, चोखा मेळा इत्यादी अनेक संत समाजाच्या विविध स्तरांतून उदयाला आले आणि त्यांनी आपापल्या व्यवसायाच्या परिभाषेचा वापर केला. त्यामुळे प्राचीन मराठी भाषा समृद्ध झाली, हे उदाहरण माटयांनी दिले आणि अर्वाचीन काळातही समाजाच्या भिन्न स्तरावर लेखक निर्माण होतील तेव्हा मराठी भाषा समृद्धच होईल अशी आशाही

त्यांनी व्यक्त केली होती. 'दलित साहित्या'च्या भाषेने मराठी भाषेची अभिवृद्धी होणेच शक्य व संभवनीय आहे. दलित साहित्याचा स्वीकार करताना सवर्णांनी ही जाणीव सुद्धा बाळगली होती आणि 'दलित साहित्य' चळवळीकडे काही अपेक्षेनेच पाहिले जात होते. परंतु दलित लेखकांचे भिन्न भिन्न गटांत जे विभाजन झाले त्यामुळे 'दलित साहित्या'च्या चळवळीतच एका दृष्टीने अडथळे निर्माण झाले. आपसातील वैचारिक मतभेदामुळे चळवळीची अन्वर्थकताही नाहीशी होत चालली. काही दलित लेखक तर चळवळीपासून अलिप्त राहून स्वत:च्या व्यक्तित्वाची पृथगात्मता सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. हा व्यक्तिवादही नजरेआड करता येणार नाही.

प्रारंभीच्या काळात 'दलित साहित्या'ची संकल्पना फक्त वर्णव्यवस्थेचा सतत बळी ठरलेल्या अस्पृश्यांपुरतीच सीमित होती. परंतु आता ज्या दलित लेखकांना अटळ वर्गलढ्याची जाणीव झालेली आहे आणि ज्यांचा कल मार्क्सवादी विचारप्रणालीकडे आहे, त्यांनी स्वेच्छेनेच या संकल्पनेची व्याप्ती वाढविली आहे. समाजातील सर्वच शोषित व पीडित समूहांचा किंवा गटांचा समावेश 'दलित' या अन्वर्थक संज्ञेत ते करू इच्छितात आणि हे जर खरे असेल तर मग 'दलित साहित्या'ला स्वतःच्या पृथगात्म व्यक्तित्वाचा आग्रह सोडावा लागेल. आणि 'जनवादी साहित्या'च्या (Proletariat literature) संकल्पनेत विलीन व्हावे लागेल.

शिक्षणाचा प्रसार आता समाजाच्या सगळ्याच स्तरावर होऊ लागला आहे. आणि सगळ्याच स्तरावर कमी अधिक प्रमाणात जागृती होऊ लागली आहे. आता आदिवासी आणि भटक्या विमुक्त जमातीतूनही आपापले जीवनानुभव अभिव्यक्त करणारे लेखक उदयाला येत आहेत. उदाहरण म्हणून लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीचा उल्लेख करता येईल. म्हणून आता असाही एक प्रश्न उपस्थित केला जातो की, 'दलित साहित्य' स्वतंत्र मानावयाचे तर 'आदिवासी साहित्य,' 'भटक्या जमातीचे साहित्य' असेही मानावयाचे का? म्हणजे साहित्याच्या विश्वातही जातिजमातीवाद Communalism निर्माण करायचा का? परंतु 'जनवादी साहित्य' ही व्यापक संकल्पना स्वीका-

रली तर कदाचित साहित्यातील जातिजमातीवादाचा धोका टाळता येईल.

अर्थात हे सर्व 'दलित साहित्या' च्या चळवळीच्या भवितव्यावर अवलंबून आहे. कारण एक चळवळ म्हणूनच 'दलित साहित्या' चा उद्गार झाला. आज मात्र चळवळ म्हणून त्यातील अन्वर्थकता कमी होऊ लागली. म्हणून या साहित्याचे भवितव्य काय असाही प्रश्न उपस्थित होतो.

००

# आठवणींचे पक्षी

प्र. ई. सोनकांबळे यांनी लिहिलेले ‘ आठवणींचे पक्षी ’ हे दलित साहित्यातील आत्मकथनपर लेखनापैकी एक विशेष उल्लेखनीय असे पुस्तक आहे.

आत्मचरित्रात आत्मचरित्रकार स्वतःच्या जीवनाचा कालानुक्रमाने सलग वृत्तान्त कथन करीत असतो असे करताना आयुष्यात घडलेल्या अनेक घटना, अनेक प्रसंग, विविध प्रकारचे अनुभव, आयुष्यात वाटचाल करीत असताना भेटलेल्या भिन्न भिन्न प्रकृतीच्या व्यक्ती आणि त्यांच्याशी जडलेले सख्यसंबंध या सर्वांची पुनर्मांडणी आत्मचरित्रकार करीत असतो. त्यातूनच त्याच्या व्यक्तित्वाची, व्यक्तिमत्त्वाची आणि जीवनाची घडण कशी होत गेली, हे वाचकांना कळणे शक्य व संभवनीय होते. आत्मचरित्र-काराच्या व्यक्तित्वाचें सत्यपूर्ण दर्शनही त्यातून घडते. आत्मचरित्रकाराच्या जीवनाला आणि जीवनानुभवांना कालाचे व समाजाचेही संदर्भ असतात. म्हणून अनुषंगाने आत्मचरित्रात तत्कालीन सामाजिक वास्तवाचे दर्शन घडणही शक्य व संभवनीय असते. शक्य व संभवनीय अशासाठी की, आत्मचरित्र लिहिण्यामागे लेखकाचा जो हेतू अथवा जी भूमिका असेल, त्यावर हे अवलंबून असते. आणि कोणत्याही साहित्यकृतीचे स्वरूप अंशतः तरी त्या साहित्यकृतीच्या हेतूशी निगडित असते. आत्मचरित्रात्मक लेखनही त्याला अपवाद नाही.

'आठवणींचे पक्षी' हे नुसतेच आत्मचरित्रात्मक लेखन नाही ते दलित साहित्यातील आत्मचरित्रात्मक लेखन आहे. म्हणून त्याचा विचार आत्मचरित्र या दृष्टीने जितका संभवतो, तितकाच दलित साहित्य या दृष्टीनेही संभवतो.

'आठवणींचे पक्षी' हे आत्मचरित्रात्मक लेखन आहे. परंतु सलग जीवनवृत्तान्त करणारे आत्मचरित्र नाही, हे प्रारंभीच लक्षात घ्यायला हवे. नाही तर 'आत्मचरित्र' या दृष्टीने त्यात अनेक घटकांचा अभाव जाणवू लागेल. मग या लेखनाचे स्वरूप काय? लेखकाने विवक्षित अनुभवासंबंधीच्या आठवणी सांगितल्या आहेत, त्या सांगताना त्याने विवक्षित अशी भूमिका घेतलेली नाही. अथवा निश्चित असा हेतूही मनाशी बाळगलेला जाणवत नाही. आपल्याला आलेल्या अनुभवांच्या आठवणी सांगत असताना त्याने कोणत्याही प्रकारचे भाष्य केले नाही. किंवा अनुभवजन्य कृतिउक्तीचे समर्थनही केले नाही, अथवा ह्या आठवणी सांगत असताना त्याला जाणीवपूर्वक कोणत्याही विचार तत्त्वांचे अधिष्ठान दिलेले नाही. अगदी स्वाभाविकपणे व सहजपणे आठवणी सांगितल्या आहेत. त्या सांगण्यातही एक प्रकारचा तटस्थपणा वा अलिप्तपणा आहे. त्या सगळ्याच अनुभवात वास्तविक लेखक अंतर्भूत आहे आणि तरीही त्या अनुभवात गुंतून न राहाता त्यांतून बाहेर येऊन तटस्थपणाने हे कथन लेखकाने केले आहे. म्हणूनच आठवणी सांगत असताना हा लेखक कोठे भावविवश झालेला विकारवश झालेला जाणवत नाही. अशा प्रकारची तटस्थता सर्वच आत्मचरित्रकारांना साधते असे नाही, 'Spontaneous overflow of powerful feelings taking its origin into the recollection of Tranquility' या उद्गारात वर्डस्वर्थला जे अभिप्रेत आहे, ते काहीसे ह्या आठवणींतून प्रत्ययाला येते. स्वस्थपणानेच 'एकदा काय झालं,' 'त्याचं असं झालं, बरं का.' 'एकदा असं घडलं की, एक व्हतं घर. घरधन्याचं नाव होतं गवरदीन. तो व्हता मुसलमान' (पृ. १८) अशी सुरुवात करून हा लेखक आपल्या अनुभवांच्या आठवणी सांगतो. त्या सांगण्यात सहजता आहे, तशीच उत्स्फूर्तताही आहे. एखाद्या पक्ष्याची उत्स्फूर्त झेप नजरेत भरावी, तसे ह्या आठवणींचे पक्षी वाचकांच्या मनात भरतात. अनेक पक्षी एकत्र जमले की,

त्यांचाही स्वयंसिद्ध असा एक आकृतिबंध अभावितपणे तयार होतो. तसेच या लेखनात झाले आहे. एकत्रित केलेल्या ह्या सर्व आठवणी मधून प्र. ई. सोनकांबळे यांच्या आयुष्यातील एका विशिष्ट कालखंडातील त्यांचे ‘ चरित्र ’ च लाक्षणिक अर्थाने प्रकट झाले आहे. शेवटी आठवणी ( **memoirs** ) हा सुद्धा चरित्र आणि आत्मचरित्र या साहित्यरूपाचाच एक उपप्रकार आहे. म्हणून ‘ आठवणींचे पक्षी ’ हे आत्मचरित्रात्मक लेखन या दृष्टीने अन्वर्थक आहे, असे म्हणता येईल.

ह्या आठवणींचा आणि त्यातून अभिव्यक्त झालेल्या अनुभवांचा आवाका तसा सीमितच आहे. ह्या आठवणी, म्हटल्या तर एका अर्थी बालपणातल्या आहेत. आणि बालपण सरत आल्यानंतरच्याही आहेत. निवेदकाचे आईवडील निधन पावल्यानंतर तो पोरका झाला. ‘ परदेशी ’ झाला. वडील बहिणीच्या घरी आश्रयाला आला. तेव्हापासूनच्या आठवणी आहेत. त्यावेळी निवेदकाचे वय दहाबारा वर्षांचे असावे. लोक म्हणायचे त्याच्या बहिणीला, “ अग तसं पोमाळून ठिवू नको त्याला. चांगला बारा तेरा वर्षांचा हाय. त्याला काय झालंय दुदग्याला. ” (पृ २६) दुसऱ्याच्या आश्रयाला आपण राहिलो तरी आपले ओझे त्यांच्यावर पडता कामा नये, ही जाणीव त्याला होती म्हणून तो पडेल ते आणि मिळेल ते काम करण्याची पराकाष्ठा करीत होता. आणि हे सगळे करताना त्याची खरी तळमळ व धडपड होती शिक्षण पूर्ण करण्याची. चौथीपासून मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण करताना त्याला अनेक अनुभवांच्या दिव्यातून जावे लागले. त्यानेच म्हटल्याप्रमाणे ‘ मी पोटाला मारला गेला व्हतो ’ (पृ. २९) ही वेदना तो विसरू शकत नव्हता. म्हणून शिकण्याचा ध्यास पूर्ण करतानाच पोटातील मूलभूत भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठीही त्याला अनेक दिव्ये करावी लागली. शेवटी तो मॅट्रिकची परीक्षा पास झाला. त्यानेच मनमोकळेपणाने सांगितल्याप्रमाणे ‘ खूप आनंद झाला कारण आंधळा एक डोळा मागत होता तर दोन मिळाले.’ (पृ.६१) तो सेकंड क्लासमध्ये पास झाला. पुढचे शिक्षणही झाले.

तो एम्. ए. झाला. त्याला नोकरीही मिळाली. पुढे केव्हा तरी त्याचे लग्नही झाले असावे. कारण शेवटच्या आठवणीत पत्नीचा व मुलीचा उल्लेख

येतो. (पृ. ७२) परंतु मॅट्रिकनंतरच्या या अनुभवासाठी निवेदकाला फारसे दिव्यातून जावे लागले नसावे. श्रीमंतांच्या मुलांनी धुळवडीत रंगलेले आणि रंगविलेले कपडे तसेच टाकून दिले. ते नीट धुऊन निवेदकाने वापरले (पृ. ६९) अशा काही आठवणी आहेत. परंतु मिलिंद महाविद्यालयात उच्च शिक्षणाची सोय होती, वसतिगृहात राहाण्याखाण्याची सोय होती. तसे पाहिले तर सगळेच वातावरण अनुकूल होते. मॅट्रिकपर्यंत जे अनुभव आले त्यापेक्षा ही पुढची वाटचाल बरीचशी सुखावह होती. हे सांगितले अशासाठी की, प्र.ई. सोनकांबळे यांच्या ह्या आत्मचरित्रात्मक लेखनातील बहुतांशी आठवणी मॅट्रिक होईपर्यंतच्याच काळातल्या आहेत. आणि याच अर्थानें या पुस्तकातील अनुभवविषयांचा आवाका सीमित आहे. निवेदकच एका ठिकाणी म्हणतो, 'असाच कसावसा झालो मॅट्रिक पास. याचा अर्थ नापास झालो असा नव्हे तर कदी गवत कापीत, कदी निंदायला जात, कदी दुकान सारवीत, कदी शेण भरीत, कदी आंबे राकीत, कदी शेंगा काढीत, तर कधी कापूस वेचीत, कदी वागाटे आणीत, चिंचेचे फूल बायाना आणून देत व वाढलेल्या भाकरी खात, तर कदी दसकटे वेचीत, तर कदी पळसाच्या पानाच्या पत्रावळ्या लावीत, तर कदी लाकडं फोडीत, तर कदी येसकरी रोजनामा सही करून आणीत, कदी मेलेल्या मढ्याची बातमी देत, तर कदी बोलाया-संग उत्तमाच्या बाया आणाया जात, हाच काय तो याचा अर्थ.' (पृ. ५६) उच्च शिक्षणासाठी त्याला अशी यातायात फारशी करावी लागली नाही.

भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी, कधी अर्धी चतकोर भाकर मिळण्याच्या आशेने 'वतलात मरून पडलेलं अन् सडून गेलेलं कुत्र दूर नेऊन टाकण्याचं काम करावं लागलं, मोठ्या मिनतवारीने अर्धी चतकोर भाकर मिळाली तीही अवहेलनेच्या अभिप्रायासह.' (पृ. १६); कधी नुसते खांड खायला मिळेल या आशेवर मुसलमान कुटुंबाबरोबर 'सुंत्या' च्या समारंभाला गेला. पण तिथेसुद्धा उपेक्षा. (पृ. १८|१९); महारोगी बाईच्या ताटलीत जेवायचा अन् 'नारू'च्या विहिरीतील पाणी पिण्याचा प्रसंग आला (पृ. १९). रात्री बचवून ठेवलेला भाकरीचा तुकडा कुणी पाहील या संकोचभयाने तहसील कचेरीच्या संडासामागे चोरून खायची वेळ आली.

(पृ. २०) लोक मायेनं हुरडा खा म्हणायचे अन् खायला लागले की पुन: वर म्हणायचे, " खा म्हनालं की खावंच का रे ? " (पृ २८) कुत्र्यानं शिकार मारून आणली. तोंडात धरून पळत होता. निवेदकाला वाटलं कुत्र्याच्या तोंडातला मांसखंड आपल्याला मिळाला तर ? कुत्र्याची शिकार करायला गेला, पण स्वतःच ' शिकार ' बनला (पृ. ४५ ते ४८) मॅट्रिक-पर्यंतचे शिक्षण कसेबसे पूर्ण केले, त्या काळातले हे काहीसे भयानक, विदारक आणि काळजाचा ठाव घेणारे अनुभव लेखक सांगतो. अशा दिव्यातून जात जात त्याने शिक्षण पूर्ण केले तेवढ्याच आठवणी प्रामुख्याने तो सांगतो.

मोठ्या बहिणीकडे राहात असताना तिच्या खोपटाला लागलेली आग; सासूच्या फुसलावणीने तिच्या नवऱ्याकडून तिला मिळणारा मार! मग निवेदकाची विमनस्कता आणि दुसऱ्या बहिणीकडे निघून जाणे ! तिथेही ' इकडे आड तिकडे विहीर ', ' आगीतून उठून फुफाट्यात जाणे ' असाच अनुभव घेणं इत्यादी आठवणी निवेदकाने सांगितल्या आहेत. परंतु एकंदरीत पाहाता ' आठवणींचे पक्षी ' मधील अनुभवविश्वाचा आवाका सीमित आहे, असे लक्षात येते; शिवाय विशिष्ट अनुभवाच्याच ह्या आठवणी असल्यामुळे त्यात स्वाभाविकच अनेक परिमाणता नाही.

प्र. ई. सोनकांबळे यांची निवेदनशैली लक्षणीय आहे. बहुतांशी आठवणी मराठवाड्यातील महारी बोलीत सांगितलेल्या आहेत. अखेरच्या काही आठवणी मात्र नागरी सुसंस्कृत बोलीत सांगितल्या आहेत. उच्च शिक्षणाच्या संस्कारांनी निवेदकाचे नवे व्यक्तिमत्त्व घडले, याची सूचकता त्यात आहे. निवेदकाच्या पोशाखात बदल झालेला आहे. प्रवासात तो आता चिरगुटाचे बोचके बाळगीत नाही. तर सूटकेस वापरतो. त्याच्या विवेचनातही ' कॅथार्सिस ', ' आउटलेट ' असे शब्द प्रयोग येऊ लागले आहेत; परतु हा सारा बदल निवेदनाच्या ओघात सहजपणे जाणवतो. गाडीत बसलेल्या प्रवाशांना गाडीने ट्रॅक बदलल्याचे सहजपणे जाणवावे त्याप्रमाणे; सहजता हे तर या लेखकाच्या निवेदन शैलीचे ' स्व ' भाव वैशिष्ट्यच आहे. निवेदक लहान लहान प्रसंग सांगतो. प्रसंगानुरूप मग वाक्यरचनाही सुट-सुटीत अल्पशब्दयुक्त, वाक्यसमूहाला मग स्वाभाविक लयही प्राप्त होते.

'झालं काय एकदा तर मी गेलो व्हतो बिबाडीत. वांजरखाडयाच्या रानात. बिबे आनाव म्हनून. लई मिळाले बिबे. आलो घेऊन कुंचीत. मला लागली व्हती भूक लई. आलों चेऱ्याच्या रानात. व्हतं एक वावर शेंगाचं.' (पृ.३७) 'एकदा व्हती महिनेवारी परीक्षा. व्हता सायन्सचा पेपर—व्हते नांदापूरकर गुरूजी शिकवायला. ठेंगणे पन गुटगुटीत लई तिखट व्हते. त्याला सायन्स सगळं बुक पाठ व्हतं पन बी. एस्. सी. आजून निगालेच नाहीत.' (पृ. ४३) 'असाच मी लहानचा मोठा होत चाललो. लोक चैनीत तर मी बेचैनीत. लोक मजेत तर मी सजेत. लोक महडचा हवेल्यात तर मी दसकटाच्या पळाटयाच्या वावरात. मला वाटायचं बाईट, पण करावं काय, नाईलाज. जिकडे तिकडे दुःखच दुःख दिसायचं . ...' (पृ ५२) अशी कितीतरी उदाहरणे उद्धृत करता येतील.

आठवणींच्या निवेदनात खरे तर कथाकथन आहे, असे सतत जाणवते. वाचताना आपण जणू श्रवणच करीत आहोत, असा प्रत्यय येतो. आणि वाचून पूर्ण होईपर्यंत आपले अवधानच ढळत नाही. हे सगळे यश हृद्य आठवणीइतकेच सहज, स्वाभाविक व ओघवती शैलीचे; त्यात आणखी वैशिष्टय म्हणजे अधूनमधून निवेदनाच्या ओघातच आलेल्या म्हणी, वाक्प्रचार इत्यादी; उदा. 'आली सुगी फुगले गाल, गेली सुगी मागचे हाल.' (पृ. २०); 'आडला नारायण' (पृ. २०); 'ईकडं आड तिकडं हीर,' 'आगीतून उठून फोफाटयात पडल्यावानी' (पृ. ३०) 'चोराच्या मनात चांदणे' (पृ. ५०); 'अदिला पदी घुबडाला गादी' (पृ. ५३) अशा वाक्प्रचार म्हणींमुळे भाषेलाच सौंदर्य प्राप्त झाले असे नव्हे, तर ज्या अनुभवांच्या संदर्भात वाक्प्रचार-म्हणी आल्या आहेत, त्या अनुभवांची अन्वर्थकताही प्रत्ययकारी बनली.

प्रस्तुत आत्मचारित्रात्मक लेखनाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यात अनुषंगाने आलेली व्यक्तिचित्रणे; आत्मचरित्रांतर्गत व्यक्तिचित्रणे या दृष्टीने ती निःसंशय उल्लेखनीय आहेत. अल्पाक्षरत्व हे याही संदर्भात वैशिष्टयच म्हणता येईल. या अर्थाने की, विस्ताराने व्यक्तिवर्णन न करता मोजक्या आणि नेमक्या शब्दात व्यक्तीचे क्षणचित्र लेखक वाचकापुढे प्रत्ययकारी करतो. उदा. ' तितक्यातच आला एक झुपकेदार मिशावाला

बारका माणूस. दिसायला मटा काटकुळा बारीक पण आवाज मटा भारी. व त्यातच भर म्हणजे तो पाटलाच्या भावकीचा व जरा जंतर मंतर करनेवाला." (पृ. ७०) किंवा "मला रस्त्यावरूनच एका म्हातारीनं पाहिलं. ती व्हती म्हराठ्याची. तिचं नाव गंगाबाई नि होता तिचा कान फुटका, नि थोडीशी गेंगानीही पण व्हती ती. तिच्या लेकाचं नाव व्यंकटी पाटील. त्याचो मजवर थोडी फार मर्जी होती. कारण मी म्हणायचा भाकड ते त्याला आवडायचं. तो व्हता देवाचा वारू" (पृ. १६). आपल्या बहिणीचे (अक्काचे) आणि दाजीचे (तिच्या नवऱ्याचे) व्यक्तिचित्रण, त्याचप्रमाणे वर्ग मित्रांची, वर्ग शिक्षकांची व शेजाऱ्यापाजाऱ्यांची अशी किती तरी क्षणचित्रे या लेखनात आहेत.

मात्र केवळ आत्मचरित्रात्मक लेखन या दृष्टीनेच 'आठवणींचे पक्षी' चा विचार करून भागणार नाही. कारण ती एक दलित–साहित्य-कृती आहे. म्हणून दलित साहित्याच्या संदर्भात या पुस्तकाचे चिकित्सक विवेचन होणे आवश्यक आहे. दलित साहित्य म्हणजे काय याचा सविस्तर ऊहापोह या ठिकाणी अप्रस्तुत ठरेल. परंतु दलित साहित्य असे म्हणत असताना साधारणत: कोणकोणत्या गोष्टी अभिप्रेत असतात (दलित साहित्यिकांना व दलित साहित्याच्या भाष्यकारांना) हे लक्षात घेता येईल. वास्तविक ही साहित्यपरंपरा १९५६ च्या सुमारास झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांसह केलेले धर्मांतर आणि त्यानंतर अल्पावधीतच त्यांचे झालेले महानिर्वाण या दोन ऐतिहासिक दृष्ट्या अन्वर्थक घटनांत या साहित्यपरंपरेचे मूळ आहे. चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेने जे नरकतुल्य जिणे या समाज घटकांवर हजारो वर्षांपासून लादले होते, ते धर्मांतरामुळ भिरकावून देता आले आणि दास्यमुक्तीचा आनंद भोगता आला. परंतु डॉ. बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले आणि क्षणकाल एक प्रकारची निर्नायकी अवस्था या समाजात निर्माण झाली. ज्याने आपल्यात अस्मिता जागृती केली, आपले आत्मबळ वाढवले, उत्थानाचा मार्ग दाखविला तोच आपल्यातून गेला या जाणिवेने एक प्रकारची विमनस्कता निर्माण होण्याची शक्यता व संभवनीयता निर्माण झाली होती. आणि नेमके याच परिस्थितीत लेखणीचे व वाणीचे बळ लाभलेल्या दलितांच्या पिढीतील सुशिक्षितांनी विद्रोहाची भूमिका घेऊन ही साहित्यपरंपरा सुरू केली. आपले प्रश्न आपणच

सोडविले पाहिजेत. आपले बळ घेऊन आपणच लढले पाहिजे. मराठी साहित्याने दलितांच्या जीवनाला त्यांच्या व्यथावेदनानाही एकाअर्थी गावकुसा बाहेरच ठेवले होते. ही जाणीव दलितांना झाली. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार–तत्वज्ञानातून प्रेरणा घेऊन ते लिहू लागले. 'दलितांनी दलितांविषयी लिहिलेले साहित्य' निर्माण व्हायला लागले.

दलित साहित्याचा विचार करताना ही पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे. मराठी साहित्यात दलितांचे जीवनानुभव व्यक्त झाले नाहीत; म्हणून विद्रोहाबरोबरच नकाराची भूमिका दलित साहित्यिकांनी घेतली. दलित साहित्याच्या संदर्भात जी विधाने सामान्यतः केली जातात, तीही या दृष्टीने लक्षात घेता येतील.

दलित साहित्य हे वेदनेचे साहित्य आहे. हजारो वर्षांपासून चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेने जो अन्याय व जुलूम केला त्याची ठसठसणारी वेदना, आपल्याच जीवनानुभवांच्या अभिव्यक्तीतून दलित साहित्यिक करू लागले. त्यातून दलितांच्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या.

दलित साहित्य हे विद्रोहाचे साहित्य आहे. विद्रोह म्हणजे तरी नेमके काय? सख्यसंबंधाच्या विरुद्ध जे जे ते सर्व त्यात अभिप्रेत आहे. दलित साहित्याने दुस्तरी विद्रोह जाहीर केला. चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेशी विद्रोह, आणि पारंपारिक मराठी साहित्याशी विद्रोह. म्हणून दलित साहित्य हे आक्रमक मानले गेले. स्वाभाविकच विद्रोहाची भूमिका घेतली की आक्रमक व्हावेच लागते. मग त्याबरोबर चीड, संताप, त्वेष, आवेश, अभिनिवेश हे सर्व ओघाने येतेच. कारण हे आले नाही तर विद्रोहाच्या आविष्कारात अपेक्षित धग कशी निर्माण होणार?

दलित साहित्य हे क्रांतिकारक साहित्य आहे, असेही एक विधान केले जाते. मराठी साहित्य हे कधी क्रांतिकारकच नव्हते. असते तर चातुर्वण्य व्यवस्थेच्या विरुद्ध बंड झाले असते, ती व्यवस्था कधीच मोडता आली असती. दलित साहित्य हे एका अर्थी चातुर्वर्ण्याधिष्ठित समाज व्यवस्थेविरुद्ध बंड आहे. हेच साहित्य समाजाला क्रांतिप्रवण बनवू शकेल.

दलित साहित्याच्या संबंधात केली जाणारी इतर विधाने मी उद्धृत करीत नाही. परंतु साधारणतः दलित साहित्य म्हटले की वेदना, विद्रोह,

आक्रमकता व क्रांतिकारकता ही चतुर्विधता (Four Foldness) त्यात अपेक्षित असते, अभिप्रेत असते.

आता कोणत्याही दलित साहित्यकृतीचे समीक्षण करताना प्रश्न असा येतो की, ही सर्व लक्षणे व्यवच्छेदक म्हणून मानायची का ? म्हणजे असे की, त्यांची उपस्थिती असली तरच ते दलित साहित्य, परंतु त्यांचा अथवा त्यापैकी काही लक्षणांचा अभाव जर एखाद्या साहित्यकृतीत असेल तर मग त्याला दलित साहित्य म्हणायचे की नाही? 'आठवणींचे पक्षी' या आत्मचरित्रात्मक लेखनाच्या संदर्भात तर हे प्रश्न अधिक जाणवतात. आपले विशिष्ट अनुभव अथवा आपल्या विशिष्ट अनुभवांच्या आठवणी अत्यंत मनमोकळेपणाने, प्रांजळपणाने, आणि सच्चेपणाने निवेदकाने सांगितल्या आहेत. परंतु त्या सांगताना निश्चित असा हेतू मनाशी बाळगल्याचे कुठेच जाणवत नाही. कारण हे लेखन करताना सहेतुकपणे विद्रोहाची भूमिकाच लेखकाने घेतलेली नाही. किंबहुना या लेखनामागे भूमिका अशी कोणतीच नाही. केवळ जे आपण अनुभवले ते तटस्थपणे, अलिप्तपणे सांगणे हीच काय ती भूमिका. म्हणून 'आठवणींचे पक्षी' मध्ये विद्रोह, आक्रमकता, क्रांतिकारकता इत्यादींचा प्रारंभापासूनच अभाव जाणवतो. हे सर्व नाही म्हणून या लेखनात आवेश नाही. अभिनिवेश नाही. त्वेष नाही तसाच द्वेषही नाही. पण हे नाही म्हणूनच इतर काही गोष्ट या लेखनात जाणवतात असे मला वाटते. 'चुंबीत बसलो' असा शब्दप्रयोग अनेकदा या लेखनात आढळतो. या शब्दाचा शब्दकोशात अर्थ आहे : 'एखादी गोष्ट नाइलाजाने करणे.' (किंवा शब्दकोशातलाच आणखी अर्थ द्यायचा तर झक मारत करणे') म्हणजे येणाऱ्या अनुभवातली अपरिहार्यता, अटळता जी आहे ती स्वीकारूनच हा लेखक वास्तवजीवनाला सामोरा गेला असे दिसते. 'कदी पत्रावळीत तर कदी मातीवर खाली पडायचं पण मी घेयाचो व खाउन घेयाचो नाईलाज म्हणून' (पृष्ट ६), 'मला कदी कदी नग म्हणावं वाटायचं. पण आक्का शिव्या देईल वाटायचं, म्हणूनशीन तमंच चुंबीत जायचो कुठं बी,' (पृ. २६) 'शब्द न काढता हं हं म्हणायचो तसं म्हणताना माज्या मनात कसंतरी वाटायचं पण म्हणतात ना 'अडला

नारायण...' तसं झालं मजं म्हणून धरली व्हती नोकरी. नाईलाज व्हता...' (पृ. २७)

आता नाइलाजाने हे सगळं सहन करावे लागत होते, याचा अर्थ निवेदकाच्या व्यक्तित्वात काही दुबळेपणा होता का ? तसे मानण्याचेही काही कारण नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे मूल्य या समाजाला दिले होते. शिक्षणामुळे आपल्या जीवनात आमूलाग्र बदल होईल, ज्या गोष्टींना आपण आजपर्यंत वंचित झालो, त्या आपल्याला हक्काने मिळू शकतील, हा आत्मविश्वास या समाजात निर्माण होत होता. आणि त्यातूनच एक प्रकारचा आशावादही बळावत होता. 'आठवणींचे पक्षी'चा निवेदक शिक्षण पूर्ण करण्यासाठी धडपडत होता. त्यासाठीच केवळ परिस्थितीने 'पोटाला मारला गेला व्हता' (पृ. २९) म्हणून नाइलाजाने काही गोष्टी तो न चिडता, न संतापता म्हणजेच एका अर्थी विद्रोह न करता करीत होता. कारण त्याच्या ठिकाणी आशावाद होता. म्हणूनच तो म्हणत होता, 'असं करू तर कसं व्हईल. तसं करू तर कसं व्हईल. ईकडं आड तिकडं हीर. आगीतून उठून फोफाट्यात पडल्यावानी वाटू लागलं, पण वाटायचं की बाबा जातील हे बी दिवस.' (पृ. ३०)

आता वास्तविक ज्याची मनोवृत्तीच अशी आहे, त्याला सहेतुक अथवा बुद्धिपुरस्सर विद्रोहाची भूमिका घेतली की मग विद्रोहजन्य विकार उद्भवणे अपरिहार्य असते. आणि एकदा ते उद्भवले की मग माणुसकीविषयीही कृतज्ञता वाटेनाशी होते.

परंतु "आठवणींचे पक्षी" चा लेखक तर ठायी अशी कृतज्ञता व्यक्त करताना दिसतो. तो व्यवस्थेवरही तुटून पडत नाही. आणि 'उत्तमा' विषयी (उच्चवर्णीयांविषयी) अकारण आकसही बाळगीत नाही. तो फक्त अनुभवांना सामोरे जातो. त्यांचा स्वीकार करतो. म्हणूनच तो पूर्वग्रह न बाळगता माणसातले जे चांगले ते चांगलेच मानतो आणि वाईटास वाईटच मानतो

'वार्षिकलाबी पास झालो व रूळ सोडून गेलेली गाडी पुनः रूळावर आली. जर का मी हा दाजी काय म्हणील तो दाजी काय म्हणील म्हणून थांबलो असतो तर मजी शाळा बीनपाण्याची तशीच वाळली असती का

नाही बरं तुम्हीच सांगा. म्हणूनशीन मला वाटतं व व्हटात येतात शब्द. म्हणतात 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास वैर' (पृ. १२). स्वकीयांविषयीचा स्वजनांविषयीचा असा अनुभव निवेदक सांगतो. आणि ज्या विनायक गुरुजींनी त्याला साह्य केलं, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो, 'कसं विसरू विनायकरावा तुम्ही केलं जग स्वैर मजसाठी' (पृ. १२).

सेकंडक्लासमध्ये पास होणं हा निवेदकाचा अपरंपार आनंदविषय होता. या संदर्भात तो म्हणतो, 'घरी आलो. सर्वांना सांगितले. लोकांना आनंद झाला. कारण मी सर्वांनाच लावून घेऊन वागत होतो, साऱ्यांनाच आनंद झाला व बामणाच्या घरी जिथं मी शेणपाणी करत होतो तिथंही समजल्यावर आनंद झाला. आता जरा कोणी पुढे गेला किंवा कुणाचे बरे झाले की जळफळाट होतो तसं त्यावेळी होत नव्हतं.' (पृ. ६२) विद्रोहाच्या प्रकृतीत अशा प्रकारची कृतज्ञता, नम्रता बसत नाही.

दलित साहित्यात ज्या विद्रोहाची अपेक्षा असते, त्या विद्रोहाचा तर 'आठवणींचे पक्षी' मध्ये अभावच जाणवतो. विद्रोह नसल्यामुळे मग त्यात आक्रमकताही नाही. आहे फक्त आठवणीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवांची कथा आणि व्यथा.

'आठवणींचे पक्षी' मधील निवेदक 'सुशिक्षित' झाला, तसाच 'सुसंस्कृत' झाला. व्यवसायाने प्रतिष्ठित झाला. बायको व लहानगी मुलगी अशा सुटसुटीत संसारात तो 'गृहस्थ' बनला. आणि तरीही ठसठसणारी वेदना (जी निवेदकाच्या अनुभवकथनातून अस्फुटपणे जाणवते) शिल्लकच राहाते. एवढे सगळे झाले तरी त्याच्याकडे बघण्याची समाजाची मनोवृत्ती बदललेली नाही. मित्राकडे गेल्यानंतर (सहकुटुंब) कागदाच्या तुकड्यांवरच त्यांना फराळ करावा लागतो; ठेवणीतल्या 'प्लॅस्टिकच्या लाल हिरव्या गिलासात' पाणी प्यावं लागतं; त्याच 'गिलासात' गाईचे पातळ दूध प्यावे लागते; सगळ्यांचा आग्रह होतो. तो आग्रह निवेदकाचे मन दुखवणारा असतो; पण आग्रह मोडवत नाही, म्हणून तो हे सगळं स्वीकारतो. 'पाण्याचा दुष्काळ असतांनाही तेथे नदी असल्यामुळे दुधात पाणी व्हतं... गोड असल्यामुळे आम्ही ते पिलो कारण त्याचा बाप साखरेचा चेअरमन हे ..' (पृ. ७७) अशा कडवट उपरोधात आपली व्यथा विरघळवून

टाकण्याचा प्रयत्न निवेदक करतो. परंतु मनोमन असणाऱ्या त्या वेदनेचे अस्तित्व वाचकांना जाणवते. 'ते लोक खाली बसून जरा अंतरावरच बोलले.' (पृ. ७७) हे अंतरच वाचकांना दलितांच्या वेदनेविषयी खूपसे काही सांगून जाते.

दुसऱ्या गावात एका मुसलमान कुटुंबात निवेदकाला जी वागणूक मिळाली, तीही अन्वर्थक आहे. "बेटा, हमारा और तुमारे बापका बहोतही दोस्ताना था" असे म्हणून त्याने निर्माण केलेली आत्मीयता व जिव्हाळा-सुद्धा वाचकांपुढे प्रश्नचिन्ह निर्माण करतो. "मग मला वाटते की, एकीकडे आम्ही ज्या गावात जन्मलो तिथे कशी वाईट वागणूक दिली जाते, व दुसऱ्या गावात कशी चांगली वागणूक दिली जाते." (पृ. ८०) निवेद-काच्या ह्या शेवटच्या उद्गारातूनही मनोमन असणारी वेदनाच ध्वनित होते.

कोणतीही वेदना ही स्फुट स्वरूपात, भडक परिवेशात, आक्रमक पावि-त्र्यातच व्यक्त झाली पाहिजे अशीच अपेक्षा का? वास्तविक अनुभवांच्या विशुद्ध, निर्हेतुक, प्रांजळ निवेदनातूनही वेदना ध्वनित होऊ शकते.

'आठवणींचे पक्षी' मधील निवेदक (म्हणजे अर्थातच लेखक) विद्रोहाची भूमिका घेत नाही. आक्रमकाची भूमिका घेत नाही. तसेच, कोणत्याही अनुभवावर भाष्य करीत नाही. आणि तरीही हे 'दलित जाणिवे'चे दलितांच्या वेदनेचे साहित्य आहे. आणि यातच या साहित्यकृतीचे वेगळेपण आहे.

विद्रोह, नकार, आक्रमकता, तथाकथित क्रांतिकारकता इत्यादी प्रवृत्तीं-मुळे दलित साहित्यात एकसुरीपणा येऊ लागला होता. सांकेतिकता निर्माण होऊ लागली होती. ही सांकेतिकता अनुभवाच्या स्वरूपात होती तशीच अभिव्यक्तीच्या रीतीत होती. सांकेतिकतेमधून 'आठवणींचे पक्षी' काहीसे मुक्त आहेत. हे निःसंशय लक्षणीय आहे.

दलित साहित्यात सामाजिक संदर्भानाही महत्त्व असतेच. आणि व्यक्तीचे अनुभव त्या संदर्भांना आशयघन करणारे असतात. वेगळ्या शब्दात सांगा-यचे तर एकंदरीत दलित साहित्य हे बहुतांशी द्विकेंद्री आहे. म्हणजे ते व्यक्तिकेंद्री आहे, तसेच समाजकेंद्रीही आहे. परंतु 'आठवणींचे पक्षी' चे हे

अणाखी एक वेगळेपण की, ह्या आठवणी व त्यातून अभिव्यक्त होणारे अनुभव हे बहुतांशी व्यक्तिकेंद्री आहेत. आणि तरीही व्यक्तिगत अनुभवांवर कोणतेही भाष्य न करता त्यातूनच निवेदकाच्या अनुभवाचे सामाजिक संदर्भ ध्वनित होतात.

दलित साहित्यातून साधारणतः जे जीवनानुभव व्यक्त होतात, त्या अनुभवात त्या त्या साहित्यिकांची अंतर्भूतता (Involvement) अपरिहार्यपणे असते. परंतु आपल्याच अनुभवांचे तटस्थपणाने, अलिप्तपणाने निवेदन करण्याची प्रवृत्ती दलित साहित्यात फारशी जाणवत नाही अंतर्भूततेसह अनुभव व्यक्त केला जातो. त्यामुळे चीड, संताप, त्वेष. द्वेष इ. विकार अथवा संचारीभाव मूलतम अनुभवात मिसळतात. आणि अनुभवाचे शबलित रूप व्यक्त होते. कलावंताजवळ तटस्थपणा, अलिप्तपणा हवा असतो तो यासाठी.

'आठवणींचे पक्षी' या दलित साहित्यकृतीत हा तटस्थपणा, अलिप्तपणा निश्चितच जाणवतो. याही संदर्भात ही कलाकृती सांकेतिकतेतून मुक्त झाली आहे, असे म्हणता येईल. या पुस्तकातील अनुभवाविषयाचा आवाका सीमित असला तरी दलित साहित्यातील गद्यलेखनाच्या कलात्मक प्रवृत्तीचा प्रारंभ या कलाकृतीत जाणवतो, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

ह्या साहित्यकृतीत काही दोषही आहेत. त्यांचीही नोंद घ्यायला हवी. दोष हा शब्द अगदीच वाच्यार्थाने घ्यायचे कारण नाही. पण काही गोष्टी निवेदकाने टाळल्या असत्या तर या साहित्यकृतीच्या वाङ्मयीन गुणवत्तेत अधिक भर पडू शकली असती. उदा. या सगळ्या आठवणींची पंधरा प्रकरणात विभागणी केली आहे. आणि प्रत्येक प्रकरणाला शीर्षक दिले आहे. प्रकरणाचे शीर्षक (लेखाचे म्हणा हवे तर) आणि त्यातले अनुभव यात अन्वर्थक संगती आहेच असे नाही. काही शीर्षके तर फसवी वाटतात. शीर्षके न देता नुसत्याच अनुभवांच्या आठवणी एकत्रित दिल्या असत्या तर 'आठवणींचे पक्षी' या प्रतिमेला अधिक अन्वर्थकता आली असती.

त्याचप्रमाणे प्रारंभापासून सगळ्याच आठवणी महारी बोलीत सांगि-

तल्या असत्या तर कलात्मक दृष्टीने भाषेचीही एकसंघता राखता आली असती.

सगळे अनुभव हे अनुभव म्हणूनच व्यक्त झाले आहेत. पण ‘दोन प्राणी – उंट आणि मी’ हे प्रकरण माहितीपूर्ण (informative) करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उंटाच्या सवयी, त्यांचे खाद्य, त्यांच्याशी माणसाने बोलावयाचे कोडवर्डस् वगैरे खूपसा तपशील या प्रकरणात आहे. अशा तपशिलामुळे वाचकांच्या ज्ञानात कदाचित काही भर पडेल. अथवा प्राणिमात्राच्या स्वभाव–वर्तनाविषयी जिज्ञासापूर्तीही होईल. परंतु ज्या वृत्तीतून वा मनःस्थितीतून ( vei ) अनुभवांच्या आठवणी सांगण्यास प्रारंभ केला आहे, त्याच ‘वृत्ती’तून उंटांच्या सहवासातले काही अनुभव सांगितले असते, तर अन्वर्थक ठरले असते.

अर्थात आहे त्या स्वरूपातही ‘आठवणींचे पक्षी’ वाचकांच्या काळजाचा ठाव घेतातच, वाचकांना सुन्न करतात. कोणत्याही जाणीवपूर्वक उद्दिष्टांचे ओझे अनुभव कथनावर लेखकाने लादून घेतले नाही. म्हणून या आठवणी लक्षणीय वाटतात. त्याचप्रमाणे सुन्नपणा संपला की वाचक कळतनकळत ‘दलितांच्या वेदने’विषयी विचारप्रवृत्त होतो. तेवढी परिणामकारकता या लहानशा पुस्तकात निःसंशय आहे.

(‘आलोचना’ डिसेंबर, १९८०)

• ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९६२
दा. क्र. २३६९८
दि. ५/११/०३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023717

नवे प्रकाशन :

**नरकपुरी गवसली** : श्री. अ. डांगे — आठ रुपये
तुरुंगातील अनोखे अनुभव

**दृष्टीआडच्या सृष्टीत** : कृष्णाबाई मोटे — सोळा रुपये
उपेक्षितांच्या अंतरंगाचे प्रत्ययकारी चित्रण

**पड** : अमिताभ — बारा रुपये
दलित कथेचा संयमी आविष्कार

**देवनवरी** : प्रेमानंद गज्वी — पाच रुपये
देवदासींच्या प्रश्नावरील एक प्रक्षोभक नाटक

**अशांतता-शाळा चालू आहे** : प्र. श्री. नेरुरकर — सात रुपये
शालेय रंगभूमीवरील प्रयोगक्षम नाटक

**चकवा** : सौ. माधुरी भिडे — सोळा रुपये
बाल गुन्हेगार जगतातील अनुभव कथा

**लग्न आणि इतर कथा** : सौ शिरीष पै — सोळा रुपये
'लग्न' या विषयावर आधारित चौदा कथांचा संग्रह

**शिमाळ आलं, शिमाळ आलं !** भानू शिरधनकर — बारा रुपये
दर्यावर्दी जीवनाची वास्तव झलक

**गाणीबिणी** : आ. ना. पेडणेकर — चार रुपये
बालकविता

**स्वाक्षरी** : प्रभाकर वैद्य — दहा रुपये
प्रगल्भ भारतीय मनाचे प्रगट काव्यचिंतन

अभिनव प्रकाशन, मुंबई ४०० ०१४

---

कव्हर छपाई : काशिका, ९५ पवना नगर, चिंचवड, पुणे-३३.